
प्राजक्ता पानारी
रात्र खेळीते
खेळ

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# रात्र खेळीते खेळ दीर्घ-भय-कथा

## प्राजक्ता कल्पना रघुनाथ पानारी

# रात्र खेळीते खेळ

**लेखिका: प्राजक्ता कल्पना रघुनाथ पानारी**

**बेलेवाडी (हु.), ता: आजरा,**
**जि: कोल्हापूर**
**फोन नंबर : 7719026803**
**ई. मेल : prajaktapanari23@gmail.com**

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन :   १५ फेब्रुवारी २०२५

**esahity Pratishthan®2025**

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# मनोगत



**नमस्कार,**

माझे नाव: **प्राजक्ता कल्पना रघुनाथ पानारी** मला लहानपणापासून कथा ऐकायला , वाचायला आवडतात पण एक दिवस आपणही लिहू असे नव्हते वाटले कधीच. एका निबंधापासून लेखनाची आवड लागली. तसं शाळेमध्ये असताना जास्तच लेखन आवडायचे असे काही नव्हते. हा पण निबंध लेखन खूप भारी वाटायचे. पण निबंध लेखन खऱ्या अर्थाने थोडे फार का असेना प्रभावी कॉलेज मध्ये असताना झाले. तेव्हा मी "माझा अविस्मरणीय प्रसंग" हा निबंध लिहिला ज्यात मी बाबांचा दुरावण्याचा प्रसंग मांडला होता. तिथून पुढे तर भावनांना नियंत्रित करण अवघड होत होते. मग कविता लेखन करण्याचा प्रयत्न करू लागले. कॉलेज मध्ये एक सर होते. जे कविता करायचे त्यांच्या कविता ऐकून वाटले आपणही प्रयत्न करावे आणि त्याच वेळी बाबांच्या पण काही कविता सापडल्या मग तर प्रयत्न करून पाहूच आता आपण कविता शिकायच्याच असं मनाशी पक्क करत लिहिण्याचा प्रयत्न करू लागले सुरुवातीला वाक्यरचना तितक्या व्यवस्थित नाही जमल्या. पण तरीही छोटे छोटे प्रयत्न करू लागले. तसं हळू हळू मुक्तछंद प्रकार जमू लागला.

पुढे एका ॲपची माहिती मिळाली मग मात्र तिथे कथावाचन सुरू झाले ज्यातून आपण पण भयकथा लिहायच्या अशी इच्छा मनात जागृत झाली. मग एकदा प्रयत्न करून पाहूच असं ठरवून लिहायला घेतली त्यातूनच आज हे पुस्तक जन्माला येत आहे. वाटले नव्हते भयकथा लेखन जमेल पण लिहिल्यावर कळले प्रयत्न केले कि जमत. हे माझे पहिले

पुस्तक आहे त्यामुळे चुकून काही चुकले असेल तर क्षमस्व पण कथा लिहिताना त्यामध्ये स्वतः ला घेऊन जाऊन लिहिली आहे त्यामुळे तुम्हालाही नक्की आवडेल अशी खात्री आहे.

तसेच ई साहित्यमुळे पुस्तक स्वरुपात साहित्य प्रकाशित करण्याची संधी मिळत आहे. त्याबद्दल मी ई साहित्यची ही मी खूप ऋणी आहे. खूप खूप धन्यवाद ई साहित्य प्रतिष्ठान कधी वाटले नव्हते खरच पुस्तक प्रकाशित होईल स्वतंत्र स्वतः चे पण ते आज ई साहित्यमुळे होत आहे.

या आधी रोहिणी पब्लिकेशन्स द्वारे सामूहिकरीत्या प्रकाशित केलेल्या "स्पर्श हळव्या ओळींचा" या काव्यसंग्रहात काही निवडक कविता प्रकाशित केल्या आहेत.

तसच निसर्गाने लिहित केल आहे. म्हणून माझ्या निसर्ग सख्याचेही खूप खूप आभार.

संपर्क क्रमांक : 7719026803

ई. मेल : prajaktapanari23@gmail.com

## अर्पणपत्रिका

**माझे हे पहिले पुस्तक मी माझ्या आई बाबांना, माझ्या गुरुजनांना, मार्गदर्शकांना आणि कळत नकळत खूप काही शिकवणाऱ्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस कृतज्ञपणे समर्पित करत आहे. !!!**

# प्रस्तावना

"रात्र खेळीते खेळ" या पुस्तकामध्ये तुम्हाला एक प्रवास अनुभवायला मिळेल. अनुश्री, राज, रवी, वीर, कावेरी अशा या मित्रांचा. त्यासोबत तुम्हाला त्यांच्या मैत्रीतील प्रेम अनुभवायला मिळेल तसेच त्यांचा वियोगही तितक्याच प्रबळतेने अनुभवायला मिळेल.

एका अज्ञात जंगलात हरवलेला अधिराज, त्याच्या मित्रांची त्याला शोधण्याची धडपड आणि अनोळखी आजोबांचा त्यांच्याशी असलेला गूढ संबंध. तसेच या पोरांचे धाडस त्यांच्योसाबत घडणाऱ्या घटना तुम्हाला त्यांच्या प्रवासात घेवून जातील अशी आशा आहे. हा एक अनोखा प्रवास आहे ज्यामध्ये वास्तव आणि सीमारेषा या गोष्टी पुसट होत जातात. याची सुरुवात एका खेळापासून होते हे तुम्हाला पुस्तक वाचताना समजेलच हे माझे पहिले पुस्तक आहे काही चुका असतील तर समजून घ्या.



**तर चला तुम्ही तयार आहात ना, रात्री खेळणाऱ्या अज्ञात शक्तींचा सामना करण्यास...**

| अ.क्र. | अनुक्रमणिका | पान नंबर |
|---|---|---|
| | मनोगत | 3 |
| | प्रस्तावना | 6 |
| 1 | हरवण्याचा लपंडाव | 11 |
| 2 | आजोबांची भेट आणि कावेरीची शंका | 14 |
| 3 | आजोबांचे रहस्यमय घर | 17 |
| 4 | विचित्र घटना आणि अनुश्रीचे अडकणे | 21 |
| 5 | वियोग भावनांचा वियोग मित्रांचा | 24 |
| 6 | वाड्यातील मुलगा आणि अनुश्रीच्या रूपातील तिचा उलगडा | 29 |
| 7 | भोवतीचा विळखा | 33 |
| 8 | भ्रमपाश आणि मोह | 37 |
| 9 | अनुश्रीचा निर्णय व लपलेले गूढ | 41 |
| 10 | मुलांची सुटका | 46 |
| 11 | तिची भेट...गूढता | 50 |
| 12 | शोध पुस्तकाचा | 55 |
| 13 | आवाजातली उर्जा | 59 |
| 14 | अनुवीरची भेट | 63 |
| 15 | जागेवरच्या दुषित पाऊलखुणा | 68 |
| 16 | अधिराजची घुसमट | 72 |
| 17 | भेट कि वास्तव संभ्रम | 76 |
| 18 | साद स्पर्श | 80 |
| 19 | भेट तिघांची | 84 |
| 20 | रिंगण | 89 |
| 21 | नयनाट सैतानी शक्तीचा कि अंत मित्रांचा | 94 |

# रात्र खेळीते खेळ...

**सदर कथा ही पूर्णतः काल्पनिक आहे. केवळ आणि केवळ मनोरंजन म्हणून वाचावी...**

# 1

# हरवण्याचा लपंडाव

आई ग... अशी जोरात हाक मारत अधिराज घाबरत घाबरतच जागा झाला. समोर सर्वदूर अंधाराचं साम्राज्य पसरल होत. आसपास फक्त घनदाट जंगलच जंगल होत. त्याला काहीच आठवेना कि आपण नेमक कोठे आलो आहोत? तो याचा विचार करतच होता कि जंगलातून अनेक श्वापदांचे आवाज येवू लागले. ते ऐकून तर त्याच्या अंगावर सर्रकन काटाच आला.त्याला वाटलं आता आपल काही खर नाही आणि त्याने डोळे घट्ट मिटून घेतले. त्याला आज एक एक क्षण घालवण सुद्धा कठीण झालं होत आणि मुळात त्याला आपण इथे कसं आलो? हेच आठवत नव्हत.

तोपर्यंत त्याला असं जाणवू लागल कि, आपल्या बाजूला कोणीतरी येवून बसलं आहे. त्याला समजेना की काय कराव? डोळे उघडून पाहाव का कि आपल्या जवळ कोण बसलं आहे .त्यांच्याकडून मदत तर घेता येईल आणि इथून बाहेर पडता येईल, पण दुसऱ्याच क्षणी असं वाटायचं की, नको नको आपण डोळे उघडायलाच नको काय माहित? काय भयानक दिसेल. या विचारात असतानाच त्याला जाणवल कि, आता आपल्या मागे कोणीतरी उभं आहे. या अशा जाणीवाच इतक्या भयानक अनुभूती देत होत्या कि, त्याच्या मनात भितीचं साम्राज्यच उभं राहिल होत. आता त्याच्या आसपास जे कोण होतं ते दूर गेलंय असं त्याला वाटलं पण तरीही त्याला डोळे उघडायची हिंमतच होईना. त्याचं विचारचक्र परत चालू होतं.

अरे काय हे एक तर काय झालं? आणि आपण इथे कसं आलो? आपण स्वतःच आलो कि, कोणी आपल्याला इथं घेवून आलं? आणि जर आपण स्वतः हाच इथं आलो तर आपल्याला ही जागा कोणती आहे हेच का समजत नाही आहे आणि जर कोणी घेवून

आलंय? तर नेमक कोणी आणल? ते का आठवत नाही. असा अधिराज स्वतः च्या मनाशी संवाद साधत असतोच कि त्याला नदीच्या पाण्याचा आवाज येवू लागतो. त्याला आश्चर्यच वाटू लागत कि, हे कसं शक्य आहे! एक तर रात्रीचा किर्र अंधार आहे आणि नदी वाहण्याचा आवाज येतोय. खर तर रात्री नदी पण संथ झालेली असते. तिथ जावून पाहायलाच हव कि नदी कशी वाहत आहे.

अधिराज तसाच उठून नदीचा वेध घेत घेत पुढे जावू लागला तोच त्याला मागून कोणीतरी खेचत घेवून गेल आणि परत तो तसाच बेशुद्ध झाला.

..................

अधि ये अधि अरे कुठे आहेस? तुझ्यावर डाव आला ना आणि तुच लपून बसलास काय? अरे खूप वेळ होत आहे. ये कि आता आम्हाला घरी पण जायच आहे. तु शोधेनास म्हणून आम्हीच तुला शोधू लागलोय पण, आहेस कुठे तू? असं म्हणत म्हणत राज, कावेरी, अनुश्री आणि वीर चौघेही अधिराजला शोधत होते. तेवढ्यात कावेरीच्या हातावर रक्ताचे काही थेंब पडले, तसं ती वरती बघू लागली आणि जोरात ओरडू लागली. तिचा तो आवाज ऐकून चौघही तिच्याकडे वळले. ते सगळे कावेरीकडे आले, तसं ति ने बोट वर करून वरती बघायला सांगितले, तसं ते ही वरती बघू लागले आणि ओरडू लागले . वरच दृष्य फारच अघटीत होतं. एका माणसाला मारून त्या झाडावर कोणीतरी ठेवल होतं. ते दृश्य खूपच भयावह होतं. त्याच्या डोळयात काहितरी घुसवल होतं त्यातून रक्त गळत होतं आणि एक हात छाटला गेला होता. ते दृश्य पाहून तर त्या चौघांच्याही पायाखालची जमीनच सरकली ते शक्य तेवढे बळ एकवटून घरी जावू लागले.

ते घरी जावू लागले, तोच तो माणूसही पळत त्यांच्या मागे मागे येवू लागला त्यांना कळेना की असं काय होतंय? तो माणूस तर मेलेला आहे मग कसं काय पळत येत आहे? मगाशी तर त्याच पाय देखील दुसऱ्या झाडावर दिसले, मग ते आता कसे काय परत जोडले गेले. तो माणूस मागून गुरगुरण्याचा आवाज काढत त्यांच्या मागे येवू लागला, तसे ते

आणखीनच घाबरुन पळू लागले.  आता दोन पावलावर येण्याचा आवाज येवू लागला, तसं ते जीवाच्या आकांताने पळू लागले. थोड्या वेळात तो वीरच्या अगदी जवळ गेला. त्याला वाटलं तो त्याच्या शेजारीच आला आहे, तसं वीरही शक्य तितक बळ एकवटून पळू लागला आणि राजचा तर शर्ट त्याच्या हातात आलेला. त्याने त्याचे तसेच बट्णस काढले आणि शक्य होईल तितक्या वेगाने पळू लागला, तितक्यात त्यांना समोर एक पडक घर दिसल, ते त्या घराजवळ जावू लागले, तसं तो माणूस दूर होवू लागला ते चौघेही पटकन त्या घरात शिरले. त्यांना वाटलं आपण इथे नक्कीच सुरक्षित राहू, तोपर्यंत त्यांच्या कानावर एक आवाज आला. काय र? कोण हाय तिकडे? आणि एक म्हातारा काठी टेकत टेकत त्यांच्या जवळ आला. त्याने डोक्यावर फेटा बांधला होता. एका हातात तंबाखूची डब्बी पकडली होती आणि धोतर नेसल होतं असा त्याने पारंपरिक पेहराव केला होता. तो या सर्वांना प्रश्न विचारु लागला पण यांच्या तोंडातून शब्दच बाहेर पडेनात .

आर पोरांनो असं का घाबरालसा?  काय भूत बित पायलसा का?

तस, येताना वाटेत जे काय घडलं, ते त्या आजोबांना सांगू लागले. आजोबा हसत म्हणले तर असं हाय व्हय. आर घाबरू नगसा आता आज रहावा इथं आणि सकाळच्याला जा तुमच्या घरला.. तसही ते चौघ खूप घाबरले होते ते लगेच तयार झाले.

आजोबा मनोमन खूप खूष झाले आयती तावडीत गावलीत माझ्या. मागच्या येळस वाचली होती आता नाय वाचणार.



## 2

# आजोबांची भेट आणि कावेरीची शंका

ये अधिराज, अरे ये कि इकडे केव्हाची वाट पाहतोय तुझी किती उशीर केलास, असं म्हणत म्हणत त्याच्या समोर हुबेहूब त्याच्यासारखा दिसणारा मुलगा तिथे येवून उभा राहिला. डोक्याला मार लागलेला. डोळे पांढरे झालेले, हातावर जखमाच जखमा झालेल्या. एक पाय तुटलेला हातात घेऊन तो तसाच त्याच्या दिशेने येत होता. अधिराज तर मनातून हालूनच गेला होता. एकिकडूण त्याच्याकडे पाहताच धडकी भरत होती. तर दुसरीकडून विचार घोळत होते. अरे हा तर माझ्यासारखाच दिसतो, पण हा नेमका आहे तरी कोण. मी तर एकटाच आहे. माझा कोणी भाऊ पण नाही जूळा मग हा आपल्यासारखा कसा काय दिसत आहे?

अरे असं काय बघतोयस स्वतःलाच असं निरखून निरखून असं तो मुलगा म्हणू लागला आणि हळूहळू आणखीनच जवळ येवू लागला.

त्याला जवळ येताना पाहून अधिराज म्हणू लागला “ये थांब, तिथेच थांब, जवळ येवू नको माझ्या.

अरे अधिराज असं काय म्हणतोस स्वतःपासूनच का दूर पळत आहेस. अरे मी म्हणजेच तर तू आहेस, अरे कालच तुला तुझ्या जवळ बसलेल्या माणसान ओढत ओढत नेल आणि तिथच तुला बांधून ठेवून तुझ्या पायावर चाकू चालवला आणि हातांवर पण वार केले. विसरलास का सगळ. अरे तू संपलायस आणि आता जे तू मला पाहत आहेस तो तुझाच देह म्हणजे तूच आहेस आणि तू त्यातून बाहेर पडलायस म्हणूनच म्हणतोय तू ये परत माझ्या आत ये.

अधिराज प्रचंड घाबरला त्याला वाटलं असं कसं घडलं, आपल्याला काहीच का आठवेना.

तोपर्यंत तो अधिकच जवळ येवू लागला, तसं नाही नको नको येवू तू माझ्याजवळ जा जा दूर जा माझ्यापासून असं करत करत अधिराज दूर पळत पळत चालला.

तसा तो मुलगा म्हणू लागला अरे जाशील कोठे पळून तुला परत परत येतेच यायच आहे. तुला असं कसं सोडेन मी. असं म्हणून हसू लागला. आणि मध्येच अरे ये कि अधिराज हा तुझाच देह आहे त्यातूनच दूर गेलास तर मला जिवंत कसं करणार तू.

अधिराज मात्र चांगलाच घाबरला होता. त्याला स्वतः ला अशा अवस्थेत पाहून स्वतः चीच दया येत होती, पण तो तसाच पळत राहिला आणि तितक्यात त्याला परत नदीचा आवाज येवू लागला. तो परत पुढे जाणार, तोच त्याला मागून कोणीतरी ढकलल आणि तो तसाच एका दगडावरती पडला. .....

............................

त्या आजोबांनी मुलांसाठी गरमा गरम झुणका भाकरी केली. तसं ते त्या घरात एकटच राहायचे त्यांच्या बायकोला ब्लड कॅन्सर होता त्यातच त्या दगावल्या होत्या.

ते आजोबा पोरांना म्हणले, पोट भर खावा पोरांनो तेवढ मला बी आणखी भारी चव येईल तुमच्या स्वादाने.

काय? काय म्हणालात काय? कावेरी विचारू लागली. अरे मी म्हणल पोट भर खावा म्हणजे अंगात तरतरी येईल आणि झोप पण नीट लागल तुम्हासनी.

कावेरीच्या मनात मात्र प्रश्नच प्रश्न उगवत होते. हे आजोबा इथे एकटे कसं राहत असतील? त्यांच वागण कधीकधी इतक विचित्र का वाटत? आणि ही जागा या आधीही पाहिली आहे असं का वाटत आहे. तसं तर आम्ही इथं कधीच आलो नाही.

बाकिचे मात्र जेवणाचा आस्वाद घेत आपापसात गप्पा मारत होते. त्यांची तर येथे येण्याआधी त्या माणसाला बघून भितीने सारी भूकच मेली होती. वाचण्याची शाश्वतीच वाटत नव्हती त्यांना, पण त्या भाकऱ्या बघूनच पुन्हा नवा जोश आला होता. तसच ते गप्पा मारत मारत झालेल सगळ विसरण्याचा प्रयत्न करत होते.

ते आजोबा मात्र एकटक त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहत होते.

जस कि खूप मोठ सावज हाती लागलय आणि आपण शिकारीच्या तयारीत आहोत. असे त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव दिसत होते. तेवढ्यात राजच लक्ष गेल, तोच आजोबा सावध झाले आणि मायाभरल्या डोळ्यांनी पाहू लागले आणि म्हणाले, मला माझ्या पोरांची आठवण झाली. ती बी आज असती तर तुमच्या येवडीच असती बघा.

म्हणजे आजोबा तुम्हाला मुल आहेत पण मग कोठे असतात ती परगावी शिकायला आहेत काय? अनुश्री विचारू लागली.

आजोबा म्हणाले, "अग पोरी आता नाहीत ती . ती कधीच सोडून गेलीत आता हयात नाहीत."

म्हणजे? काय झालं काय ओ त्यांना? आजारी होतीत का ती? राज विचारु लागला.

आजोबा सांगू लागले, "नाही आजारी नव्हती, एकदा पोलिस आले होते इथे. त्यांना कोणीतरी सांगितलेल कि, इथं मुलांचा बाजार भरतो व त्यांची विक्री केली जाते. मग त्यांनी येथे छापा टाकलेला आणि आम्हा नवरा बायकोला घेऊन ते पोलिसात पोचलेले."

अनुश्री म्हणाली; "मग आजोबा नंतर काय झाले?" तुम्ही कसे सुटला?

अग जेव्हा कळाल ती बातमी खोटी आहे. तेव्हा त्यांनी आम्हाला सोडून दिले. पण, त्याला फार उशीर झाला होता. आमच्या पोरांनी आम्ही येण्याआधीच आत्महत्या केली.

हे ऐकून तर त्या चौघांच्या डोळयात पाणी भरले. वीर म्हणाला, आजोबा तुम्ही रडू नका आम्हाला तुमची पोर समजा. असं म्हणत आजोबांना धीर देण्यासाठी तिघांनी त्यांना मिठी मारली आणि तो आजोबा मागून हळूच हसू लागला. कावेरीला मात्र मनात शंकाच येत होती.

3

# आजोबांचे रहस्यमय घर

सगळेजण थोड्या गप्पा मारून तिथेच बाजूच्या खोलीत झोपायला जाऊ लागले. जाता जाता ते आजोबांच  घर पाहू लागले. त्या आजोबांच्या घराची रचना थोडी वेगळ्या पद्धतीची होती. बाहेरून अगदी पडक घर वाटायच. पण आत आल्यावर वेगळीच अनुभूती यायची. बाहेरून पडक आणि खूपच छोट्स वाटणार ते घर आतून मात्र खूपच भव्य होतं. असं वाटायच कि, खूपच मोठ्या जागेत ते घर वसल आहे. छताच्या खालची रचना अतुलनीय होती, त्यावर हिऱ्यांचा वापर करून केलेले नक्षीकाम होते व त्या खाली  एक फॅन फिरत होता. ज्याच झुंबर खूप विशिष्ट पद्धतीने चित्रित केल गेलल त्यावर काही नंबर्स कोरल्यागत दिसत होते व त्यासोबतच काही अक्षर पण लिहिली गेली होती. अनुश्री सगळ्यांना फॅन दाखवत म्हणाली वरती बघा ते कसले तरी नंबर्स आणि अक्षर लिहिल्यात. सगळेच वरती बघू लागलेत. तोवर मागून अचानक येत आजोबा ओरडल्यागत  म्हणाले कि, अरे तिकडं काय बघतासा. तो आवाज ऐकून क्षणभर सगळेच दचकले. तसं आजोबा बाजू सावरत म्हणाले अरे घाबरलसा का? त्याच काय आहे? “माझ्या बाबांना कमी ऐकू यायच म्हणून कधी कधी मी मोठ्याने बोलायचो. आज पण सवयीने तसच बोलून गेलो. पण, तुम्ही घाबरू नगसा आणि त्या नक्षीबद्दल सांगायच झालं तर  ते मला लहानपणी कोडी सोडवायला आवडायची म्हणून माझ्या बाबांनी तयार करून घेतलेल.”

पण आजोबा तुम्ही तर झोपायला गेलेलात ना. त्या खोलीकडे बोट दाखवून. कावेरी म्हणाली.

अग हा ते मी चुकीची खोली दाखवली म्हणून परत आलो. त्या खोलीत नका जाऊ. तिथे नको असलेल सामान हाय आमच. तुम्ही त्या तिकडच्या खोलीत जावा. पण

आजोबा असं म्हणत राज मागे वळला पण ते लांब गेलेले दिसले तो आश्चर्याने बाकिच्यांना म्हणाला, आजोबा किती धीट आहेत ना, बाकिचे पण म्हणाले हो ना आता इथेच होते तोवर तिथे गेले सुद्धा. हा ते आहे. पण किती खाष्ट आहेत ते.कावेरी म्हणाली.. ये कावू गप्प ग मोठ्यांबद्दल असं बोलतात का अनुश्री म्हणाली...

तर काय ग अनू मगाशी किती ओरडून बोलले ते कावेरी म्हणाली..

अग असू दे ग आपल्याला सांभाळणारे आबा पण आपल काही चूकल तर ओरडताताच ना. अनुश्री म्हणाली...

अग पण ते चूक नसताना कधीतरी असं बोललेत काय आपल्याला. कावेरी म्हणाली...

ये गप्प बसा तुम्ही दोघी काय चाललंय तुमच आपल्याला थोडीच कायमच राहायच आहे. आजची रात्रच तर काढायची आहे. उद्या परत आपल्याला अधिराजला शोधायला जायच आहे. वीर म्हणाला....

अरे हो रे कोठे गेला असेल रे आपला अधी? खूप आठवण येतेय रे मला ते ची. राज म्हणाला...

अरे असं नका धीर सोडू, आपण उद्या शोधू त्याला,आता चला लवकर म्हणजे सकाळी लवकर उठून त्याला शोधता येईल. वीर म्हणाला...

तस बाकिचे खोलीकडे जावू लागले.

वरच्या बाजूने तर घर आकर्षक आणि सुंदर असं होतं. पण, त्या घराच्या भिंती मात्र विचित्रच होत्या. त्या घराच्या प्रत्येक भिंतीवर विशिष्ट अशी कलाटणी केलेली होती. ते पाहून हुबेहूब चित्र डोळ्यासमोर यायची. त्यातील एका चित्रात पाच लहान सात वर्षाची पोर दाखवलेली. जी खोडकर असल्यासारखी वाटायची. ती एका खोलीत बसली आहेत व आपसात चर्चा करत आहेत असं ते चित्र होतं.

दुसऱ्या चित्रात एक स्त्री दाखवलेली जीच्या मागे एक माणूस चाकू घेऊन उभा होता आणि तिच्यापुढे आणखी एक स्त्री होती जीने तिला पकडल होतं. ते पाहून सगळयांना भितीच वाटायला लागली. पण नुसती चित्रच आहेत असं म्हणून परत ते सगळे पुढे जावू लागले.

त्याच्या पुढे पण एक चित्र होतं ज्यात काही माणस हातात बंदुका घेऊन एके ठिकाणी थांबलेली दिसत होती. त्यानंतरच्या एका चित्रात एक स्त्री रक्तबंबाळ अवस्थेत पडलेली दिसत होती. त्याच्या पुढच्या चित्रात नुसताच लाल रंग दिसत होता आणि त्याच्या पुढे फारच भयावह चित्र होतं. त्यात एक माणूस दाखवलेला होता जो रक्ताने बरबटला होता. ज्याच्या डोळयात पाहिल्यावर असं वाटायच कि तो निखारे फेकत आहे आणि हातात चाकू घेऊन आपल्यावर वार करायला धावत आहे. पुढील चित्रात ती पोर धावत्याली दाखवलेली. ती भिंतीवरची चित्र बघत बघत ती चौघजण त्यांना ज्या खोलीत आजोबांनी राहायला सांगितलेल त्या खोलीत गेले. ......

ते ज्या खोलीत गेले ती खोली पण खूपच आकर्षक होती. त्यांच्यासाठीचा जो बेड होता त्याच्या मागे मोराचे छान असे चित्र रेखाटले  होते. त्याचे मोरपंख तर सोन्यानेच बनवले आहेत तसे चमकत होते. बेडचे जे चार पाय होते. त्याला मध्ये मध्ये हिरे जोडले होते आणि बाजूने चांदी दिसत होती. त्याच्या समोर एक टेबल होता ज्यावर एक मोठा असा टि. व्ही होता जो खूप पूर्वीच्या काळातला वाटत होता पण तरीही अगदी नव्यासारखा दिसत होता. जणू काय?  आताच खरेदी केला आहे असा. खाली आकर्षक असे मॅट घातले होते ज्यावर सुंदर फुलांच्या डिझाईन्स होत्या. तसच त्या खोलीतल्या भिंतीवर चित्रकार जशी निसर्गातल्या प्रत्येक झाडाझुडुपांचे हुबेहूब चित्र काढतो तशी चित्र काढली होती. त्यांना ते सगळ पाहून खूपच आश्चर्य वाटू लागल होतं. त्यांनी या आधी इतक भारी घरांची डिझाईन्स पाहिली नव्हती. त्यांना हेच कळत नव्हते कि, सोन्या चांदीच्या आभासासाठी बनवलय कि, खरच इथे सोन्या चांदीचा वापर केला गेला आहे. त्यांना त्या भिंतीवरची चित्र बघून खरच आपण कोणत्यातरी निसर्गमय ठिकाणी आहोत असं वाटत होत. ते पाहून

अनुश्री म्हणली थॅंक गॉड की त्या बाहेरच्या खोलीसारख्या भिंती नाहीत नाहीतर झोपच यायची नाही.

हो ग अनू बरोबर आहे नाहीतर तुझ घाबरून पाणी पाणी झालं असत ग. कावेरी म्हणाली...

ये कावू तुला काय? त्या राजसारखी घाबरट वाटली का काय मी.. अनुश्री म्हणाली...

ये असं काय चिडवालसा तसं तर तुम्ही सगळेच लय घाबरट हाईसा म्हणून तर लगेच त्या माणसाला बघून पळालसा ... राज म्हणाला...

ये बास बास तू तर असं बोलतोयस जस कि तु घाबरलाच नाहीस म्हणून तर शर्ट तसाच टाकून पळत आलास .. वीर असं म्हणाला तसं सगळेच हसू लागले.

अरे पण हा आपली सगळ्यांचीच किती वाईट हालत झालेली बर झालं या आजोबांच घर दिसल नाहीतर काय खर नव्हत... वीर म्हणाला...

हो ते आहे पण आपण अधीला एकटच सोडून आलो रे काय माहित तो कसा असेल अरे तो माणूस त्याच्या पण माग लागला नसेल ना... त्यान त्याला काय केल तर नसेल ना ... अनुश्री म्हणाली..

ये नाही ग अनू माझ मन सांगतय तो नक्की ठिक असेल आणि नको ते विचार नको करू. माहित आहे ना आपण जस विचार करतो . तसं होत बऱ्याचदा. कावेरी म्हणाली...

हो अग चूकल परत नाही बोलत अस... अनुश्री म्हणाली...

अरे झोपूया आता उद्या अधीपर्यंत लवकर पोहोचायला पाहिजे.वीर म्हणाला . तसं सगळे लागलीच अंथरूण घालून झोपू लागली...

इकडे आजोबा मात्र वेगळ्याच तयारीत होते.

# 4

# विचित्र घटना आणि अनुश्रीचे अडकणे

टक टक टक टक असा आवाज येवू लागला तसं कावेरीला जाग आली ती तशीच झोपल्या जागेवरून उठली. तसं आवाज कोठून येत आहे याचा वेध घेवू लागली. तसं तिला त्या बाजूच्या खिडकीतून आवाज येत असल्यासारख जाणवल ती हळू हळू पुढे जावू लागली. तसं आवाज आणखीच जोरात येवू लागला.

तस तर आजूबाजूचे काहीच दिसत नव्हते. सगळयांनी झोपताना दिवे मालवले होते.

तीचा पाय कशाला तरी आदळला आणि ती खाली पडली व तसच स्वतः हाला सावरत परत उठली.

मगाशी वाढत जाणारा आवाज कमी ऐकू येवू लागला तसं तिला वाटलं आपण बहुतेक चूकीच्या दिशेने चाललोय. आधी आपला मोबाईल शोधूया कमीत कमी टॉर्चच्या प्रकाशात तर काय तरी दिसेल.

ती परत तीच्या जागेवर तशीच धडपडत गेली व मोबाईल शोधू लागली पण तिला काही केल्या मोबाईल सापडेना. तसं बाहेरून परत तसाच आवाज येवू लागला. अरे काय आहे. कसला आवाज आहे हा. आणि हे सगळे कसले कुंभकरणासारखे झोपलेत. एक पण कोण उठेना या आवाजाने. आपल्याला मात्र झोपच येईना झाले. जावू दे यांना तर सकाळी बघू आपण आधी या आवाजाचा शोध लावू.

ती परत मोबाईल शोधू लागली तोवर तिच्या हाताला काय तरी जाणवल. जस कि जवळून काहीतरी वळवळत गेल. तिला काय करायच तेच कळेना परत तसाच भास झाला

तशी ती हात जवळ ओढू लागली पण तिला हात जवळ घेताच येईना. जणूकाही कोणीतरी घट्ट धरून ठेवलाय किंवा कशाला तरी बांधलाय. ती परत प्रयत्न करू लागली पण काही केल्या तिला हात जवळ घेता येईना तीला अचानक रडायला यायला लागल. तोवर समोर अचानकच त्या भिंती दिसू लागल्या. आणि तिच्या अवतीभवती फिरू लागल्या जणूकाय त्या भिंती तिच्यासोबत खेळतच आहेत. त्या चित्रातला तो खूणशी नजरेने पाहणारा माणूस त्या भिंतीतून चालत चालत तिच्याच दिशेने येवू लागला. तशी तिच्या मनात धडकिच भरली. ओरडायला पण तिने तोंड उघडले पण तिच्या तोंडातून आवाजच येईना. समोरून तर मृत्यू आणखी जवळ येताना दिसत होता पण तिला पळताच येईना जणू काय कोणीतरी तिचे पाय पण बांधून ठेवलेत. ती हतबल होऊन तशीच उभी राहिली.

अचानक काय झाले काय माहिती तिच्या कानावर भजन ऐकू आले एका स्त्रीच्या मंजूळ आवाजातले आणि ते समोरच दृष्य सगळ अदृष्य झालं.

ती आजूबाजूला बघू लागली तर सगळ आधी जस होत तसच होत न समोर त्या भिंती दिसत होत्या न समोरून येणारा तो माणूस दिसत होता. न हाताला कोणी बांधल होत ती हातांची हालचाल सहज करू शकत होती. तिला समजेनाच कि मगाशी आपण जे पाहिले ते सत्य होते कि आता जे पाहतोय ते सत्य... असो पण काय पण आवाज तर शांत झाला आता झोप तर लागेल.अस म्हणून कावेरी झोपू लागली तोवर परत टक टक टक टक आवाज चालू झाला.

यावेळी मात्र ती ने मनाचा निर्धार केला आता काहीही होवू दे आपण कोठेच जायच नाही. ...

अचानक अनुश्रीला कोरड पडल्यासारखी वाटू लागली म्हणून ती तशीच डोळे चोळत चोळत उठली.

काय यार इतकि भारी झोप लागलेली तोवर कसली तहान लागली आपल्याला आता पाणी प्याव लागेल.

ती न बाजूला ठेवलेला जग हातात घेतला तर त्यातल पाणी संपलेल.

काय यार हे सगळे एक तर जग भरून ठेवायला कोण तयार नव्हत आणि रिकामा मात्र लगेच केला. शीट यार आता बाहेरच्या खोलीत जावून पाणी आणाव लागेल. पण बाहेर जाणार तर कसं कसला अंधार आहे काय दिसत तर नाही. असं म्हणत ती मोबाईल शोधू लागली. आणि परत शीट यार या तर कायच चार्जींग नाही घ्या आता भोगा आपल्या कर्माची फळ काय उशीरापर्यंत मोबाईल घेवून बसतात असं स्वतः हावरच ओरडून दिवा शोधू लागली बाजूलाच एक दिवा दिसला. ती ने उशीजवळची काडेपेटी घेतली तिला नेहमी जवळ काड्यापेटी घेवून झोपायची सवय होती. कारण तिला कायमच अशी रात्रीची तहान लागायची मग काय पाणी प्यायला उठाव लागायचं.

ती ने काड्यापेटीने दिवा लावला व हळू हळू पुढे जावू लागली.

ती ने खोलीचा दरवाजा हळूच उघडला आणि पुढे जावू लागली पण तिला बाहेर येताच जास्तच भिती वाटू लागलेली कालच त्या भिंतीवरच चित्र आठवून घाम फुटत होता पण ते नूसत चित्रच आहे अशी स्वतः हालाच समजूत घालून ती पुढे चालू लागली तोवर त्या भिंतीजवळ येवून पोहोचली. पण ती ने ठरवलेल कि आपण घाबरायच  नाही असं म्हणतच ती पुढे जावू लागली. ती ने चित्रांकडे बघणच टाळल पण तरीही भिती वाटतच होती. ती त्या खूणशी नजरेने बघणाऱ्या माणसाच्या चित्राजवळून पुढे गेली व अचानकच कोणीतरी जोरात मागे ओढले तीला काही कळायच्या आतच त्या भिंतीने स्वतः हात सामावून घेतले. .......

5

# वियोग भावनांचा वियोग मित्रांचा

त्या खोलीच्या भिंतीतून एक आकृती अलगद बाहेर आली व एका वेगळया रूपात साकार होवू लागली व  तशीच पुढे येवून अनुश्रीच्या जागी येवून झोपली.....

खिडकीचा दरवाजा झपाझप वाजू लागला व त्यातून थंडगार वारे आत शिरू लागले. राजला त्या वाऱ्यामुळे शहारा येवू लागला. तो अंगावरच पांघरूण वर घेवू लागला. पण तरीही थंडी वाजतच होती. त्याला तो बाहेरून येणारा वारा असह्य होवू लागला. तो खिडकी लावण्यासाठी वरती उठला आणि जागीच खिळला. बाहेरच्या गर्द अंधारातून दोन डोळे त्याच्यावर नजर रोखून होते रागाने लाल झाल्यासारखे ती समोरची व्यक्ती तर दिसत नव्हती पण ते डोळे मात्र चांगलीच भिती भरत होते मनात. राजला पुढे जायच धाडस होईना तरीही काय माहिती अचानक काय झाले तो त्या डोळयांमध्ये हरवून गेला आणि यंत्रवतच पुढे चालू लागला ते डोळे त्याला त्याच्याही नकळत बाहेर घेऊन जावू लागले आणि राज तसाच चालत पुढे पुढे जावू लागला...

आजोबा आज एका वेगळयाच आनंदात होते खूप वर्षांपासून ते ज्या दिवसाची वाट पाहत होते तो दिवस समोर आला होता. मागच्या वेळी त्यांचे जे काम चालू होते ते या मुलांमुळे कायमचे बंद पडले होते त्याचाच बदला त्यांना घ्यायचा होता......

कावेरी आणि वीर बोलत होते तितक्यात एक स्त्री धावत धावत तेथे आली आणि त्यांना सांगू लागली. का? का? का? आलात पोरांनो तुम्ही इथं जावा जावा इथून लवकर इथे तुम्हाला धोका आहे. आधीच बाकिच्या मित्रांचा जीव धोक्यात आलाय जावा जावा तुम्ही इथून नाहीतर तुमचा पण जीव धोक्यात येईल... आणि अचानक एक माणूस नकाब

घातलेला समोर आला आणि म्हणू लागला नाही आता कोणाचीच सुटका नाही तुम्ही सगळेच अडकलात. हा हा हा हा...

आणि कावेरीला जाग आली. हे देवा काय होत हे सगळ. आज असल कसल स्वप्न पडल आपल्याला. या आधी इतक भयानक स्वप्न नाही पडल कधी मग आजच असं काय झालं. आणि ती बाई कोण होती तीला बघितल्यासारख पण वाटत नाही. पण तीचा आवाज मात्र ओळखीचा वाटत होता पण कोण होती ती आणि ती असं का म्हणत होती कि बाकिचे धोक्यात आलेत तुम्ही जावा आणि तो माणूस कोण होता जो तुम्ही अडकून बसलात आता असं म्हणत होता तो..

आपल्याला हे पटकन बाकिच्यांना सांगितले पाहिजे असे म्हणत ती अनुश्रीला आवाज देवू लागली.

ये अनू उठ ना ये अनू ...

काय ग कावेरी काय झालं एकतर किती वेळाने झोप लागले आणि तू काय उठवालेस झोप गप...

अग ऐक तर आधी मगाशी मला एक स्वप्न पडलेल ज्यात एक बाई म्हणालती तुमचा जीव धोक्यात आहे...

काय हा ती तर खरच म्हणली तुम्ही तर वाचणार नाही आता अनुश्री एका वेगळ्याच आवाजात असं बोलू लागली  ते ऐकून तर कावेरीच्या मनात धडकीच भरली..

ये अनू तु काय काय म्हणालीस...

अग काय नाही ग तुझी मस्करी केली मी. झोप ग तु जास्तच विचार करतेस बाकिचे पण झोपलेतच कि मग कोणाचा जीव धोक्यात आलाय इथे...

अग पण आपल्याला आजूबाजूचे काहीच का दिसेना जास्तच अंधार वाटालाय तू शेजारीच आहेस म्हणून दिसलेस तरी पण बाकिचे कोण दिसतच नाही आहे ना खरच ते खोलीत आहेत ना ते आपल्या कि ती बाई म्हणली तसं मोठ्या संकटात आहेत...

ये कावेरी आता गप्प झोप हा तू जरा जास्तच विचार करालेस.

अग मगाशीच राज उठलेला त्याच्या आवाजाने  मी उठलेले त्याला आवाज दिल्यावर तो तहान लागलेली पाणी पिवून आलो असं म्हणून परत झोपला... म्हणून जास्त नको विचार करू फक्त स्वप्न होत ते झोप आता गप्प... आणि अनूश्री झोपी गेली...

कावेरीच्या मनात शंकेने जागा घेतली तीला अनूश्री च वागण वेगळ वाटत होते. आज ती कावेरीला तीच पूर्ण नाव घेऊन हाक मारत होती. अशी हाक ती ने पहिल्यांदा ऐकलेली लहानपणापासूनच अनू तिला कावूच म्हणायची चुकून पण तीच नाव घ्यायची नाही. आणि कधीच घोगऱ्या आवाजात बोलत नव्हती.

आज सगळच विचित्र वाटत होत तीला अगदी अधिराजच गायब होण, त्या माणसाकडून होणारा पाठलाग नंतर या घरात आजोबांकडून आसरा मिळण. या घरातल्या बाहेरच्या खोलीतल्या विचित्र भिंती मध्येच तो येणारा टक टक आवाज आणि समोर पाहिलेली त्यावेळची ती घटना. . ती घटना तर नंतर स्वप्न वाटली पण ती अनुभूती तर वास्तवात ते सगळ घडलंय अशीच होती. आणि आता अनुश्रीच असं बदलेल वागण...

जस झोपेतून जाग व्हाव तसं अनुश्री भानावर आली व  आजूबाजूचा अंदाज घेवू लागली तिला कळेचना की आपण नेमक कोठे आलोय. आजूबाजूला तर नुसता अंधारच दिसत होता. तीच्या डोळ्यात आपोआपच पाणी येवू लागल. तसच ती बाकिच्या मित्रांना हाक मारू लागली पण कोणच तीच्या हाकेला ओ देईना.

ती स्वतः हाशीच म्हणू लागली. काय यार हे कोठे पोहोचलोय आपण आणि असं अचानक कसं काय आलो आपण इथे आपण तर पाणी प्यायला जग घेवून बाहेरच्या खोलीत चाललेलो मग आपण इथे कोठे आलो.

ती स्वतः ला चिमटा काढून बघू लागली. तसं जोरात कळ आली तीला आधी वाटलेल कि हे आपल वाईट स्वप्न असेल पण ते सत्य आहे हे समजल्यावर तिला जास्तच

रडायला येवू लागल तरीही तीने स्वतः हाला कसं बस सावरल आणि पुन्हा काही मार्ग मिळतो का? हे शोधू लागली....

अधिराजला पळून पळून धाप लागली होती त्याला कळेना आपण नेमक योग्य मार्गावर आहोत कि नाही तरीही तो जीवाच्या आकांताने पळत होता त्याला काहीही करून या जंगलातून बाहेर पडायचे होते आपल्या मित्रांना भेटायचे होते त्याला हे पण कळत नव्हत की हे आपल्यासोबत आजच घडत आहे कि आपल्याला खूप वर्ष झाल्यात येते येवून. मन तर हेच सांगत होत कि खूप वर्ष झालेत तुला इथे येवून तु प्रयत्न सोडून दे आता. पण त्याच्या समोरून त्याच्या मित्रांचे चेहरे हटत नव्हते. ते त्याला सतत हाक मारत होते. त्याचा त्याच्या मित्रांवर स्वतः हापेक्षाही जास्त जीव होता. त्याच्या मनाची अवस्था तर वाईट झालेली पण मित्रांना भेटण्याची इच्छा मात्र स्वस्थ बसू देत नव्हती. त्याला शेवटच का असेना त्याच्या मित्रांना भेटायच होत त्यामुळे तो तसच धावत होता या आशेवर कि आपल्याला आपले मित्र नक्की भेटतील. ....

कावेरीच्या मनात शंका कुशंकांनी घेराव केला होता तिला सतत असच वाटत होत कि आपण मोठ्या अडचणीत सापडलोय आपल्याला काहीही करून या सगळ्या परिस्थितीमागचा अभ्यास करायला पाहिजे तोवर तिला अनू ने दाखवलेल्या फॅनवरील झुंबरावरच्या नंबर्स आणि अक्षरांची आठवण झाली आणि राहून राहून तिला असच वाटू लागले कि तिथूनच आपल्याला काहितरी मार्ग सापडेल. पण तीला बाहेर जायची खूप भिती वाटत होती एकतर खोलीत भरलेला अंधार आणि आतापर्यंत घडलेल्या विचित्र घटनांनी बाहेर जाव कि नाही हाच विचार पक्का होत नव्हता. पण थोड्या वेळात काय झाले काय माहिती तीच्या डोळयांसमोर अधिराज आणि बाकिचे मित्र वाचवा वाचवा म्हणत असल्याचे भास होवू लागले तसं ती ने मनाचा निर्धार केला आता काहीही होवू दे आपण इथून बाहेर जायचच.

वीर समोर एक स्त्री उभी होती तिने त्याच्या हातात एक पुस्तक दिले आणि त्यातील मंत्रोच्चार करायला सांगू लागली. त्या पुस्तकातील भाषा काही वेगळीच होती वीरला काही

केल्या ती समजेना पण ती स्त्री मात्र जोरात ओरडून सांगू लागली अरे वाच हेच तुझ्या मित्रांना आता वाचवू शकते. वाच वाच म्हणू लागली पण अचानकच ती गायब होवू लागली आणि ते पुस्तक पण अदृष्य झालं आणि वीरच्या डोक्यावर कोणीतरी जोरदार प्रहार केला व खालील जमिन विभंगून तो खाली फेकला गेला...

अशाप्रकारे सगळेच एकमेकांपासून विभक्त झाले...

ते आजोबा तर हसू लागले आणि म्हणू लागले आता खरी सुरूवात झाली बदला घेण्याची....

6

# वाड्यातील मुलगा आणि  अनुश्रीच्या रूपातील तीचा उलगडा

कावेरी हळूहळू आपल्या बेडवर आजूबाजूला मोबाईल सापडतो का हे शोधू लागली. यावेळी मात्र आधीसारखा जरा ही विलंब न होता तिला पटकन मोबाईल सापडला.. पण ती ने जस टाइम बघितला तसं तिला आश्चर्याचा झटकाच बसला तीच्या घड्याळात तर सकाळचे दहा वाजलेले ती ने परत टाईम झोन चेक केला. पण टाइम झोन बरोबर भारतातलाच होता. तसं तर तीचा मोबाईल न स्वीच ऑफ झालेला आधी न बंद पडलेला मग टाईमींग बदलू कसं शकत. क्षणभर तर या विचारात गेली आणि लगेच भानावर आली. व स्वतः शीच म्हणाली असो कावू आता या सगळ्याचा विचार करण्याचा वेळ नाही आधी आपल्याला त्या झुंबराकडे गेल पाहिजे. तिथेच आपल्याला काहीतरी मार्ग मिळेल आणि जाता जाता बॅटरीच्या सहाय्याने बाकिचे इथेच आहेत का ते पण बघता येईल...

ती ने मोबाईलची बॅटरी लावली आणि आजूबाजूला पाहू लागली पण तिला तीच्या आणि अनूश्रीच्या व्यतिरिक्त खोलीत कोणीच दिसेना ते पाहूनच तिला प्रचंड घाम फुटला.. म्हणजे आपल्या स्वप्नात आलेली ती स्त्री खर बोलत होती सगळेजण मोठ्या संकटात अडकलेत.. आता आपल्याला थांबून नाही चालणार लवकर बाहेर जावून त्या झुंबराकडे जावून काय मार्ग मिळतो का ते बघितले पाहिजे व  तसेच आपले मित्र कोठे आहेत हे पण शोधल पाहिजे हे म्हणत ती पुढे जाणार तोच अनुश्रीने तिचा हात घट्ट पकडला. आणि तिच्यावर जोरात खेकासू लागली काय ग कावेरी कोठे चाललीस आणि परत नॉर्मल होत अग सकाळी जावू ना आपण खाली झोप आता... मला ना एकटीला खूप भिती वाटते ग इथे...  अनुश्री म्हणाली...

अग अनू पण बाकिचे कसे असतील ते पण बघितले पाहिजेच कि मी थोड्या वेळातच येते अग.... कावेरी म्हणाली...

ते काय नाही कावेरी तू थांब इथेच नको जावूस . .... अनूश्री परत विनवणीच्या सूरात म्हणाली...कावेरीला काय कराव कळेना शेवटी थोडावेळ थांबण्याचा निर्णय ती ने घेतला ती झोपेपर्यंत... थोड्या वेळात अनुश्रीला झोप लागल्याची कावेरीला जाणीव झाली आणि ती पुढे जावू लागली... आणि मागून परत अनूश्रीने मागे उठत तीचा हात धरला आणि पिरंगळायला सुरूवात केली आणि घोगऱ्या आवाजात म्हणू लागली काय ग तुला कळत नाही का? जावू नको म्हणल ते इथून आमच्या परवानगीशिवाय कोणीच बाहेर नाही पडू शकत आणि विचित्र आवाजात हसू लागली..... कावेरी प्रचंड घाबरली. तीला आजच अनूश्रीच वागण आधीच्या वागण्यापेक्षा जास्तच विचित्र वाटू लागल. पण तरीही ती विनवणीच्या सूरात अनूश्रीला समजवू लागली. ये अनू अग काय झाले आहे तुला मी तुझी मैत्रीण आहे ना मग माझ्याशी असं का वागत आहेस. प्लीज सोड ना मला अग आपल्या मित्रांचे जीव धोक्यात आहेत... प्लीज... प्लीज... सोड ना मला.... हो का अग पण हे ऐकायला तुझी अनू थोडीच जिवंत आहे ती तर कधीच अशा ठिकाणी पोहोचले जिथून परतनच अशक्य आहे... हे ऐकून तर कावेरी जागीच खोळंबली तिला खूप मोठा धक्का बसल्यासारख झालं... पण तरीही स्वतः ला कसं बस सावरत. ती तिला विचारू लागली... काय काय बोलतेस तू अनू अग चेष्टा करण्याची पण लिमिट असते तू तर माझ्या समोरच आहेस कि...ते ऐकून जोरात कावेरीला बाजूला ढकलत अनूश्री म्हणाली ये चल मी काय तुझी अनू नाही मी राणी आहे राणी या जंगलातल्या परिसराची आणि या घराची मालकीण असं सांगत मुळ रूपात येवू लागली तीचे केस पायापर्यंत वाढले तीचा चेहरा पूर्णपणे बदलू लागला ती चे डोळे पांढरे झाले त्यातील बुब्बुळच दिसेनाशी झाली तीच्या हातांची नखे खूपच मोठी झाली जणू काय एखाद्याचा गळा चिरू शकतील इतकी तीचा चेहरा सुरकुत्यांनी भरला तीच्या हातातून तर रक्ताची धार गळत होती अशा अवतारात तीला पाहून कावेरी जागीच बेशुद्ध पडली... याचा फायदा घेत ती स्त्री तिच्या कानाजवळ जात आधी

पुटपुटली या जंगलात जो अडकतो आम्ही त्यांना सोडत नाही आणि मग तसच पुढे जात जोर जोरात विचित्र हसत तिला ओढत ओढत कोठेतरी घेवून जावू लागली.......

वीरला जाग आली तसं तो आजूबाजूला बघू लागला. त्याच त्यालाच कळेना की नेमक आपण कोठे आलोय समोर तर दाट अंधारच दिसत होता आणि मध्येच एक कर्णकर्कश किंकाळी कानावर आली त्याच्या जीवाच घाबरून पाणी पाणी झालं तो त्या किंकाळीचा वेध घेत पुढे पुढे चालला तर समोर त्याला ज्या आजोबांनी आसरा दिलेला ते दिसले ते त्याला म्हणाले चांगल अडकवल ना तुम्हाला आता तुमची सुटका नाही आणि जोरजोरात हसू लागले व वीर काही विचारायला आला तोवर ते जागच्या जागीच गायब झाले... तोवर त्याला त्याच्या समोर एक दहा वर्षाचा मुलगा दिसला तो त्याला म्हणू लागला ये दादा आमच्या वाड्यात चल ना माझ्यासोबत खेळायला. तुला माहिती आहे माझे कोणीच मित्र नाहीत रे चल ना तु प्लीज... वीर तर भांबावून गेला होता त्याला आपण कोठे आलोय हेच कळेना आणि त्यात त्या आजोबांचे समोर आलेल ते नव रूप आणि नंतर अचानकच समोर आलेला हा मुलगा त्याला कळेना या मुलावर विश्वास ठेवावा कि नको ... पण त्याच्या मनात परत विचार आला नाही हा मुलगा कोणी दुष्ट शक्ती नक्कीच असू शकत नाही किती निरागस आहे हा... अगदी अधिराज सारखा त्याला त्या मुलाकडे पाहून अधिराजची आठवण झाली. अरे आपला आधी पण असाच बोलायचा ना खेळायची इच्छा झाल्यावर ... तो मुलगा परत म्हणाला ये दादा चल ना रे माझ्या सोबत खेळायला आमच्या वाड्यात.. माझ खेळून झालं कि परत तू तुझ्या घरी जा... वीरच्या डोळयात त्या वाक्यानेच पाणी तरळल त्याला कळतच नव्हते आपण नेमक कोठे पोहोचलोय आणि परत कसं जायच...

तो मुलगा परत म्हणाला ये दादा काय झालं रडायला. अरे काय नाही चल ना मी येतो आधी तुझ्यासोबत खेळायला आणि नंतर जातो माझ्या घरी...

वीर त्या मुलासोबत त्याच्या वाड्यात गेला तो वाडा तसा खूपच भव्य होता. त्याच्या भिंतीवर आधीच्या काळातील राजा, महाराजांची उठावदार अशी चित्रे कोरलेली

तसच त्या वाड्यात अनेक दालने होती. एके ठिकाणी राजाच राजसिंहासन होत जे सोन्याचा वापर करून बनवल होत... पण तो ते बघतच होता कि त्याच्यासमोरच त्या सिंहासनाच्या बाजूच्या भिंतींना आग लागू लागली... त्यासोबतच त्या मुलग्याच्या शरीराने पेट घेतला. वीर ओरडत त्या मुलाला वाचवण्यासाठी पळू लागला पण तो मुलगा म्हणू लागला दादा तू जे पाहतोयस ते आधीच घडलंय मी तुझी मदत करायला म्हणून तुला इथे घेवून आलो. हा वाडा जेव्हा इथे होता तेव्हाच हि जागा पवित्र होती. तिथून पुढे हि जागा नको तो व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिंनी हस्तगत केली व इथे अनेक कत्तली करून अशुद्धता निर्माण केली व अंधाराच राज्य निर्माण केले तू परवा जे पुस्तक पाहिलेस ते तुला याच जागी मिळेल. पण एक लक्षात ठेव हा वाडा फक्त एक तासच दिसतो व पुन्हा जमीनदोस्त होतो त्यामुळे तुला लवकरात लवकर ते पुस्तक शोधाव लागेल. आणि हो अर्धा तास तरी या वाड्यात कुठलीही दुष्ट शक्ती प्रवेश नाही करू शकत कारण या वाड्यातली अर्ध्या तासाची वेळ ही अतिशय पवित्र शक्तींची असते पण अर्ध्या तासानंतर  इथे अपवित्र शक्तींचा शिरकाव होतो व नंतर हळूहळू वाडा जमीनदोस्त होवू लागतो... त्या वाईट शक्तींनी प्रवेश करण्याआधीच तुला ते पुस्तक शोधाव लागेल नाहीतर खूप मोठ्या वाईट शक्तींशी सामना करत करत नंतर खूप अवघड झालेल्या परिस्थितीतून ते पुस्तक शोधाव लागेल पण तेव्हाही अर्धा तासच असेल जर त्याही अर्ध्या तासात तू बाहेर पडला नाहीस तर मात्र तुझा अंत निश्चित आहे...

अस म्हणून तो मुलगा हळूहळू गायब झाला...

7

# भोवतीचा विळखा

राज यंत्रवत चालत चालत पुढे जात होता आणि अचानकच त्याला समोर दिसणारे ते डोळे दिसेनासे झाले. तसा लगेचच तो भानावर आला व जस तो भानावर आला तसं त्याच्या मनात भितीने संचार केला कारण तो एका मोठ्या गुहेत पोहोचला होता त्याच त्यालाच कळेना की आपण नेमक कोठे आलोय आणि आपण इथे आलो तरी कस. तो त्या गुहेला निरखून पाहू लागला त्याला असं वाटलं कि कोठे ना कोठे इथून बाहेर पडण्याचा मार्ग नक्कीच असेल पण तो जसजस गुहा निरखून पाहू लागला तसं तस मनातून ढासळूच लागला. कारण तो ज्या गुहेत होता त्याला कोणतीच वाट नव्हती ती गुहा पूर्णपणे भिंतींनीच ग्रासलेली होती. पण त्याच्या मनात एकच प्रश्न येत होता जर गुहेला काही वाटच नाही तर आपण इथे आलोच कस. तेवढ्यात त्याच्या कानात एका स्त्रीच्या हसण्याचा आवाज घुमला. तसं तो दचकून आजूबाजूला पाहू लागला. तेव्हा त्याला एक नववारी साडी नेसलेली नाकात नथ पायात पैंजण आणि गळयात दागिन्यांची शृंखला असलेली पारंपारिक पद्धतीचा पेहराव केलेली एक स्त्री दिसली. ती चालत चालत त्याच्याच दिशेने येत होती. क्षणभर तर तो चक्रावूनच गेला. या गुहेत एक स्त्री कशी काय राहात असेल या विचाराने. तोवर ती स्त्री त्याच्याजवळ आली व त्याला म्हणू लागली शेवटी आलासच ना इथे.. तुला माहिती आहे का मी आधीपासून तुझी प्रतिक्षा करत आहे. कधी एकदा तु इथे येणार आणि मला तुझ्यासोबत खेळ खेळता येणार..

राज तर भांबावूनच गेला कारण त्याला कळेनाच कि ती स्त्री अशी का बोलत आहे तो तर विचारातच हरवला...अरे हि स्त्री कोण आहे. ही आपल्याला अशी का म्हणत आहे कि तुझी वाट पाहत होते. आपण तर या स्त्रीला कधीच पाहिलही नाही आणि या आधी इथे कधी आलो पण नाही मग तरीही ती आपल्याला शेवटी आलासच ना असं का म्हणत आहे. तोवर त्याची विचारांची तंद्री तोडत ती स्त्री म्हणू लागली. ये काय विचार करत

बसलास. आता नको विचार करत बसू नाहीतर आणखीनच फसशील... आता खेळ सुरू करण्याची वेळ झाली. राजला तर कायच समजेना म्हणून तो तिला त्या गोष्टींबद्दल काही विचारणार तोवरच अचानक सगळीकडे अंधारच अंधार पसरला त्याला ती गुहाच काय पण ती स्त्री सुद्धा दिसेना.. पण तीचा आवाज मात्र घुमू लागला पण यावेळीचा आवाज खूपच विचित्र होता ती म्हणू लागली झाला आता खेळ सुरू झाला... तुला बाहेर कधीच न पडू देण्याचा... आणि शेवटी कायमच संपवण्याचा हा हा हा हा.....

राज तर मनातून खचत चालला होता तरीही त्याने सारा धीर एकवटला व आता जे होईल त्याला धैर्याने सामोरे जायच असं ठरवल....

राज तसाच हात पुढे करत करत समोरच्या भिंतींचा मागोवा घेवू लागला. पण त्याला आजूबाजूला भिंती असल्याच जाणवेनाच एकतर अंधार दिसत होता त्यात हाताला काहीच लागेना. तोवर अचानकच वाऱ्याचा जोर जास्तच वाढू लागला आणि त्याचे पाय आपोआपच जमिनीवरून वर वर जावू लागले. तो तसाच वाऱ्याच्या जोराने इकडे तिकडे हवेतच विहरू लागला त्याच त्याच्या शरीरावरच नियंत्रणच जणू कमी झालं.. आणि अचानकच शरीर परत जड झालं आता त्याला जास्त गारवा जाणवू लागला व त्याचे श्वास जड झाले जणू काय आजूबाजूला पाणीच भरल आहे त्याच्या तोंडात पाणी जावू लागले पण त्याला ओकारी आल्यासारख होवू लागल व दुर्गंधही जाणवू लागला. मध्येच क्षणभर थोडा उजेड दिसला मग मात्र त्याची बोबडीच वळली कारण त्याच्या आजूबाजूला रक्ताची नदी होती. त्यातलच पाणी त्याच्या नाका तोंडात जावू लागल होत. पण तरीही तो जीव वाचवण्यासाठी तरंगायला हात पाय हालवण्याचा प्रयत्न करू लागला. तोवरच तेथील एका वृक्षाने त्याच्या पायाभोवती वेटोळे घालायला सुरुवात केली... तो जोर तर लावू लागला पण काही केल्या त्याला पाय हलवता येईना.. जणू काय त्याच्या पायांनी त्याची साथच सोडून दिली...

कावेरी हळूहळू शुद्धीवर येवू लागली. तर तिच्या डोक्यात जोरात कळ मारू लागली. ती आजूबाजूला पाहू लागली पण तिला काहीच दिसेना ती ला काही वेळापूर्वीचा

तो सर्वच्या सर्व प्रसंग डोळयासमोर दिसला व ती पुन्हा एकदा मनातून हालूनच गेली. पण तरीही पुन्हा आपल्या मित्रांच्या आठवणीने तसच ते अडचणीत आहेत या जाणीवेनेच स्वतः ला सावरू लागली. व हळूहळू उठण्याचा प्रयत्न करू लागली. पण तीच्या डोक्याला प्रचंड मार लागल्याला त्यामुळे वर उठता उठता वेदनेने पुन्हा खाली बसायची. पण ती ने कसाबसा धीर एकवटला व सावधगिरीने आजूबाजूचा अंदाज घेत पुढे पुढे जावू लागली. ती थोड पुढे गेली तोवर तिला कोणाचातरी विव्हळण्याचा आवाज येवू लागला. ती हळूहळू त्या आवाजाचा वेध घेत पुढे पुढे जावू लागली. व काही क्षणातच जिथून आवाज येत होता तिथे पोहोचली. ती समोर तशीच बघू लागली पण स्पष्टपणे काहीच दिसत नव्हत. कारण तिथे अंधार ठासून भरलेला फक्त अस्पष्टसा प्रकाश दिसत होता. तीला त्या अस्पष्टश्या प्रकाशाच पण थोड आश्चर्य वाटू लागल कारण बराच वेळ झाला तिला प्रकाशच दिसला नव्हता जणू काय अंधारानेच राज्य करायला सुरुवात केली होती पण आता थोडा का असेना प्रकाश दिसत होता. ती  त्या अस्पष्ट दिसणाऱ्या प्रकाशातून समोर पाहू लागली तर तीला तिथे एक त्यांच्याच वयाचा मुलगा पाठमोरा दिसला पाठीमागून त्याचा शर्ट ती ने पाहिला आणि तीच्या डोळयात अचानकच पाणी तरळू लागल.

कारण ती च्या समोर अधिराज बसला होता. पण तो अधिराजच आहे का? याची थोडी शंका पण तिला येवू लागली कारण आधी पण अनुश्रीच्या रूपात तिला ती बाई दिसलेली. ती ने तसच थोडस घाबरत घाबरत आवाज दिला. अधी ये अधी... पण समोरून काही प्रतिसादच येईना तरीही जर हा आपला अधीच असेल तर कारण आवाज त्याचाच भासत होता म्हणून ती पुढे पुढे जावू लागली तोवर अधी मागे वळला त्याला पाहताच तीला असंख्य वेदना होवू लागल्या तो रडत रडत तीच्याकडे बघू लागला. त्याच्या हातावर जखमाच जखमा होत्या. एक पाय तुटलेला. डोळे पांढरे झालेले अशा अवस्थेत तो तीच्यासमोर रडत थांबलेला. तीला तर काय करायच तेच समजेना पण तरीही ती त्याला विचारू लागली. ये अधी हे काय आहे काय झालं तुला...ती ने असं विचारल्यावर मात्र तो जोरात हसत हसत सांगू लागला त्यान त्यान मारल मला त्याला आपला बदला घ्यायचा

आहे आता आता तुमची वेळ आहे तो तुम्हाला पण नाही सोडणार आणि विचित्र आवाजात हसू लागला... आणि परत परत तो तुम्हाला पण सोडणार नाही असं म्हणत म्हणतच गायब झाला... कावेरी तर रडूच कोसळल ती स्वतः शीच म्हणाली नाही नाही नाही आमच्या अधीला काहीच नाही होवू शकत आणि आता ज्याला बघितल तो अधी असूच शकत नाही कारण त्यासोबत जरी काही वाईट झालं तरी तो आमच्याबद्दल असं नाही बोलणार... कारण कारण त्याचा आमच्यावर त्याच्यापेक्षा पण जास्त जीव होता... आणि परत तीच्या डोळयात अश्रू दाटून आले...

तोवर वरून पुन्हा एक आवाज घुमू लागला. अरे काय हे एवढा एवढा विश्वास आपल्या मित्रावर चांगल आहे शेवटपर्यंत काय तुमचा विश्वास हरणार नाही वाटत पण काही का असेना तुम्ही आता भेटूच नाही शकणार मित्र मित्र करत असच कायमच जीवाला मुकणार. मी सोडणार नाही तुम्हाला तुम्ही माझे काम अर्ध्यात बंद पाडलेला आता बघा एकमेकांच्या भेटीसाठी किती तडफडवतो आणि असच खेळवून खेळवून तुम्हाला कायमच संपवतो हा हा हा हा.... अचानकच कावेरीला पण काय झालं काय माहिती ती न घाबरता बोलू लागली. नाही नाही नाही मी माझ्या मित्रांना काही होवू देणार नाही काही ही करून आम्ही एकमेकांना भेटणारच शेवटच का असेना आम्ही एकमेकांना भेटूनच आमचे प्राण त्यागणार.... आणि परत तो विचित्र आवाज घुमू लागला अरे अरे ही ही ही इथे आमचीच सत्ता चालते. इथून आम्ही कोणालाच बाहेर नाही जावू देत. गेल्यावेळी गेलता कसतरी पण यावेळी आम्ही त्याचा बदला घेणार आमची शक्ती वाढली आहे नाही जावू देणार आणि तुम्हाला भेटू पण नाही देणार... आणि अचानक कावेरीला अशक्तपणा जाणवू लागला जणू काय कोणीतरी तिच्यातली शक्तीच खेचून घेत आहे. पण तरीही ती आपल्यात जेवढी क्षमता शिल्लक आहे तेवढ्या क्षमतेने पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागली. व अचानकच खालची जमीन हादरू लागली व कावेरीचा तोल जावू लागला.

आता तर कावेरी पूर्णपणे  खचून जावू लागली.

# 8 भ्रमपाश आणि मोह

अनुश्री काही मार्ग सापडतो का? हे शोधू लागली. ती पुढे जावू लागली तोवर तिला एक फुलांचा हार करणारी एक स्त्री समोर दिसली तसं तर तीला प्रश्न पडला रात्रीच्या अंधारात हि स्त्री हार कसं काय करत बसले... ती तिच्याजवळ जावून तिला विचारू लागली काकि इतक्या रात्री आपण हार कसं काय करत आहात... त्यावर ती स्त्री विचित्र पद्धतीने हसत म्हणाली.. अग हे तिरडीसाठी करत आहे... आणि हसू लागली... अनुश्रीला थोड विचित्रच वाटलं पण आपल्याला काय करायचे आहे असं म्हणत ती ने तो विषय तिथेच सोडून दिला... व पुन्हा तिला विचारू लागली इथून बाहेर पडण्याचा काही मार्ग आहे काय? तुम्ही ये जा करत असाल ना म्हणून विचारल त्यावर ती स्त्री मोठमोठ्याने हसू लागली... आणि तिला म्हणाली काय इथून बाहेर पडण्याचा मार्ग..... अग इथे येणाऱ्याचा मार्गच संपतो...

आणि तु बाहेर पडण्याचा मार्ग विचारालेस हा हा हा हा...... अनुश्रीला वाटलं या बाईला वेड लागलय वाटत म्हणून असं बडबडतेय आपण हिला विचारूनच चूक केली आपणच शोधू आता मार्ग... अग मला कसल वेड लागतय तुम्हीच वेड होशीला..... अनुश्री दचकलीच हिला मनातल कळत कि काय.... मनातलच काय इथल्या प्रत्येकाची हालचाल कळते आम्हाला.... आणि परत हसू लागली... अनुश्रीला आता तिची भिती वाटू लागली म्हणून ती तिथून दुसरीकडे जावू लागली... ती थोड पुढे गेली... तिथे तिला चार वेगवेगळे मार्ग दिसू लागले... ती ने आधी पहिल्या मार्गाने जायच ठरवल... ती पहिल्या मार्गावरून जावू लागली... थोड्या अंतरावर गेली तोवर तिला आश्चर्य वाटलं मगाशी जी स्त्री ज्या झाडाखाली बसलेली ती तिथेच आलेली... व परत समोर चार मार्ग दिसत होते... ती ने आता दुसऱ्या मार्गावरून जायच ठरवल व ती जावू लागली...

थोड अंतर पार केल्यासारख वाटलं म्हणून ती ने मागे पाहिले तर पुन्हा ती तिथेच होती जिथे तिला ती स्त्री दिसलेली... यामुळे ती तर खच्चत चाललेली पण तरीही स्वतः

ला धीर देत. आपल्याला आपल्या मित्रांना भेटायचे असेल तर हार नाही मानायची असं मनाशी ठरवत होती... ती ने आता तिसऱ्या मार्गावरून जायच ठरवल व पुढे जावू लागली... परत ती ने काही अंतर पार केल्यावर मागे वळून पाहिले तर परत एकदा तिला झटकाच बसला कारण ती परत त्याच ठिकाणी होती जिथून ती पुढे गेलेली... मनातली हिंमत तर तुटत चाललेली... पण तरीही मित्रांना भेटायचे म्हणून ती पुढे जावू लागली चौथ्या मार्गाने पण यावेळी सुद्धा ती तिथेच होती... तिला कायच समजेना कि हे काय होतय... ती तशीच ओरडली अरे इथून बाहेर पडण्याचा मार्गच नाही काय? तोवर परत त्या स्त्रीचा आवाज घुमला... इथे आल्यानंतर मार्ग बंदच होतो... ते ऐकून तर अनुश्रीचा उर भरून आला... तीच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले... आता कसं बाहेर पडायच... एकतर शरीरातले त्राण संपत आलेले आणि आता मनातले त्राण पण संपत आलेले... तसच पाण्यावाचून जीव तळमळू लागलेला... ती तशीच खाली ढासळली...

थोड्या वेळाने ती च्या कानात एक आवाज हळूवार पद्धतीने तिथल्या गवतालाही कळणार नाही अशा पद्धतीने कुजबुज करू लागला ... ये बाळा अग इथे का कोलमडून पडलेस तिथे तुझे सगळे मित्र अडचणीत आहेत... त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग मी तुला सांगू शकते पण तुला माझ्यापर्यंत पोहोचावे लागेल त्यासाठी तुला योग्य मार्ग ओळखावा लागेल व जरी मार्ग चूकला तरी येणाऱ्या अडचणींचा सामना करत परत येथे येवून परत सुरूवात करावी लागेल. पण तु आता जी चूक केलीस ती तुला टाळावी लागेल... तु पुढे जाऊन पुन्हा मागे पाहिलेस तर पुन्हा चकव्यात अडकशील तुला पुढे जायच आहे मागे न वळता. उठ लवकर उठ तुझे मित्र अडचणीत आहेत. जर तु हार मानलीस तर कोणीच नाही वाचणार उठ.... मित्रांचा प्राण जाईल या वाक्यानेच अनुश्री ताडकन उठली.

ती ने मनाशी ठरवल आता आपल काहीही होवू दे आपण लढायचच.... ती परत विचार करू लागली नेमक कोणत्या मार्गावर जायच. कोणता मार्ग आपल्याला तिच्याकडे घेऊन जाईल... पण इथे उभं राहून ते समजन शक्यच नव्हते तिला प्रत्येक मार्गावर जावून शहानिशा करण गरजेचच होत... परत ती ने पहिल्या मार्गावरून जायच ठरवल... ती पुढे

जावू लागली यावेळी ती ने मागे पाहायच टाळल आणि पुढे पुढे जावू लागली... अचानकच तिला समोर हाडांचे सापळे दिसू लागले ते तिच्यावर झडप घालू लागले. एक सापळा तीचा पाय पकडू लागला व दुसरा तिचा हात पकडू लागला ती त्यांना बाजूला हटवू लागली. तरीही ते तिच्या मागेच लागले ती परत माघारी वळू लागली तर एकाने तिला जोरात मागे ओढले... आणि ते बोलू लागले... असं कसं आमच्याशी खेळण्याआधीच तु बाहेर जाशील आ... बाकिचे पण तिच्या भोवती गर्दी करू लागले... थोडावेळ तर ती गोंधळूनच गेली पण परत आता काय करायच हा विचार करू लागली तसं ती ने इथे आल्या आल्या एक गोष्ट नोटीस केलेली.. हे सापळे त्या पाण्यापाशी जावून परत येत होते त्याच्यातला एक सापळा तर पाण्याला पाहून घाबरूच लागला आपल्याला यांना तिथे घेऊन जाव लागेल व पाण्यात पाडाव लागेल... ती तिच्यात असलेली शक्य तेवढी ताकद लावून त्यांना ढकलत पुढे पुढे जावू लागली तरीही ते तिच्या हाताला पायाला वेढा घालत होती ती पूर्ण ताकदीनिशी त्या पाणी साचलेल्या मोठ्या खड्ड्यापाशी आली लागलीच त्यात जावून उभी राहिली. ज्या सापळ्यांनी ती चे हात पकडलेले ते ओरडतच बाजूला होवू लागले व बाकिची पण बाजूला जावू लागली... आता ती ने स्वतः ला पूर्ण भिजवून घेतल व शक्य तितक बळ एकवटून पुन्हा त्या मार्गावरून मागे गेली...

ती पुन्हा हार करणारी स्त्री दिसलेल्या ठिकाणी गेली... परत तिला समोर चार मार्ग दिसू लागले... आताच घेतलेल्या अनुभवामुळे ती प्रचंड घाबरलेली. ती ने एक सुस्कारा सोडला.. पुढचा मार्ग तपासावा कि नको अशी संभ्रमित अवस्था झालेली तिच्या मनाची... दुसरा मार्ग यापेक्षा भयानक असेल तर असा विचार पण आला तीच्या मनात तोच त्या हळू आवाजात कुजबूजलेल्या स्त्रीच बोलवण आठवल... आणि मित्रांच्या काळजीने ती ने पुन्हा ठाम निर्णय घेतला... आणि दुसऱ्या मार्गावरून जावू लागली मागे न बघता... ती चालत चालत दुसऱ्या मार्गावरून आत गेली. पण समोर पाहिल्या पाहिल्या तीच्या उरात धडकीच भरली... समोर डोळे नसलेली, कान नसलेली, जख्मांनी भरलेली काही मृत शरीर तिथे एकमेकांना मारत बसलेली. अनुश्रीला पाहून ती भलतीच खुश झालीत आता आपली भुख

मिटनार म्हणून नाचू लागली... ती जीभ चाटत चाटत तीच्या जवळ येवू लागली... तीला वाटलं आता काय आपल खर नाही... पण तीच मन तिला सांगू लागल. नको नको हरू तु तुझे मित्र संकटात आहेत..ती त्यांच्याशी हातापायी करू लागली. पण त्यांची संख्या जास्त असल्यामुळे तिची ताकद कमी पडत होती... त्यातील एका मृत शरीराने तीचा हात चावला त्यातून रक्त गळू लागल ते पाहून ती आणखीच चवताळली. तरीही ती मनाला समजावत होती काहितरी मार्ग नक्कीच सापडले तोवर ती च लक्ष त्या समोर जळून राख झालेल्या चितेकडे गेल ती तशीच त्यांच्याकडून सुटका करण्याचा प्रयत्न करत करत तसच ताकद लावत लावत त्यांना दूर ढकलून पळत धडपडत त्या चितेपाशी गेली व त्या राखेत हात घालून ती ने ती राख सगळ्यांवर फेकली तशी ती किंचाळत जळू लागली... नंतर ती परत मागे जात जात आधीच्या ठिकाणी पोहोचली...

आणि पुन्हा मनात निर्धार करून तिसऱ्या मार्गावर जायच ठरवल तोवर तीला आपल्या मागे ती स्त्री गुरगुरत उभी आहे असं जाणवल. तीला क्षणभर वाटलं मागे वळून बघाव पण ती ने ते कटाक्षाने टाळले. त्या स्त्रीला तिला तिसऱ्या मार्गावर पोहोचू द्यायच नव्हत म्हणून ती तिला मागून पकडायला गेली तोवर तीचा हात पोळला... अनुश्रीच्या लक्षात आले मगाची राख थोडी तशीच आहे म्हणूनच असं असाव... ती मागे न बघताच तिसऱ्या मार्गावरून जावू लागली... या मार्गात मात्र तिला वेगळीच अनुभूती जाणवली... मस्त फुलांचा सुगंध सुटला होता.. आजूबाजूला वेगवेगळी रोप डूलत होती... तीच्या समोर एक रक्षक आला तो तिला म्हणू लागला चला ना राजकुमारी तुमच्यासाठी काही सोनारांना बोलवल आहे ते तुमच्यासाठी हिरे, मोती आणि पाचूपासून बनवलेले दागिने घेऊन आलेत... चला ना ते पाहून तर ती मंत्रमुग्ध झाली पण ती ने लगेच स्वतः ला त्या मोहापासून दूर ढकलत मनाला समजवल नाही अनू तुझ्यासाठी तुझे मित्र हेच सगळ्यात अनमोल आहेत तुला त्यांना वाचवण्यासाठी त्या स्त्रीची भेट घ्यायची आहे... ती च्या मनात हा विचार आला तोच समोरच दृष्य गायब झालं व समोर एक स्त्री दिसू लागली...

## 9

# अनुश्रीचा निर्णय व लपलेले गूढ

अनुश्री त्या स्त्रीकडे पाहून स्तब्धच झाली. तिला तिच्याकडे बघून अस्पष्ट अशी दृष्य दिसू लागली पण व्यवस्थितरित्या आठवेना कि हि नक्की कोण आहे.. पण तिला तिच्याविषयी आपलेपणाची भावना जाणवू लागली त्याच कारण तिलाच माहिती नव्हत... ती तर नेमक आपल्याला या स्त्रीविषयी आपलेपणा का जाणवतोय याचा विचार करत होतीच कि त्या स्त्रीने तीच्या डोळ्यासमोर चुटकी वाजवून तिला भानावर आणले...

काय ग? कसला एवढा विचार करतेस... तीच्या या प्रश्नाने अनुश्री गोंधळलीच ...

न न न नाही कसला नाही...

बर मला वाटत तु खूप थकली असणार आतापर्यंत ज्या संकटांना तोंड देवून आलीस त्यामुळे तु आत चल आपण थोड मोकळ होवून बोलू तसही अजून धोका टळला नाहीय... त्यामुळे जास्त वेळ बाहेर थांबन धोक्याच आहे... आत गेल्यावर सुरक्षितरित्या मला तुझी मदत करता येईल...

बर चला मग चालेल आपण आत बोलू असं म्हणून अनुश्री ती च्या पाठोपाठ जावू लागली...

अनुश्री जाता जाता आजूबाजूच दृष्य न्याहाळू लागली... इथे अंधाराच प्रमाण थोड कमी होत त्यामुळे तिला मनातून थोड हायस वाटू लागल अधिराज हरवल्यापासून म्हणजे त्या जंगलात आल्यापासून त्यांना फक्त अंधारच दिसला होता.

तीला तिथे जाता जाता थोडी सकारात्मकता जाणवू लागली त्या परिसरात असंख्य नारळाची झाड होती, भोपळीचा वेल होता, पक्ष्यांची घरटी होती एका झाडावर तर एक

पक्षी आपल्या पिल्लांच्या चोचीत दाणा भरत होता तिला ते पाहून सगळ्या मित्रांची आठवण येवू लागली ते पण असच एकमेकांना घास भरवत रोज जेवायचे. ती च्या डोळ्यात तर नकळत पाणीच येवू लागल... तोवर ती स्त्री तिच्या जवळ येवून तीच्या पाठीवर हात ठेवत म्हणाली.. धीर नको हरू सगळ ठीक होईल... तसं अनुश्रीने त्या स्त्रीला मिठीच मारली.. का माहिती का पण तिला त्या स्त्रीला पाहिल्या पासून अपार माया जाणवत होती तिला तिच्या मिठीत पण माया जाणवली...

ती त्या स्त्रीसोबत एका खोलीत गेली.. तसं अनुश्री विचारू लागली बर आता मला सांगाल का मी माझ्या मित्रांना कसं वाचवू ते...

अग थांब खूप थकली असशील थोड पाणी पिऊन घे आणि थोड जेवून घे... ती स्त्री म्हणाली...

तस अनुश्री म्हणाली नाही नको मला काही जाणार नाही मला आता माझ्या मित्रांना भेटायच आहे. तसं तर ते पण अन्न पाण्यावाचून तळमळत असतील...

अग मी समजू शकते सध्या तुला तुझ्या मित्रांव्यतिरिक्त काहीच सुचत नाही पण जरा बघ किती अशक्तपणा दिसालाय चेहऱ्यावरूनच थोड काहीतरी खा...

नाही नको मला काहीच नको...

बर पण थोडा सरबत तरी घे माझ्या समाधानासाठी तरी थोडी ताकद येईल तुझ्यातच...

आता अनुश्रीला ती ला नकार देण जमल नाही कारण ती इतक्या कठीण काळात आपली मदत करत आहे व आपल्याला धीर पण देत आहे ते बघून ....

अनुश्री ने त्या स्त्रीने दिलेला सरबत संपवला तसं त्या स्त्रीला बर वाटलं... आता ती स्त्री अनुश्रीशी बोलू लागली...

बर ऐक आता मी तुला जे सांगणार आहे ते लक्ष्यपूर्वक ऐक खरतर मी तुला आता भुतकाळ सांगणार आहे... मला तुला मार्गच सांगायचा होता पण आमच्यावर काही बंधन

आहेत त्यामुळे मी तुला डायरेक्ट मार्ग नाही सांगू शकत... पण तुला भुतकाळातूनच बऱ्याचशा गोष्टी समजतील... आणि हा तुम्हाला इथून बाहेर पडण्यासाठी एकत्र तर याव लागेल... तसं तु एकटी बाहेर पडू शकतेस कारण तु या मार्गापर्यंत पोहोचलेस... जर तुला एकटीला बाहेर पडायच असेल तर सांग तुला आता बाहेर काढू शकते मी त्यामुळे तुझा जीव धोक्यात न येता सहीसलामत बाहेर पडशील तु...

नाही भलेही कितीही संकटात अडकायला लागू दे मला माझ्या मित्रांना सोडून एकट बाहेर पडायच नाही... गेलो तर सगळेच बाहेर जावू... हे ऐकून त्या स्त्रीच्या डोळयात पण पाणी आलं ती मनातच म्हणाली तुमच्या मैत्रीतील हे प्रेमच तुम्हाला यातून बाहेर काढेल व आमची पण मुक्तता करेल...

ती स्त्री आता अनुश्रीला भुतकाळ सांगू लागली...

आजपासून पाच वर्षा आधी घडलेली घटना आहे... या जंगलात राहायला एक माणूस आला. खरतर तो खूप विचित्र आणि पाषाणहृदयी होता.. तो लहान लहान मुलांना उचलून आणायचा त्यांच्याकडून जबरदस्ती कुकर्म करून घ्यायचा व नंतर त्याच मुलांना दूर ठिकाणी नेऊन विकायचा व भरपूर पैसे कमवायचा... यातूनच त्याने एक भव्य घर बांधल व सोन्या चांदीच्या वस्तू तयार केल्या... त्याचे हे कारनामे दोन वर्ष चालू होते... पण दोन वर्षानंतर अशी एक घटना घडली कि त्यांना ती मुले तर गमवावी लागलीत व स्वतः चा जीव पण गमवावा लागला... सोबतच त्याच्या बायकोचा पण अंत बघावा लागला...

अनूश्री विचारू लागली पण असं काय झालं नेमक दोन वर्षानंतर सांगते ऐक... त्यांनी दोन वर्षांनंतर असच मैदानात खेळणाऱ्या सहा मुलांना उचलून आणल त्यांना कसं फसवून एकदम उचलून आणल हे तर नाही माहिती पण त्यांना उचलून आणल हे मात्र खर....

ती मुल जवळजवळ सात वर्षाची होती पण हा खूपच हुषार होती. ती मुल जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा पहिल्यांदा तर खूप घाबरली तिथल ते सगळ दृष्य पाहून ती हरामी

माणस त्या मुलांना दगडावर हातोडीने जस घाव घालावेत तसं लोखंडाने यांनी जस सांगतील तसं केल नाही तर मारायचेच मारायचे... ती सगळी मुल खूप हतबल झालेली... त्यात आता हि सहा मुल त्यांच्या हाती लागलेली... पण त्या माणसाला मात्र ती मुल कशी आहेत हे नाही जाणवल ती मुल बाकिच्या मुलांपेक्षा चालाख होती फक्त सात वर्षाची असून पण...

इकडे त्या मुलांची आई त्यांना शोधत होती सारख पोलिसात जावून विचारणा करत होती पोलिस पण त्यांचा शोध घेत होते...

त्या मुलांना एका वेगळ्या खोलीत डांबून ठेवले होते. नंतर बंदोबस्त करता येईल म्हणून...

ती मुलग खिडकीतून रोज त्या गोष्टी बघायचे कि कसं त्यांच्याकडून नको ती काम करून घेतली जातात कसं त्या निष्पाप मुलांना छळल जात... त्यांनी त्या मुलांना बाहेर काढायच ठरवल...

त्यांनी त्या माणसाकडे जे लोखंड पाहिलेल ते हळूच आणायच असं ठरवल पण कसं आणायच हा एक प्रश्न होता. त्यानूसार त्यांनी एक योजना बनवली... ते एकमेकांवर जस दहीहंडी करायला उभे राहतात तसे राहिले व उंचावर असलेली खिडकी उघडली त्यातून त्यांनी त्यांच्या एका मित्राला पळत जाऊन पोलिसांना घेऊन यायला सांगितले... व दुसऱ्या मित्राला लोखंड घेऊन येण्यासाठी पाठवल ते दोन्ही मित्र चालाख होते एक जण नजर चुकवत चुकवत खरच पोलिस स्टेशनमध्ये गेला.. व दुसरा लोखंड घेऊन हळूच दरवाजा उघडून आत आला.. अचानकच त्या माणसाची बायको त्यांच्या खोलीपाशी आली तसं ती ला ते दार बाहेरुन उघड असल्याच दिसल... तीच्या मनात संशय डोकावला व ती दार उघडून आत आली. व पाहते तर सगळे जण गाढ झोपलेले तिला वाटलं ती चा नवराच कडी लावायची विसरून गेला व ती ने बाहेर जावून कडी लावली...

तोवर त्यांच्यातली एक मुलगी म्हणू लागली अरे आता काय करायच दार तर उघडता नाही येणार मग यांना बाहेर कसं काढायच असा विचार करत असतानाच त्या मुलीला एक आइडिया सुचली ती ने लगेच ती सगळ्यांना सांगितली...

ती जोरजोरात दरवाजा ठोठावू लागली वाचवा वाचवा म्हणून तसं त्या माणसाची बायको लगेच पळत तिथे आली ति ने दरवाजा उघडला व विचारू लागली काय ग थेरडे काय झालं तुला एवढ्याने ओरडायला तसं ती म्हणली वॉशरूम वॉशरूमला जायचय... तसं ती स्त्री चल माझ्या मागून ये असं म्हणू लागली व पाठमोरी वळली तसं ती ने ती च्या डोक्यात ते जे कसल लोखंड होत ते घातल.. ती तशीच बेशुद्ध पडली तसं त्यांनी त्या मुलांना बाहेर काढल व बाहेर पाठवल ती मुल पळत पळत बाहेर गेली... आता ही पोर पण जाणार होती तोच ती त्या माणसाची बायको शुद्धीवर आली... व तो माणूस पण तसाच दारात उभा होता चिडलेल्या अवस्थेत...

# 10 मुलांची सुटका

ती पाच जण तिथून पळून जाणार तोच समोर तो माणूस चिडलेल्या स्वरूपात उभा होता आणि त्याची बायको सुद्धा शुद्धीवर आली होती. बाकिची मुल तिथून कधीच पसार झालेली त्यामुळे त्या माणसाच्या चेहऱ्यावर प्रचंड राग दिसून येत होता या सगळ्यांना खाऊ कि गिळू असं झालेल त्यांना...

ती सगळी तर पुरती गोंधळून गेली आता पुढे काय करायच हेच त्यांना कळेना...

मागून पळाव तर त्या माणसाची बायको त्यांना पकडायला जवळ येत होती.. आणि पुढून तो माणूस पुढे पुढे सरकत होता... ते विचारातच हरवले होते...

तोवर तो माणूस त्यांच्या जवळ जवळ येवू लागला.. त्याने मागे घेतलेला हात पुढे केला तर त्याच्या हातात एक चाकू दिसत होता तो हसत हसत जवळ येत म्हणाला पहिल्यांदा कोणाकडे जावू आज खूप हात शिवशिवालेत तुम्ही माझा चांगला चाललेला धंदा बंद पाडत आणलात आता आता तुमची खैर नाही मी तुम्हाला जावूच देणार नाही...

अस म्हणत तो त्यातल्या एका मुलावर चाकू चालवायला गेला तोच एक गोळी येवून त्याच्या हातातून आरपार गेली. तसं त्याच्या हातातला चाकू पण धाडकन खाली पडला... तो वेदनेने जोरात ओरडला...

त्याच्या मागे पोलिसांची एक टोळी उभी होती. ते पाहून तो माणूस प्रचंड तापला त्याने पोलिस पुढे येण्याआधीच झालेली वेदना विसरून त्यांच्यातल्या एका मुलाला पळत पुढे पुढे जावून गळयाभोवती हाताच वेटोळे करत धमकी दिली.. जर तुम्ही माझ्या जवळ आलात तर या मुलाचा अंतच झाला... तो मुलगा तर प्रचंड घाबरला पहिल्यांदा त्याच्या बाबतीत असं घडत होत..

पोलिस सोड सोड त्याला असं म्हणतच होते...पण तरीही

तो त्याला तसच ओढत ओढत मागच्या दारातून दूर नेवू लागला. त्याने डोळ्यांनीच बायकोला पण एक कसला तरी इशारा केला तसं ती थोड पुढे गेली आणि एका जागी ती ने पाय आदळला तसं एक फरशी उचलली गेली ती ने सगळ्यांना काय कळायच्या आतच त्या चौघांना आत ढकलेले आणि स्वतः पण आत घुसली... हे पाहून ते पोलिस तिथे जावून फरशी उचलू लागले... त्यांनी ती फरशी उचलली व ते सुद्धा आत घुसले...

त्या माणसाची बायको त्या मुलांना घेऊन बांधू लागली तिला ते पोलिस पण तिथे येत आहेत याचा अंदाज आला नाही कारण ती जास्त वेगात फरशी उचलून पुढे पुढे जात होती... ती एके ठिकाणी थांबली व त्या मुलांचे हात पाय बांधले व तशीच समोरच्या एका भिंतीसमोर जावून काही शब्द उच्चारून त्यातून बाहेर गेली...

इकडे तो माणूस त्या मुलाला घेऊन दूर दूर जावू लागला.. त्याला थोडी पण कल्पना नव्हती की त्याच्या मागून दबक्या आवाजात एक स्त्री येत होती. ती त्या माणसाची नजर चुकवत चुकवत पाठलाग करत होती...

एके ठिकाणी तो माणूस आला आणि त्याने एका झाडाला त्या मुलाला बांधले... आणि म्हणू लागला. थांब आता इथेच तसं तुला मारणारच होतो पण तुम्हाला सगळ्यांना एकदम मारण्यातच लय मज्जा येईल. हा हा हा... असं म्हणत म्हणत पुढे गेला... तो माणूस गेल्याबरोबर तिथे एक स्त्री आली ती ने या मुलाच्या हाताला बांधलेले दोर सोडले...

तो मुलगा म्हणू लागला आय आय तू तू इथे काय करतेस...

आर लेकरा काय हे काय झाले तुला कोण आहे तो माणूस... असं का पकडल तुम्हाला त्याने...

अग आई ते सांगतो मी पण आधी हे तर सांग तू कशी आलीस इथे

अरे ते मी पोलिसांना रोज विचारायला जायची पोलिस स्टेशनमध्ये तुझ्या बद्दल तेव्हा त्यांनी खूप तपास केला पण तुम्ही कोठे नाही सापडला.. आणि परवा तुझा मित्र

पोलिस स्टेशनमध्ये आला आणि त्याने तुम्ही कोठे आहात तिथे काय काय घडले ते सगळ सांगितले...

ते ऐकून पोलिसांनी तिथे मला पण बोलवल आणि आम्ही तुमच्या मुलाला शोधून आणतो असं म्हणल पण मला राहवलेच नाही. मला पण घेऊन चला असच म्हणत राहिले... तेव्हा ते एका अटीवर तयार झालेले कि ते सांगे पर्यंत मी त्या ठिकाणी पोहोचल्यावर आमच्यासोबत यायच नाही... त्यांनी या लोकांना समजू नये म्हणून साधी गाडी आणली ... जीचा जास्त आवाज होत नाही अशी...

इथे आल्यानंतर मी बरीच वाट पाहिली पण त्यांनी आवाज नाही दिला म्हणून मी दरवाज्यातून हळूच बघू लागले. तर तुला तो माणूस दूर नेत होता... मागच्या दरवाज्यातून... मी पुढून पाठलाग करत करत येते आले... ती हे सगळ सांगत होती तोपर्यंत कोणतरी तिथे येत असल्याचा आवाज आला. ते ऐकून ती त्या मुलाची आई त्याला घेऊन दूर जाऊ लागली...

ती दोघेही पळत पळत पुढे जावू लागली...

एके ठिकाणी ते पोहोचले तोच समोर तो माणूस आणि त्याचा एक साथीदार त्यांच्याकडे बघून हसू लागले... ते तसेच पुढे त्यांच्याकडे येवू लागले.. ते पाहून तो मुलगा आणि त्याची आई दुसरीकडून पळू लागले... पण तोपर्यंत त्याची बायको पळत पळत तिथे आली आणि तिने त्या मुलाच्या आईला पकडल आणि त्या माणसाच्या साथीदाराने त्याच्या मुलाला पकडल आणि ओढत ओढत दूर नेवू लागला... तो मुलगा मागे वळून वळून आईकडे बघू लागला.त्याची आई पण भरल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहू लागली... साथीदाराने त्या मुलाला दूर नेल्यावर तो माणूस त्याच्या आईकडे पुढे सरसावला व प्रचंड वेगाने त्याच्या आईवर चाकू चालवला तोच तिथे पोलिस पोहोचले त्यांनी समोरचा प्रसंग पाहून त्या माणसाच्या हातात गोळी घातली... तो परत जोरात ओरडला... व बायकोकडे बघत खुणेनेच काही सूचना केल्या...

ती तशीच धावत मुलांच्या कडे जावू लागली ती विसरूनच गेलेली कि आपल्याला ती फरशी उचलताना पोलिसांनी पाहिलेले आपण मुलांना त्या खोलीत ठेवून तसच आलो जर पोलिस तिकडे गेले तर त्यांची सुटका करतील... हा विचार करत करत ती पुढे जातच होती कि काही  पोलिसांनी प्रसंगावधान राखून त्यांची क्रूरता लक्षात घेऊन गोळयांचा मारा केला... ती तशीच ढासळली कारण गोळया तिच्या छातीतून आरपार गेलेल्या... ते पाहून तर तो माणूस प्रचंड ओरडला व तसच पोलिस जवळ येण्या आधीच त्याच्या आईला ज्या चाकूने मारल तो परत हातात घेऊन स्वतः च्याच पोटात घुसवला व विचित्र पद्धतीने हसू लागला... व त्या मुलांकडे पाहून जोरात ओरडला याचा बदला मी घेणारच हा हा हा...

तोपर्यंत काही पोलिस त्या चार मुलांना घेऊन तिथे आले...  त्यांच्यातली एक मुलगी त्या स्त्रीकडे पाहून जोरात रडू लागली... तिला बाकिचे मित्र तसच सावरू लागले... नंतर त्यांना त्याच्या एका मित्राची आठवण झाली... त्यांनी लगेच पोलिसांना सांगितले की आमचा एक मित्र येथे नाही  आहे... ते पाहून पोलिस आणि बाकिचे मित्र त्याला शोधू लागले... ते शोधत शोधत एका झाडाजवळ गेले तर त्यांना बेशुद्धावस्थेत त्यांचा मित्र सापडला... त्याला पाहून त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता दूर झाली...

त्याला शोधल्यानंतर काही पोलिस त्या मुलांना घेऊन तिथून बाहेर पडले... व काही त्या माणसाच्या आणि त्याच्या बायकोच्या मृत झालेल्या शरीरांकडे जावू लागले... ते त्या ठिकाणी गेले पण त्यांना त्या माणसाच आणि त्याच्या बायकोचे मृत शरीर सापडलेच नाही... तरीही त्यांनी खूप शोध घेतला पण काही उपयोग नाही झाला..

नंतर त्यांनी शोध घेणच बंद केले कारण तसही ती सगळी मुल वाचलेली आणि ती दोघ मेलेली फक्त प्रेतच सापडेनात पण बाकिच्यांना काही त्रास नाही होणार आता म्हणून शोध घेणे बंद केल...

# 11

# तिची भेट ...गूढता

त्या स्त्रीने सांगितलेला भूतकाळ ऐकून अनुश्री म्हणाली. ते दोघे नवरा बायको तर मेले ना मग परत हे सगळ का चालू झाले .. त्यावर ती स्त्री सांगू लागली. हा ते दोघे शरीराने गेले पण पूर्णपणे नाही मिटले.. पोलिसांनी त्या माणसाच्या बायकोला तर गोळ्या घातल्या तसेच त्या माणसाने स्वतः ला मारून घेतले म्हणून पोलिसांना वाटले की आता काही वाईट करायला कोण उरल नाही सगळे गुन्हेगार संपले. पण त्या माणसाच्या साथीदाराबद्दल कोणालाच काही माहिती नव्हते. फक्त त्या मुलग्याच्या आईला आणि त्या मुलग्याला माहित होत. पण त्या मुलग्याची आई सध्या हयात नव्हती आणि तो मुलगा पण तिथे नव्हता..

त्या माणसाच्या साथीदाराने त्या मुलग्याला एक ठिकाणी सोडले. व पोलिस जेव्हा त्या मुलांना घेऊन त्याच्या मित्राला शोधण्यासाठी गेले तेव्हा त्या साथीदाराने त्या मुलाच्या आईची हत्या झालेल्या ठिकाणी येवून तिथून त्या नवरा बायकोची प्रेते उचलली व त्या घरात जावून तेथील पंख्याखालच्या जागेत पुरली.. व त्यावर स्वतः च्या मंत्र साधनेद्वारे मातीवर त्याचे रक्त सांडून ती माती त्यावर टाकली व नंतर ती प्रेत काढता यावीत यासाठीचा एक विचित्र शब्द कोड्या स्वरूपातला फॅनच्या झुंबरवर अशा पद्धतीने कोरला कि तो त्या झुंबरावरची नक्षी असल्यागत वाटावा..

त्या माणसाच्या साथीदाराने त्या मातीवर मंत्र साधना केली असल्यामुळे कोणालाच ती माती उकरता येत नाही. ती माती दूर करण्यासाठी त्या शब्दाचा अर्थ कळला पाहिजे. व त्या दोघांचा कायमचा नाश करण्यासाठी एका पुस्तकाची गरज लागते. त्या पुस्तकात असे मंत्र आहे जे मृतात्म्यांस कायमची शांती देते. पण ते पुस्तक मिळवण खूप

अवघड आहे.. तसच त्या फॅनजवळच्या ठिकाणी पोहोचण सुद्धा अवघड आहे कारण तो माणूस आणि त्याची बायको तिथपर्यंत कोणाला पोहोचू देत नाहीत. अनुश्रीला त्या आजोबांचे ओरडणे आठवले...

म्हणूनच आधी तुम्हाला त्या झुंबरावर जो शब्द लिहिला त्याचा अर्थ पण शोधावा लागेल.

पण ते पुस्तक आम्हाला कोठे मिळेल आणि त्या शब्दाचा अर्थ ... अनुश्री विचारू लागली...

ते मी नाही सांगू शकत आम्हाला मर्यादा पडतात. पण एक आहे तुम्हाला हे सगळ करण्यासाठी एकत्र याव लागेल... अनुश्री म्हणते हा मी नक्की त्यांना शोधेन...

अचानकच ती स्त्री आणि तिथली जागा अदृष्य होवू लागली. तसं ती स्त्री मिळाली. माझी आताची या जागेवरची वेळ संपत आली. आता बघू आपली भेट होते कि नाही ते पुढे...

अनुश्री ... थांबा ना थांबा तुम्ही कोण आहात ते तर सांगा असं म्हणू लागली...

तेव्हा ती स्त्री म्हणाली आधी तुमची लढाई पूर्ण होवू दे मग तुम्हाला सगळ्या गोष्टी समजतील आणि अनूश्रीला माझा आशिर्वाद तुमच्या पाठिशी आहे असं म्हणत गायब झाली... तसं अनुश्रीच्या डोळयात पाणी भरून आले... अचानकच तिथल सगळ वातावरणही इतर ठिकाणच्या वातावरणासारख भयावह होवू लागल... आजूबाजूच्या झाडावरची पाने गळू लागली. पक्षी जागच्या जागी फांद्यांवरून खाली पडू लागली... सगळीकडे काळोख पसरू लागला... वेगवेगळे भयावह आवाज कानी ऐकू येवू लागले... तिथूनच काळया आकृत्या फिरू लागल्या... त्यातच भर म्हणून की काय वारा बेफाम होऊन वाहू लागला... समोरच वातावरण पाहून अनूश्रीच्या हृदयात धडकीच भरली... तरीही ती ने मनाचा निर्धार केला... तिला आता इथून काळया आकृत्यांना चकवा देत बाहेर पडावे

लागणार होते आणि ती जिथून आली होती तिथे पोहोचून मित्रांचा पण शोध घ्यावा लागणार होता...

ती तशीच हळूहळू वृक्षांचा आडोसा घेत घेत पुढे जावू लागली.. मनात तर भिती डोक वर करत होती.. पण ती मित्रांना आठवून काय होईल ते होईल आता असं म्हणत जावू लागली...

ती पुढे पुढे जावू लागली.. झाडाच्या मागून लपत छपत जावू लागली... तोवर एका झाडावरून अचानकच एक आकृती तीच्या समोर आली... तिला तर समजेनाच कि आता काय करायच... तोवर ती ने खालचा एक दगड उचलला आणि त्याच्या दिशेने भिरकावला. तसं ते किंचाळू तसच विव्हळू लागल.. तिला वाटलं आता आपल्याला पुढे जाता येईल... पण त्या आकृतीचा आवाज ऐकून बाकिच्या आकृत्या पण तिच्याभोवती गर्दी करू लागल्या... ते पाहून तर तिला प्रचंड भिती वाटायला लागली... पण काहीही झाले तरी आता आपण थांबायच नाही असं मनोमन ठरवून खालचा आणखी चार दगड स्वतः भोवती गोल फिरत हातातून पटकन भिरकावल्या तशा काही आकृत्या दूरच झाल्या तसं अनूश्री ज्या बाजूने आकृत्या कमी झाल्याला त्या बाजूने पळत पळत पुढे जावू लागली...

पण झाल्या प्रकारामुळे त्या आकृत्या जास्तच चवताळल्या पण अनूश्री मनातली भिती घालवून तशीच पुढे पुढे पळत जावू लागली... एका आकृतीने अनूश्रीच्या पायाचा चावाच घेतला तीच्या पायातून रक्त ओघळू लागले... तरीही ती ने झटकन पाय जोरात ढकलून त्या आकृतीला स्वतः पासून दूर केल व पळत राहिली... थोड पुढे गेली तोच समोर एक झाड धाडकन खाली पडले. ती तशीच एका कडेने पुढे गेली.. तोच त्या झाडाची फांदी तीच्या भोवती गोळा होवू लागली... ती ने जोर लावत त्या फांद्या बाजूला केल्या... व परत आजूबाजूचा वेध घेत घेत पुढे जावू लागली... असं पडत धडपडत ती जिथून आलेली ती हारवाली स्त्री जिथे बसलेली तिथे परत आली...

पण आता तिच्यासमोर एक अडचण होती ती म्हणजे आपल्या मित्रांना शोधायचे कसे. कोठे असतील सगळे... तोवर तिला तो चौथा मार्ग आठवला... पण तिच्या मनात बऱ्याच शंका उपस्थित झालेल्या कारण तीन्ही मार्गावर वेगवेगळे अनुभव आलेले... दोन मार्गावरचे अनुभव तर भयावह होते... तिसरा मार्ग पण ती स्त्री गेल्यावर खूपच भयानक होता... आणि कशावरून कि ते चौथ्या मार्गावरून गेल्यावर आपल्याला भेटतील...

पण आपल्याला एकदा प्रयत्न करायलाच हवा. तसही इथं बाकिचे काही दिसतच नाही... म्हणून ती ने चौथा मार्ग तपासण्याचा निश्चय केला...

अधिराज पळत पळत पुढे चालला होता... त्याला तो कोठे चाललाय तेच समजत नव्हते... पण मित्रांना भेटण्याची एकच इच्छा त्याला पळत राहण्याच्या इच्छेला बळ देत होती... तो पळत होता. अचानकच समोर धडकला... तर समोर कावेरी होती... तिला पाहून अधिराजला खूपच आनंद झाला पण आधी तर ती च्या चेहऱ्यावर कसलेच भाव नव्हते.. पण तरीही नंतर ती ने चेहऱ्यावर हास्य आणल.. ती चे हास्य अधिराजला थोड विचित्र वाटलं पण तरीही खूप दिवसांनी कोणी तरी भेटल. एका तरी फ्रेंडला भेटता आले या विचारात त्याच्या मनातली शंकाच विरून गेली...

कावेरी अधिराजला रडव्या आवाजात म्हणू लागली अरे हे काय झालेय तुला.. इथे कोठे आला आहेस तू... तुला माहिती आहे किती शोधल आम्ही तुला पण तू इथे बसलायस... ते ऐकून अधिराजला पण रडू कोसळल... तो पण त्याच्यासोबत काय काय झालं ते सांगू लागला... कावेरी तर मनातच म्हणू लागली याला काहीही करून अनूश्री म्हणजेच ती मुलगी इथे पोहोचायच्या आत दूर नेल पाहिजे.. काहीही करून हे एकत्र येता कामा नयेत... त्यासाठी थोड नाटक चालू ठेवून याला वेगळ्या मार्गावर नेल पाहिजे...

कावेरी त्याला म्हणू लागली.. ये अधिराज चल ना आपण इथून बाहेर पडू...

अधिराज म्हणाला पण इथून कसं बाहेर पडायच आपल्याला तर काही मार्ग माहिती नाही... पण मला माहिती आहे... कावेरी म्हणाली...

काय पण तुला कसं माहिती.. अधिराज ने विचारल...

ते मी तुला शोधत शोधत इथे येताना सगळे मार्ग बघून ठेवले म्हणून मला माहिती आहे... कावेरी म्हणाली... आता मात्र अधिराजला थोडी शंका आली.व मनात भयाची भावना डोक वर काढू लागली पण त्याने तिला ते जाणवू दिले नाही... त्या ने एकदा खात्री करून घ्यायचे ठरवले... त्याने मध्येच एक वाक्य म्हटल तेरी मेरी दोस्ती... त्याला अपेक्षित होत कि कावेरीने पुढच वाक्य उच्चाराव पण तसं झालंच नाही.. उलट ती त्याला म्हणली हे काय बोलतोयस तू अधिराज आपण बाहेर पडूया चल लवकर ...

आता मात्र अधिराजने ओळखल कि ही कावेरी नाहीच आहे... कारण ते वाक्य ते दोघ कधी कधी इतरांना चिडवण्यासाठी म्हणायचे... त्यांच्यासाठी ते मैत्रीतल एक गोड वाक्य होत.. ते चिडवण्यासाठी तसच नेहमी कोठे फिरायला जाताना म्हणायचे...

आणि असं कधी व्हायचच नाही कि ते वाक्य उच्चारल्यावर त्याचे मित्र शांत बसलेत. ते ते वाक्य पूर्ण करायचेच... पण त्याला आता हा प्रश्न पडलेला हि जी कोण व्यक्ती ती नेमक का त्रास देत आहे. आधी माझेच रूप घेऊन एक मुलगा आलेला आणि आता कावेरीच...

आता या नकली कावेरी पासून दूर कसं जायच... तसच आपल्या मित्रांना शोधायचे कसे...

मन तर खूपच तडफडत होत मित्रांना भेटण्यासाठी तसच आपले मित्र ठिक असतील ना या काळजीने...

12

# शोध पुस्तकाचा

वीरच्या समोरून तो मुलगा हळूहळू गायब होतो तसं वीर एकीकडून गोंधळून जातो आणि एकीकडून त्याचे डोळे अश्रूंनी भरून येतात. काही क्षण तो स्तब्धच उभा राहतो पण जस मित्रांची आठवण येते तसं लगेच स्वतः च्या भावना आवरतो आणि ते पुस्तक शोधण्यासाठी तयार होतो... तो वाडा तो मुलगा गेल्यानंतर पूर्वस्थितीत येतो. त्याला तर ते सगळ अविश्वसनीयच वाटत... पण जास्त विचार न करता तो पुन्हा स्वतः ला सावरतो. त्याला काहीही करून अर्ध्या तासात ते पुस्तक शोधायचे असत नाहीतर त्याच्यासाठी पुस्तक शोधण जास्तच अवघड होवून बसणार होत.. तो वाड्याच निरीक्षण करत करत पुढे जातो. तो सुरूवातीला वाड्यातील वरच्या खोलीत जातो.. पण जस ती खोली पाहतो तसा गोंधळूनच जातो.. वरची जी खोली होती त्या खोलीला फक्त दरवाजेच होते चार भिंतींना चार दरवाजे होते. त्या खोलीत मोजकच सामान होत. एक मोठा टि.व्ही होता, आणि त्याच्याच समोर एक बेड होता...

तरीही त्याने त्या टि.व्ही च्या आजूबाजूला बघितल तसच त्या बेडवर बघायला गेला तोवर तो बेड बेड न राहता सिंहासनाच्या रूपात परिवर्तीत झाला.. ते पाहून तर त्याला समजल की हा वाडा फक्त वाडाच नाही तर मायावी सुद्धा आहे. तो दरवाज्यापाशी गेला तर तो कपाटात परावर्तित झाला.. त्याला आधी पुस्तक शोधण सोप असेल असं वाटलेल पण ते जास्तच अवघड होत कारण त्या हे तर समजलेले कि एक तर अर्ध्या तासात कोणत्याही अडचणीशिवाय पुस्तक शोधता येईल किंवा नंतरच्या अर्ध्या तासात दुष्ट शक्तीशी लढून पुस्तक शोधाव लागेल नाहीतर आपला अंत आहे. पण तो वाडा मायावी आहे हे आताच समजलेल..

आता तो प्रत्येक दरवाजा तपासू लागला. एक एक दरवाजा हळूहळू एका वस्तूत परिवर्तीत होवू लागला जेव्हा दरवाजा वस्तूत परिवर्तीत व्हायचा तेव्हा त्या वस्तूत ते पुस्तक शोधायचा. पण त्याला काही केल्या ते पुस्तक सापडेना.. तरीही तो हार न मानता शेवटच्या दयवाज्याजवळ जातो. तो त्याला हात लावतोच तोवर तो दरवाजा बाहेरच्या दिशेला खोलला जातो आणि त्याचा पाय घसरतो.. तो खाली पाहतो तर तो जमिनीपासून खूप उंच अंतरावर असतो... आणि हिंदकळत असतो.. पण तरीही हात दरवाज्याला घट्ट पकडून तो हळूहळू वर येतो व झाल्या प्रकाराने चांगलाच हादरतो कारण जर त्याचा हात निसटला असता तर तो त्या उंचावरून खालीच पडला असता व जीवाला मुकला असता...

त्याला तर ती कल्पना करूनच घाम फुटला... पण तरीही त्याने स्वतः ला सावरल. त्याला काहीही करून अर्ध्या तासात पुस्तक शोधायच होत म्हणून... तो आता वरच्या बाजूच्याच दुसऱ्या खोलीत जावू लागला... तो त्या खोलीत गेला तसं त्याला वेगळीच अनुभूती आली या खोलीत नुसत्या वस्तूच भरल्या होत्या... समोर रिकामी अशी जागा पण नव्हती... वेळ तर सरत चालला होता... तो तसच पुढ्यातली वस्तू बघायला गेला तर त्या खोलीत पाणीच भरल ते पाणी हळूहळू वाढू लागल तरीही तो पुढे जावू लागला. त्याने पुढच्या वस्तूला हात लावला तर ती एका पक्षाच्या रूपात परिवर्तीत झाली व खोलीतून बाहेर निघून गेली... असं प्रत्येक वस्तू बघून झाल्यावर तो तिथून बाहेर पडला... त्याचा वेळ तर संपत चाललेला पण काही केल्या पुस्तकच सापडत नव्हत... त्याला कळाल तर होत कि तो वाडा मायावी आहे... तो आता तीन नंबरच्या खोलीत जातो.. तिथे गेल्यावर त्याला फुलांचा सुगंध येवू लागतो... क्षणभर तर तो त्यात हरवून जातो... पण इथे काय नसणार उगाच शोधून वेळ घालवायला नको कारण इथे फुलांचाच वास येत आहे आणि नुसत झाडे दिसत आहेत. कदाचित अंगण असाव खोलीच रूप देवून फुलवलेल असं म्हणून तो तिथे न शोधता पुढे निघून जातो.. त्याला वाटलं निसर्गाच्या रूपात काही मायारूपी नसणार...

तो आता खाली येवू लागतो... त्याच्या हातातले पंधरा मिनट संपून जातात आता त्याच्या कडे पंधरा मिनिटे उरलेली असतात नाहीतर दुष्ट शक्ती प्रवेश करणारच असतात...

तो वेळ ओळखून भरभर खाली येतो... आता तो खालील एक नंबरच्या खोलीत म्हणजेच सभामंडपात पोहोचतो... सभामंडपात दोन्ही बाजूंनी सिंहासन असतात व मध्ये राजाच सोन्याचा वापर करून बनवलेल सिंहासन असत... तो आता ती बाजूची सिंहासन तपासू लागतो. पण जस तो त्या सिंहासनाला हात लावतो तसं त्या सिंहासनावर सेनापती उभा ठाकतो... तसच बाजूच्या सिंहासनावर पण राजाच्या दरबारातले लोक बसलेले दिसतात ते पाहून तर त्याच्या मनात भितीचाच प्रसार होतो... तोवर सोन्याच्या सिंहासनावरून आवाज येतो... कोण रे कोण आहेस तू आणि आमच्या राज्यात काय करतोयस... त्यावेळी वीर थोडक्यात पाच मिनिटात त्या मुलाने सांगितलेली माहिती सांगतो...

अच्छा तर तुला पुस्तक हवे आहे... राजा विचारतो..

हो ... वीर म्हणतो...

बर आम्ही तुला एक मार्ग दाखवू शकतो. तसं त्याचे दोन मार्ग आहेत आणि पहिल्या मार्गावर गेल्याशिवाय दुसरा मार्ग सापडत नाही... पण तुला आमचा विश्वास जिंकावा लागेल... कारण इथे येणारे काही दुष्ट लोक पण असतात जे चूकिच्या गोष्टींसाठी पुस्तक मिळवू पाहतात... राजा म्हणाला...

पण माझ्याकडे वेळ खूप कमी आहे महाराज मी कसं तुमचा विश्वास जिंकू त्या कमी वेळात कारण पुढे मग पुस्तक शोधायला पण वेळ लागणार.... वीर म्हणाला...

हिच तर कसोटी असते... पुस्तक मिळवण्याची ती तुला पार पाडावीच लागणार... आम्ही असाच विश्वास नाही ठेवू शकत कोणावरही...सिंहासनावरील राजा म्हणाला...

बर मग मला काय कराव लागेल तुमचा विश्वास जिंकण्यासाठी ते तर सांगा... वीर म्हणाला

बर ऐक तू जिथे उभा आहेस तिथून पुढे दहा पावलांवर गेलास कि तिथून डाव्या बाजूला वळ तिथली जागा उकर त्याखाली आमच एक नाणे आहे ज्याच्यात पवित्र शक्ती

आहे... ते नाणे फक्त मन साफ असणाऱ्या व्यक्तीच हातात घेवू शकतात जर ते दुसऱ्या कोणी हातात घेतल तर ते राख होऊन जात... राजे म्हणाले...

तस वीर पाय मोजत मोजत दहा पावलांवर जातो आणि तिथून डाव्या बाजूला वळतो... आणि बोटाने एक निशाण बनवतो व थोड्या दूर अंतरावर असलेले फावडे उचलतो... मनातच म्हणतो बर झालं हे तर लगेच सापडल नाहीतर फावड शोधण्यातच वेळ गेला असता... तो परत बोटाने निशाण बनवलेल्या जागी येतो व तिथली माती उकरून काढतो तसं त्याला त्या खाली ते नाण सापडत. तो ते हातात घेतो व परत सभागृहात जावू लागतो... या प्रक्रियेत त्याची दहा मिनिटे निघून जातात आता फक्त पाच मिनिटे शिल्लक असतात... तो भरभर सभागृहात पोहोचतो... ते सभागृहातले दरबारी, सेनापती, राजा सगळेच खूष होतात... ते त्याला म्हणतात आता तू पुस्तक शोधायला जावू शकतोस...

पण तुम्ही मला एक मार्ग दाखवणार होता ना... वीर म्हणाला...

अरे आम्ही तर तुला केव्हाच मार्ग दाखवलाय आता तुला तो फक्त ओळखता आला पाहिजे... सेनापती म्हणाला.

तसा वीर अवाकच झाला... क काय कोणता मार्ग...

तो विचारू लागला तोच उरलेले पाच मिनिटे संपून गेली आणि ती सभागृहातली सगळीच गायब झाली... ते पाहून वीरला एकिकडून राग आला. तो मनातच म्हणाला काय हें नी मला मार्ग दाखवला पण कधी... त्याचे तर डोक सुन्न झाले तसच मनात भयाची लाट उसळली. कारण अर्धा तास पूर्ण झाला होता...

आता जे संकट पुढे येईल त्याला सामोरे जावे लागणार होत.

# 13

# आवाजातली उर्जा

वीरला दरदरून घाम फुटला. अर्धा तास तर होवून गेलेला आता त्याच्या हातात फक्त अर्धा तास शिल्लक होता. तसच आता समोर काय येईल याची पण त्याला थोडी धासती वाटत होती. तिथे अचानकच अंधार पसरला जणू काय कोणीतरी प्रकाश गिळूनच टाकला. तो दरबारही रिकामा झालेला. खालची जमीन हादरू लागली. व वीरच्या कानावर एक आवाज येवू लागला. तसं त्याच मन जास्तच अस्वस्थ झाले.

वीर ये वीर वाचव वाचव मला...... राजचा आवाज त्याच्या कानी येत होता...

तो हळूहळू येणाऱ्या आवाजाचा वेध घेत त्या अंधारात चाचपडत पुढे चालला...

तोपर्यंत दुसऱ्या बाजूने आणखी एक आवाज येवू लागला...

वीर वीर इकडे ये ना आधी हा हा माणूस मला मारायला येतोय बघ ये ना लवकर प्लिज... अनुश्रीचा रडवेल्या स्वरूपात आवाज येत होता...

त्याला कळेना नेमक कोठे जाव आधी दोन्हीकडून दोन दोघे जण त्याला बोलवत होते...

तोपर्यंत अचानकच त्याच्या पाठीमागून कोणीतरी जोरात धावत गेल तो तर गरकन मागेच वळला... पण जसा मागे वळला तसा त्याचा तोल गेला कारण तो जिथे उभा होता तिथून खाली जीना होता... तो त्या जिन्यावरून घरंगळत खाली गेला.. त्याला जागोजागी खरचटल... परत त्याला आवाज ऐकू आला... ये वीर ये ना इकडे प्लिज वाचव मला ही बाई माझ्याकडे चाकू घेऊन येत आहे. ये ना प्लिज... तो जिथे होता तिथून काही अंतरावरून अधिराजचा आवाज कानी येत होता... त्या येत्या आवाजाने परत तो तसच स्वतः ला

सावरत उठला... अचानक वीरला काहितरी क्लिक झालं व तो मोठ्याने म्हणाला तेरी मेरी यारी.... यावेळी मात्र सारे आवाजच बंद झाले.. व एक मोठ्याने हसण्याचा आवाज येवू लागला... तसच विचकळत बोलण्याचा... हुषार हुषार हाइसा र पोरांनो पर तुमची हुषारी फार नाय चालायची... जरी एकमेकांना वळकत असशीला तरीबी तुम्हची भेट नाय व्हायची... इथं आमचच राज्य हाय... आणि अचानकच वीर जिथे होता तिथे एक जंगली श्वापद येवू लागल. वीरला मात्र याची खबरच नव्हती कारण तिथे फक्त अंधारच दिसत होता... ते जंगली श्वापद त्याचा वास घेत घेत त्याच्याकडेच झडप घालण्यासाठी येत होत... ते श्वापद जास्तच जवळ आलं तसं वीरला त्याचा आवाज येवू लागला... त्याने तसच सार बळ एकवटल आणि दुसऱ्या बाजूने जावू लागला...

तो तसच धडपडत पुढे जावू लागला तसं त्याला परत आठवण झाली कि आपल्याकडे वेळ खूपच कमी आहे. काहीही करून आपल्याला यांचा सामना करत पुस्तक शोधलच पाहिजे...

तो पुढे जातच होता कि एक काळी आकृती त्याच्या जवळ आली व तीने त्याचा पाय जोरात ओढला. तो आहे तसाच मागे पडला ... परत जिथे खरचटल होत. तिथे त्या काळया आकृतीच्या नखाने परत वार केला तसं त्याची ती खरचटून बाहेर आलेली खपली बाहेर आली व त्यातून रक्त बाहेर येवू लागल तसं वीरला जोरात कळ आली तरीही त्याने मनाशी केलेला निश्चय ढळू दिला नाही त्याने त्या आकृतीला जोरात बाजूला ढकलल. तसं ती दूरच फेकली गेली व हवेत तरंगत तरंगत परत त्याच्याकडे येवू लागली.. त्याला ती आकृती परत येत आहे हे जाणवताच तो तसाच एके ठिकाणी एका वस्तू असल्याच्या जाणीवेने त्या वस्तूला स्पर्श करून पाहिले तेव्हा त्याच्या लक्षात आले की तो बेड आहे तो तसाच चाचपडत त्या बेडखाली गेला..

त्याला वाटलं ती आकृती जाता क्षणी बाहेर पडूया पण तिथे तर आणखी एक संकट त्याची वाट पाहत थांबलेल तो जिथे होता... तिथेच एका बाजूला एक प्रेत होत. जे त्याला पाहून खुष झाले.. वीरला याची जरा पण कल्पना नव्हती... तो धाप टाकत तसाच

थांबलेला... त्याने हातात एक चाकू घेतलेला... त्याने वीर वर चाकू फिरवायला हात पुढे केला... तोच वीरला कोणीतरी जोरात बाहेर ओढल.......

कावेरीची हालत खराब होत होती तरीही ती ने स्वतः ला सावरल तिला काहीही करून इथून बाहेर पडण्याचा मार्ग शोधायचा होता... कावेरी तशीच स्वतः ला आधार देत डोक्याला लागलेल्या वेदनेचा स्वतः लाच विसर पाडण्याचा प्रयत्न करत तशीच पुढे पुढे चालली होती... अचानकच तिचा पाय एका खड्ड्यात गेल्यासारखा खाली गेला... त्यामुळे ती खाली घसरत गेली... तिला आपण कोठे आलोय हे तर कळले नाही पण आपण कोणत्यातरी खडड्यात फसलोय असं मात्र जाणवल. त्याचबरोबर आता यातून आणि कसं बाहेर पडायच याची चिंता मनात डोकावू लागली...

नको नको हरवू कावू तुम्हाला एकत्र यायच आहे.. तू जिथे आहेस तिथून समोर चालत जा. तिथे पाण्याचा आवाज येईल... त्या भिंतीला लागून पलिकडे तुला मार्ग सापडेल... पण तुला ती भिंत पाडावी लागेल... हे काम खूप अवघड आहे... पण तुला आपल्या सगळयांसाठी करावच लागेल... आणि हो त्या नदिपाशी मार्ग सुद्धा आहे आणि धोका सुद्धा आहे... तुला सावध राहून मनाला विचलीत न होवू देता... तिथे जायला हव... कारण त्या नदीमुळेच मार्ग सापडत जरी असला तरी तिथली जमीन, नदितल पाणी, पक्षी, प्राणी, तुला घेता येत असलेला श्वास, वर पसलेल आकाश, त्यातल्या चांदण्या.. इतकच नव्हे तर तिथ गेल्यावर तुझ स्वतः च शरीर सुद्धा तुला मारण्यासाठी आसूसलेल असू शकत कारण ती जा सगळ्यात जास्त शापित आहे... म्हणूनच तिथे जो कोणी जाईल तो शापितच होतो... त्यासाठी तुला इथेच तयारी करून जाव लागेल... असं म्हणून तो आवाज ऐकू यायचा बंद झाला...

तस कावेरी विचारू लागली... कोण कोण तुम्ही आणि माझी मदत का करत आहात...

ते आता महत्त्वाच नाही आहे. वेळ आली कि कळेलच...

कावेरी परत सांगा ना कोण ते विणवू लागली... पण तो आवाज बंदच झाला...

कावेरी विचार करू लागली आता हे काय नवीनच त्या झुंबरापर्यंत पोहोचणारच होतो तोपर्यंत त्या बाईने इथे आणल... आणि आता हा आणि कसला मार्ग म्हणायचा. असली कसली ही आपली फरफट चालले...

हो फरफट तुमच्या सगळयांची चालली आहे पण काय तर करण्यासाठी फरफटाव पण लागत आपल्याला आणि आपल्या समोर जितक्या अडचणी येतात तितकेच मार्ग पण असतातच पण आपण अडचणींकडे इतक लक्ष देतो काही वेळेला समोरचे किंवा जवळचे मार्ग पण पाहू शकत नाही... परत तोच आवाज कावेरीला ऐकू आला...

कावेरी मनातच म्हणू लागली.. यांचा आवाज कोठे तरी ऐकल्यासारखा वाटतोय.. पण कोठे...

त्याचा आता विचार करू नको... ते समजेलच तुला... सांगेन मी स्वतः च पण आता बाहेर कसं पडायचा याचाच विचार करा तुमच्याकडे वेळ कमी आहे... तुझ्या मित्रांना काही होण्याआधीच तुला त्यांच्यापर्यंत पोहोचाव लागेल... चल जाते आता मी माझी वेळ संपली असं म्हणून तो आवाज परत बंद झाला...

कावेरी आता तिथपर्यंत पोहोचण्याबाबत विचार करू लागली.... तिला त्या ऐकू आलेल्या आवाजाने जणू नवीनच ऊर्जा मिळालेली तसच पुन्हा एकदा विश्वास निर्माण झालेला आपण बाहेर पडू शकतो असा...

14

# अनुवीरची भेट

ए अनू तु तु इथे कशी पोहोचलीस... नाही तु पण कोणीतरी दुसरीच आहेस मगाचपासूनच सगळ्यांच्या आवाजाने दुसरच कोणीतरी बोलत आहे तु तु पण अनू नसणारच आमची नक्कीच त्या माणसाने तुझ रूप घेऊन कोणाला तरी पाठवल असणार.... वीर म्हणाला...

अरे गप्प शांत हो नाहीतर आपला आवाज त्यांना ऐकू जाईल... अनूश्री वीरला समजवू लागली...

नाही खोट आहे हे सध्या तर विश्वासच बसत नाही आहे माझा... वीर म्हणाला...

तेरी मेरी दोस्ती... असं म्हणत अनूश्रीने वीरच्या तोंडावर हात ठेवला... व म्हणाली... शांत हो हे वाक्य पूर्ण नको करू आताच आपल्याला सगळ्यांनाच आधी एकत्र याव लागेल... जर हे वाक्य त्यांना ऐकू गेल तर एकमेकांना ओळखण नंतर अजूनच अवघड होईल... कारण ते त्याचाही वापर करतील....

अस म्हणत अनूश्रीने वीरच्या तोंडावरचा हात काढला...

पण तु इथे कशी पोहोचलीस पण थॅंक्स गॉड तुझी तरी भेट झाली... मी तर नाउमेदच झालेलो कि आता आपली भेट होणारच नाही म्हणून... असं म्हणता म्हणता वीरच्या डोळ्यात अश्रू तरळले... ते पाहून अनूश्रीच्या डोळ्यातही अश्रू तरळले... त्यांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली...

पण परत वीरच्या लक्षात आले की वेळ कमी होत चाललाय...

बर अनू तू इथे कशी पोहोचलीस ते सांग ना.... वीर म्हणाला.

हो हो सांगते पण नंतर आधी बाकिच्यांना शोधूया का आपण आपल्याकडे वेळ खूपच कमी आहे... अनूश्री म्हणाली...

हो शोधूया पण आधी आपल्याला पुस्तक शोधाव लागेल... त्याची वेळ संपत आली आहे... वीर म्हणाला...

हो मला पण त्या स्त्रीने पुस्तकाच सांगितले... अनूश्री म्हणाली...

कोण कोण स्त्री कोण भेटल तुला... वीर विचारू लागला...

सांगते सांगते सगळ नंतर पण आधी पुस्तक शोधूया...

हो शोधूया ... वीर म्हणाला

कसे कसे आले ते दोघ एकत्र सांगितलेल ना त्यांच्यापैकी कोणालाच एकत्र येवू द्यायच नाही... तो म्हातारा समोरच्या बाईला ओरडून म्हणत होता...

हा मी मी तो प्रयत्न करत होते पण ती मुलगी लयच हुषार निघाली ती ने.... असं म्हणत ती मुलगी कशी वीरपर्यंत पोहोचली ते ती सांगणार होतीच तोपर्यंत त्या माणसाने त्या बाईच बोलण मध्येच तोडल...

ए त्या मुलीची हुषारी ऐकण्यात काही रस नाही हा मला... आधी जा आता त्या दोघांना काहीही करून परत वेगळ कर... तोपर्यंत मी बाकिच्यांचा पण बंदोबस्त करतो... आता यांना संपवायची तयारी केली पाहिजे... खूप खेळवून झालंय एकदास संपवूया आता यांना आणि बदला घेवूया... हा हा हा... तो माणूस म्हणाला...

अरे वीर ते पुस्तक शोधायच कसं काही मार्ग माहिती आहे काय? तेव्हा वीर संक्षिप्त स्वरूपात त्या सभापंडपात झालेली घटना कथन करतो...

अरे त्यांचा अर्थ तुला मिळालेला कॉईन तोच तर नसेल ना पहिला मार्ग... अनू म्हणाली...

अग हा असू शकत पण त्यांनी तर तो त्यांचा विश्वास जिंकण्यासाठी आणायला सांगितलेला... मग कॉईन कसं काय पहिला मार्ग असू शकतो... वीर विचारू लागला..

अरे पण वीर त्यांनी सांगितल्याप्रमाणे तु तिथे जातोस का? या गोष्टीवरून त्यांनी तुझ्यातल्या खरेपणाची पारख केलीच असेल कि... बर ते जावू दे तुला आता पटत नाही आहे ना सोड आपण दुसरा मार्ग शोधू म्हणजेच पहिला मार्ग असू शकतो कि नाही ते पण समजेल... अनू म्हणाली...

वीर आणि अनू पुस्तक शोधायला परत निघतात... पण त्यांच्या नकळत कोणीतरी त्यांचा पाठलाग करत हळूहळू त्यांच्या दिशेने सरकत असत. ...

अनूला याची जाणीव होते ती मागे वळून पाहते तेव्हा समोर एक स्त्री दिसते ती जोरात वीरला आवाज देते... तसं वीरही लगेच मागे बघतो...

अनूला एक प्रकारचा आवाज ऐकू येतो... अनू ये अनू अग इकडे ये ना... आपल्याला सगळ्यांना शोधायला जायच आहे... असा कावेरीचा आवाज ऐकू येतो...

अनू हळूहळू त्या आवाजाच वेध घेत मागे वळून त्या दिशेने चालू लागते...

वीरला जाणवत कि अनू मागे नाही आहे तो मागे वळतो व पाहतो तर अनू हरवल्यासारख स्वतः च्याच तंद्रित चाललेली असते... वीर तसच धावत जातो आणि तिला मागे खेचतो...

अनू अनू कोठे चाललेस तू तरी आपल्याला त्या खोलीत बॅटरी मिळाली म्हणून पाहू तर शकलो नाहीतर परत या अंधाराने आपल्याला वेगळ केल असत... अरे हो रे...

पण तू कोठे चाललेलीस अचानकच...

अरे तिथून कावूचा आवाज... म्हणजे अजून पण आपल्याला वेगळ करण्याचा प्रयत्न चालू आहे... चल आता आपण कोठेही लक्ष न देता पुस्तक शोधूया...

अस म्हणत झालेली गोष्ट विसरत ते दोघे परत एकमेकांसोबत चालू लागतात...

वीरच्या एक खोली लक्षात येते जिथे तो काही न बघता तसाच पुढे आलेला त्याला राहून राहून तीथच आपण चूक केली असं वाटत असत...

ये अनू आता आधी आपण एका वरच्या खोलीत तपासूया ...

हो चालेल चल ना मग... ते वेळ संपत आलाय म्हणून एकमेकांचा हात पकडत धावत धावत त्या खोलीत जावू लागतात...

तोपर्यंत मागून कोणीतरी अनूचा पाय ओढू लागत...

अनू चल ना काय झाले आपल्याला लवकर पोहोचायच आहे नाहीतर वेळ संपून जाईल...

अरे माझा कोणीतरी पाय धरला आहे तू तू जा पुढे मी येते नंतर आपल्याला ते पुस्तक मिळालच पाहिजे... तू जा मी येतेच...

नाही मी असं सोडून तुला नाही जाणार आपण एकत्रच जायच मग काहीही होवो... मला त्याची पर्वा नाही...

ये वीर असं नको करू तु जा सगळया मित्रांना वाचवण तुझ्याच हातात आहे तु जा तुला आपल्या मैत्रीची शपथ आहे असं म्हणून अनूश्री वीरला पुढे जा असं विणवते...

पण तो तिच काहीच न ऐकता तीच्या पायाच्या पुढे बॅटरी मारतो तसच खिशात ठेवलेल्या काड्यापेटीची काडी पेटवून तिचा पाय पकडणाऱ्या त्या टोकदार नख असलेल्या हातांवर मारतो तसं ती बाई विव्हळत दूर पळत जाते...

नंतर हळूहळू वीर अनूचा हात धरत तिला वर उठवतो... व ती पुढे जावू लागतात तोच तेथील भिंती हलू लागतात वीर समजतो कि आपण शेवटच्या टप्प्यात आहोत आता दोनच मिनिटू शिल्लक आहेत ते पुस्तक शोधायला...

ते लक्षात येताच दोघांच्याही जीवाची धडधड वाढते पण ती दोघ तशीच सार बळ एकवटून त्या खोलीत शिरतात...

वीरच्या हातात असलेला कॉईन अचानकच प्रकाशमान होतो ती खोली पूर्ण प्रकाशून जाते... त्याला आता अनूच बोलण पटत कि हाच पहिला मार्ग होता...

तो जसजस पुढे जात होता तसतसा कॉईन आणखीनच चमकू लागतो एके ठिकाणी गेल्यावर परत निरभ्र होतो यावरून त्यांच्या लक्षात येत कि योग्य मार्गावर जात असताना कॉईन चकाकतो...

वीरला आणखी एका गोष्टीच आश्चर्य वाटत कि मगाशी जेव्हा आपण इथे आलेलो तेव्हा तर झाड फुले असल्यासारखच सुगंध येत होता... पण आता इथे झाड वगैरे काहीच दिसत नाही आहेत कदाचित ती सुद्धा एक मायाच होती...

वीर कोठे हरवलास आपल्याकडे एकच मिनिट आहे चल लवकर घाई कर... अनूश्रीच्या बोलण्याने वीर भानावर आला...

वीर एका कपाटाच्या इथे जातो तसं तो कॉईन त्याच्या हातातून आपोआपच हवेत तरंगत खालच्या बाजूस जातो... वीर त्या कपाटाखाली हात घालतो त्याच्या हातास ते पुस्तक लागते तो ते पुस्तक ओढून घेतो...

तस तिथल्या भिंती कोलमडू लागतात वीर तसच पुस्तक हातात घेतो.  ते कपाट त्याच्या अंगावर पडणार असत तोवर अनू त्याला लगेच बाजुला ओढते मग दोघे तिथून पळू लागतात...

15

# जागेवरच्या दुषित पाऊलखुणा

त्या स्त्रीने सांगितल्याप्रमाणे थोडा विचार करून कावेरी तिथल्याच त्या खड्ड्यातल्याच काही वस्तू शोधून घेते तिला वाटलं कधी कोणत्या गोष्टींची गरज लागेल सांगता येत नाही म्हणून जे हाती येईल ते सगळ घेते व नंतर त्या स्त्रीने सांगितल्याप्रमाणे सरळ पुढच्या दिशेने जावू लागते..

त्या स्त्रीने सांगितल्याप्रमाणे तिला पुढे चालत गेल्यावर खरच त्या भिंतीच्या पलिकडे पाण्याचा आवाज ऐकू येतो. तिला मनोमन खूप आनंद होतो कारण तिथूनच तिला पुढचा मार्ग मिळणार असतो पण तितकच भयाचे भाव पण दाटून येतात. कारण तिथे सगळ्याच गोष्टींपासून धोका असतो.. काही वेळ जावाव कि नको अशी द्विधा मनस्थिती निर्माण होते तरीसुद्धा आपल्या मित्रांसाठी आपल्याला गेलच पाहिजे तसही इत राहिलो तरी कधीना कधी काळ आपल्याला घेऊन जाणारच आहे त्यापेक्षा आपण प्रयत्न करूया असं स्वतः शीच ठरवून जायला तयार होते..

कावेरी ती भिंत पाडण्यासाठी हातात एक दगड घेते आणि त्या भिंतीवर जोरात आदळते. आधी तर तिला वाटलेले भिंत पडायला वेळ लागेल पण आश्चर्य म्हणजे ती भिंत लगेचच खाली कोसळते जणू काय ती जागा सुद्धा तिची वाट पाहत आहे...

जस ती भिंत खाली कोसळते तसं लगेचच ती चे पाय वरवर सरकतात व पाण्याचा प्रवाहच्या प्रवाह तिच्याकडे मोठ्या लाटेच्या स्वरूपात येवू लागतो ते पाहून ती तर गोंधळूनच जाते ती त्या पाण्यात बुडण्यापासून स्वतः ला वाचवण्यासाठी हात पाय हालवण्याचा प्रयत्न करते पण तीचे हात पाय खांबासारखे ताठ होतात जणू काय ते सुद्धा

आता तिच्या विरोधातच आहेत.. पाणी तर नाकातोंडात शिरत आलं होत. पण तिला असही होत त्या जागी हे त्या स्त्री कडून कळालेलच असत.

ती स्वतः चच डोक जोरात हलवते तसं डोक्यातला चाप खाली पडतो ती तसच थोडस खाली वाकत चाप तोंटात धरते आणि स्वतः च्याच हातावर पायावर वार करते तसं हात पाय हलू लागतात तसं ती तरंगत पुढे पुढे जावू लागते...

अचानकच ते पाणी वायूच्या रूपात परिवर्तीत होत इतक कि ती सुद्धा तो वायू जिथे घेऊन जाईल तिथे वाहत जाईल अशाप्रकारे तरीही ती जोर लावत हात पाय जमिनीवरच ठेवण्याचा प्रयत्न करते.. पण तरीही वायूच्या शक्तीपुढे तिची शक्ती विफल ठरत असते.. तिला त्या जागेतून आणलेल्या मातीची आठवण येते आता मातीच आपल्याला मातीवर उभं राहायला मदत करेल असं म्हणून ती ओढणीत बांधलेली माती स्वतः च्या हाता पायाला आणि चेहऱ्याला लावते तसं तीचे पाय आपोआपच खाली येऊ लागतात.

ती कशीबशी खाली येतेच तोवर आभाळातल्या चांदण्या एक एक करत तिच्यावर आदळण्यासाठी खाली वेगात येवू लागतात एक चांदणी तर इतक्या वेगात येते कि ती ने काही हालचाल करण्याआधीच तिच्या पायावर पडते तसं ती चा पाय पेट घेतो तिला कळतच नाही काय कराव पाय जळत आलेला त्यासोबत तिचा वेदनेने जीव पिळवटून निघत होता.. ती ने पटकन ओढणी हातात घेतली आणि पायावर जोरजोरात त्याचे फटके मारु लागली तशी आग विजली.. पण परत आणखी बऱ्याच चांदण्या खाली येत होत्या ते पाहून ती ने एका दगडाचा सहारा घेतला..

ती तो दगड हातात घेऊन ते चांदण्यांचे वार चुकवत चुकवत पुढे चालली. काही वेळाने चांदण्या परत आकाशात परतल्या जणू काय त्यांची वेळ संपली. ती थोड पुढे गेली तोवर तिला दरदरून घाम फुटला कारण तिला श्वासच घेता येईना. ती एकसारखा प्रयत्न करत होती पण काही केल्या तिला श्वासच घेता येईना.. आता तर अशी अवस्था झाली कि

आपला प्राणच जाणार आहे. तरीही थोड अजून पुढे जा असं करत करत मनातल्या मनात स्वतः ला प्रेरित करू लागली व तसच पुढे पुढे जावू लागली..

पुढे गेल्यानंतर पुन्हा श्वास घेता येऊ लागला तेव्हा ती च्या जीवात जीव आला. ती मोकळा श्वास घेऊ लागली तोवर समोरून आगीचे गोळे येऊ लागले. ते तसेच चुकवत चुकवत ती पुढे जावू लागली.. पण तिला याची कल्पना नव्हती की तिच्या मागूनही आगीचे गोळे येत आहे.. थोडी गरमी जाणवू लागल्यावर ती ने मागे वळून पाहिले तर दहा पावलांवरून जोरात आगीचा गोळा येत होता. तीने खालची माती उचलून गोळयाप्रमाणे एक करून त्यादिशेने फेकली तसा तो गोळा तुटला व आगीचे कण आजूबाजूला विखुरले गेले त्या जागेने पेट घेतला तसं ती तिथून पळत दुसऱ्या दिशेने जावू लागली...

ती चालत चालत पुढे गेली तोवर तिला जमीन वर येत आहे असं जाणवू लागल तीच्या पायाखालची जमीन हादरू लागली ती खाली वर होवू लागली व कावेरीला वर ढकलून परत वेगात खाली येवू लागली यामुळे कावेरीच पूर्ण शरीर वर खाली असं कोसळू लागले. तिचा वेग नंतर इतका प्रचंड वाढला कि आता कावेरीच डोक फुटून त्यातून रक्त येईल याची जाणीव होताच कावेरीने त्या जागेतून आणलेली एक वनस्पती खाली आदळली तशी जमीन शांत झाली. तिला थोड बर वाटलं ती मनाशीच म्हणली तरी बर ही वनस्पती आपण घेऊन आलो आधी तर वाटलेल हिची गरज लागणार पण असु दे म्हणून सोबत ठेवली ते बर झालं.

ती परत पुढे जावू लागली तोवर आकाशातून खाली येत ढग तिला वर ओढू लागले तिचा तर स्वतः वरचा ताबाच सुटलेला इतकि त्या ढगांची क्षमता अफाट होती.. काळ्या ढगात धुरकटलेले ते ढग आज तिचा काळ बनून तिला स्वतः कडे ओढत होते.. ती ने पाठिमागे बांधलेल एक अवजार सुतळी काढून हातात घेतल व त्या ढगासमोर लावल तसं ते ढग दूर जावू लागले ती परत जमिनीवर येऊ लागली... ते अवजार रामायणात ज्या काठीपासून रामाने सीतामातेसमोर लक्ष्मण रेषा तयार केलेली त्या काठीपासून बनलेल होत.

कावेरीच सुदैव कि काय तिला ते त्या खड्ड्यात सापडलेल. व ती येताना सोबत घेऊन आलेली..

ती परत पुढे पुढे जावू लागली तसं तिला समोर एक प्रकाशाने लख्ख उजळलेली जागा दिसू लागली. पण तो प्रकाश इतका तीव्र होता तिला आपली दृष्टी जाईल कि काय असच वाटू लागल ति ने पटकन ओढणी डोळ्याला बांधली व त्यातून पुढे बघू लागली.. पुढून एक राजा तिच्यासमोर येवू लागला.. तो तिला म्हणाला आलीस तुझीच वाट पाहत होतो. तुला मार्ग दाखवण्यासाठी मी इथे आलो आहे.. आता अंधारान कहरच गेलाय आमच्या राजवाड्याच्या निम्म्या जागेत स्वतः च स्थान उभं केलय आम्हाला कोणाची तरी गरज होतीच.

पण तुम्ही तुम्ही कोण आहात. ते सांगण्याची आता वेळ नाही आहे.. आधी तुला आम्हाला दहा मिनिटात एक सांकेतिक भाषा शिकवायची आहे तुला लक्ष देऊन दहाच मिनिटात ती भाषा हस्तगत करावी लागेल आहेस तयार. जरी तयार नसशील तरी मनाची तयारी कर कारण हि भाषाच तुला आणि तुझ्या मित्रांना बाहेर पडण्यासाठी मदत करू शकते.

कावेरी थोडा विचार करते आणि तयार होते.. राजा तिला ती भाषा शिकवायला सुरू करतो त्या भाषेतले ते शब्द इतके कठिण असतात. कि कावेरीला लक्षात ठेवण कठिणच जात होत तरीही ती आपल्याला आता बाहेर पडायचच आहे असा निश्चय करून शिकवलेले शब्द आपल्या भाषेतल्या एखाद्या शब्दाशी जोडून लक्षात ठेवत असते...

दहा मिनिटात ती भाषा शिकवून राजा आपोआपच गायब होतो  व परत तिथला प्रकाश नाहीसा होतो. त्या भाषेच चिंतन करत करत ती परत पुढे जावू लागते.. ती पुढे जाते तर तिला वाटेत कोणीतरी बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत दिसत.. ती त्याच्या जवळ जवळ जावू लागते.

# 16

# अधिराजची घुसमट

अधिराजला काहीच सुचेना झालेल कि काय करायच ते त्याच्यासोबत कावेरीच रूप घेऊन ती स्त्रीच चाललेली होती. ती ने त्याला भिती दाखवली नसली किंवा जरी चांगल वागण्याच नाटक करत असली तरी तीला दूर करण गरजेच होत कारण त्याशिवाय त्याला त्याच्या मित्रांपर्यंत पोहोचणच शक्य होणार नव्हत.

आणि जरी तिच्यासोबत तो मित्रांपर्यंत पोहोचला तरी त्याच्या मित्रांसमोर आणखी एक अडचण उभी झाली असती असं त्याला वाटत होत. त्याला त्याच्या मित्रांना अडचणीत आणायच नव्हत. त्याला मनोमन असं वाटत होत आपण इथून बाहेर पडू अगर न पडू पण आपले मित्र सुखरूप बाहेर पोहोचले पाहिजेत. याच विचारातून त्याने एक निर्णय घेतला कि या स्त्रीला आपण आपल्या मित्रांपर्यंत पोहोचूच द्यायच नाही. हा धोका आपण आपले मित्र बाहेर पडेपर्यंत आपल्यासोबतच ठेवायचा. काहीही करून हिला आपल्यासोबतच गुंतवून ठेवायच. हिला कळूच द्यायच नाही कि आपल्याला ती कावेरी नाही हे समजलय ते...

असं स्वतः शी ठरवत अधिराज मनातली भिती घालवून तिच्यासोबत पुढे पुढे जावू लागला...

ती स्त्री मनोमन खूप खूष होती बर झालं आपण कावेरीच्या रूपात आलो जरी आपण याच्यासोबत याच्या मित्रांपर्यंत पोहोचलो तरी आपल काम सोप होईल आपल्या हाती

अनेक सावज लागतील. आणि जरी नाही पोहोचू शकलो तरी याला मित्रांपासून दूर ठेवल्यामुळे आपले स्वामी खूष होतील..

ये कावेरी तुला हि जागा बघितल्यासारखी वाटते काय ग? अधिराज विचारू लागला...

ती पण खोट हास्य चेहऱ्यावर आणत अरे हो रे असं वाटत तर आपण आधी इथे आलो होतो पण नक्की आठवत नाही...

आणि मनातच म्हणते. अरे ये मुर्खा तुम्ही तर येथे आला होता तुमच्यामुळेच तर आमचा धंदा बंद पडला. नाहीतर किती पैसे मिळवता यायचे आम्हाला आता बघच तुझे मित्र आणि तू कसं इथल्या काळोख्या मातीत गढून जाता ते...

ये अनू आपल्याला हे पुस्तक तर मिळवता आलं पण ही भाषा किती वेगळी आहे कसं समजायच यार आपल्याला हे पुस्तक मिळवून पण काय उपयोग करता येणार याचा त्या वाड्यातून पळत पळत वीर अनूला विचारत होता...

ये वीर काय यार तू तोंड गप्प ठेव ना तुला पळता पळता बोलायला कसं जमत रे मला तर एक एक शब्द बोलण पण जड झालंय.. अनू म्हणाली..

हो ना म्हणून तर आम्ही मुल भारी असतो बघ काहीही करू शकतो... वीर अनूला चिडवत म्हणाला...

हो का म्हणूनच तर त्या राजाने दाखवलेला मार्ग पण नाही समजला तुला... अनू वीरला चिडवत म्हणाली...

अग ते मला समजलेलच पण तुला समजलय का ते तपासत होतो... वीर म्हणाला...

ये बास बास बास झालं हा स्वतः ची हुषारी सांगण बोलण बंद कर आणि चल लवकर बाकिच्यांपर्यंत पोहचायच आहे.. अनू म्हणाली...

हो ग अनू पण खरच तुला भेटून इतक भारी वाटलं ना खूप वर्षांनी असा संवाद साधता आला असं वाटत आहे आज मला... वीरच्या डोळयात अश्रू तरळतात...

हो रे वीर मला पण वाटत आलेल कि आता आपली भेट होते कि नाही असं पण बघ आपल्या मैत्रीतल्या प्रेमामुळे ते शक्य झाला आता लवकरात लवकर बाकिच्यांची पण भेट होवू दे... अनूश्रीच्या मनात भावना दाटून येतात तसच तिच्याही नकळत डोळयांत अश्रू येतात...

हो ग अनू चल लवकर आपली बाकिच्यांशीही भेट लवकर होईल असं म्हणतच वीर गती वाढवतो अनूश्रीही आपली गती वाढवते... पण ते यापासून अनभिज्ञ असतात कि अजूनही त्यांचा पाठलाग सुरू असतो... आणि त्यांचा पाठलाग करणारा व्यक्ती जास्तच तापलेला असतो ती दोघ एकत्र आल्यामुळे तो परत त्यांना वेगळ करण्यासाठी सज्ज झालेला असतो... पण त्याला याची कल्पना नसते कि ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा एकमेकांसाठी काहीही करायला तयार होतात.. अगदी दोघ जरी एकत्र आली तरी...

अचानकच अधिराजच्या समोर झाडावरून पक्षी खाली पडतात तसं अधिराजच्या मनात भय दाटून येत. कावेरीला पण घाम सुटतो याला आपल सत्य कळल तर या विचाराने त्याला काही कळू नये म्हणून ती घाबरण्याचे नाटक करते आणि म्हणते ये अधिराज काय रे हे असं अचानक पक्षी कसा काय खाली पडला लय भिती वाटतीया खरच आपले मित्र सुरक्षित असतील ना रे...

अधिराजला तर तीच वागण बघून झटकाच बसला क्षणभर तर ही कावेरीच आहे कि काय असच भासल त्याला पण नंतर तो परत सावध झाला कारण कावेरी अधिराज असं त्याला कधीच बोलवत नव्हती ती त्याला ये कळकुट्या असच म्हणायची आणि कधीतरी इतर मित्रांसारख अधी म्हणायची पण त्यांच छोट्या छोट्या गोष्टींवरून खोडकर असं भांडण व्हायच...

तो पण नाटक करू लागला हो ग कावू आता मला पण भिती वाटत आहे...

ये अधिराज मी पण ना स्वतः पण घाबरले आणि तुला पण घाबरवल अरे आपल्याला घाबरून नाही चालणार त्यांना शोधल पाहिजे ना... ती स्त्री म्हणाली..

हो ग चल आपण इथून जावूया..

अधिराज मनातच म्हणाला कोठे आहात रे यार तुम्ही कधी वाटलंच नव्हत लपाछपी खेळता खेळता खरच आपण कायमचे एकमेकांपासून हरवून जावू इतक कि एका भेटीसाठी पण तळमळाव लागेल. खूप इच्छा झाले रे तुम्हाला भेटायची. पण काय करू मी आता जिच्यासोबत आहे तिच्यासोबत पोहोचलो तर तुमच बाहेर पडण अधिकच अवघड होईल त्यामुळे आपली भेट होवू नये अशीच प्रार्थना करावी लागत आहे मला देवाकडे...पण खरच तुम्ही सुखरूप पोहोचा...

वीरला आणि अनूश्रीला गुरगुरण्याचा आवाज येवू लागला तसं परत त्यांच्या उरात धडकी भरली. त्यांच्या समोरून एक जंगली गुरांची झुंबडच्या झुंबड येवू लागली. ते वेगानेच येत होते ते बघून वीरने वेगाने अनूश्रीचा हात पकडला आणि अनूश्रीनेही वीरचा हात घट्ट पकडला त्यांना आता काहीही झालं तरी एकमेकांपासून दूर व्हायच नव्हत. ते तसच एकमेकांचे हात घट्ट पकडत पळू लागले.. पण दोघांची पळण्याची गती वेगळी असल्यामुळे पळण अवघडच होत होत.. तरीही ते एकमेकांचा हात सोडत नव्हते.. त्या माणसाला आता अजूनच राग येवू लागला. त्याने परत रागातच तिथे जोरात फुंकर मारली तसं तिथ जोराच वादळ उठल. ते वादळ अनूश्रीच्या आणि वीरच्या मधोमध आलं तसं त्यांचे हात सुटू लागले..

कावेरी पुढे पुढे जात होती. तिला समोर कोणीतरी बेशुद्ध अवस्थेत पडल्याच जाणवल ती पुढे त्या बेशुद्ध अवस्थेत पडलेल्याकडे जावू लागली तोवर तिला जोरात कोणीतरी मागे खेचल. त्याबरोबर तिचा तोल गेला पण तरीही ती लगेच उठली आणि पुढे बघते तर त्यांचा पाठलाग करणारा तो माणूस तीच्या समोर होता. त्याला पाहून तिला भितीने कंप सुटला...

17

# भेट कि वास्तव संभ्रम

अधिराज मित्रांना शोधत शोधत पुढे चाललेला प्रचंड घाबरलेला तरीही मित्रांना वाचवण्यासाठी तीळ तीळ तुटत होता. याच्यापासून अनभिज्ञ कि कोणीतरी आपला पाठलाग करत आहे.

एका वळणावर त्याला पावलांचा आवाज येतो तसा तो गर्कन मागे वळून बघतो. तसं तो ही झटकन हात लांब करत त्याची वाढलेली नख अधिराजच्या मानेत घस्सकन घुसवतो. तसं अधिराजच्या मानेतून रक्ताच्या चिळकांड्या आणि किंचाळी दोन्ही पण निघाल...

तो थरथरत्या आवाजाने कावू, वीर, अनू, राज असं म्हणतच गतप्राण झाला... व जोरात किंचाळत राज जागा झाला... अधी अधी असं म्हणत...

राज बाजूला बघतो तर अंधारच असतो. पण घाबरत घाबरतच म्हणतो हे ... हे... असल कसल स्वप्न दिसल आज... आपला अधी शीट कल्पना पण करवत नाही याची... आपण गेल पाहिजे लगेच अधीला काही होण्याआधी....तो उठतो अधीराजला शोधायला जाण्यासाठी तसं त्याच आजूबाजूला लक्ष जात. आजूबाजूला पाहून तर तो जास्तच गोंधळतो... तो आता गुहेत नव्हता.. तर एका जंगलात होता... त्याला कळेना की आपण इथे कसं आलो.. तो ताण देऊ लागला व आठवण्याचा प्रयत्न करू लागला...

राज रक्ताच्या नदीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. हात - पाय हलवत होता. पण एका वृक्षाच्या फांद्या त्याच्याभोवती वेटोळे घालू लागलेल्या त्याला तर वाटलेल आता आपला अंतच जवळ आला आहे. त्याने नंतर हात पाय हलवणच बंद केल. त्याच्या अंगातल त्राणच संपल होत जणू... तसच मनातले त्राणही संपत चालले होते. तोवर एका

लहान मुलाचा आवाज त्याच्या कानी येतो. तो उकरकटू चकरकटू... उकरकटू चकरकटू... असं म्हणतो.. राजला त्याही स्थितीत तो शब्द ऐकून हसायला येत. तो ही हसत त्याला चिडवण्यासाठी तसच म्हणतो.. तर आश्चर्यमय घटना घडते..

त्याला वेटोळे देणाऱ्या वृक्षाच्या फांद्याच झडून जातात. ती रक्ताची नदीही अदृष्य होते. व तिथे धूरच धूर होतो जणू काय आगच लागली आहे. पण आग दिसतच नव्हती... तो धूर हळूहळू तेथील वातावरणात मिसळतो. व राज तिथेच डोळे मिटून घेतो. त्यातच त्याची शुद्धही हरपते.

अरे हा त्या मुलामुळे आपण तिथून बाहेर पडू शकलो पण नेमका कोण होता तो मुलगा ... आणि तिथे कसं काय आला तो... तसच त्याला का त्रास नाही झाला... असो, आता याचा विचार सोडून देवू आधी आपण सगळयांना शोधायला जावू नक्कीच अधीचा जीव धोक्यात आहे. सगळयात आधी त्याच्यापर्यंत पोहोचलच पाहिजे. असं म्हणत राज अधीला शोधायला जातो..

कावेरी बेशुद्ध पडलेल्याजवळ जात असते. तोवर समोर तिला जंगलात पाठलाग करणारा माणूस दिसतो तसं तिला भितीने कंप सुटतो.आता काय करायच याचा विचार ती करत असते तसच घाबरत घाबरत. पण त्याला पाहून तिच डोकच सुन्न झालेल..

तोवर कावेरीला आतापर्यंतच्या सगळया घटना डोळयासमोर दिसतात. तसं पुन्हा नव बळ संचारत आणि ती खालची माती उचलून त्या माणसाच्या डोळयात घालते. तसा तो त्याचे रक्ताने भरलेले डोळे चोळू लागतो. व ओरडू लागतो... याच संधीचा फायदा घेत कावेरी बेशुद्ध कोण पडल आहे हे बघण्यासाठी तिथे जाते.. तर तिला आश्चर्यच वाटत. तो अधिराज असतो. ती त्याला उठवण्याचा प्रयत्न करते पण तो काही केल्या उठत नाही.. तो माणूसही धडपडत त्यांच्याजवळ येवू लागतो. तसं कावेरी अधिराजला तसच एका हाताने वर उचलत तसच पकडत तिथून जावू लागते...

काय तुला त्या मुलाला लांब ठेवण जमल नाही. कसले आहात तुम्ही एक साधी गोष्ट जमली नाही आणि तो आता तो गेलाय आणि डोळ चोळत बसलाय हळूहळू पाठलाग करत त्याला तर कसं जमणार आहे.. त्यांना पकडायला..

पण स्वामी तो पाठलाग करत आहे ना ती लागतीलच कि हाती...

कशी कशी लागतील किती हळू चाललाय तो...

आता मलाच काय तर केल पाहिजे ती दोघ एकत्र आल्यात आता तिघांना तरी एकत्र येवू द्यायच नाही......

कावेरी अधिराजला घेऊन जातच होती तोवर मागून कोणीतरी हवेच्या साहाय्याने जोरात मागे ओढू लागल. तीचे पाय पुढे जाण्याऐवजी मागे मागे ओढले जावू लागले. ती प्रचंड जोर लावू लागली पण अधिराजला धरत जोर लावण तिला जमेना. म्हणून ती अधिराजचा हात थोडा वेळ सोडणार होती तोवर तिला मागची चुळबुळ जाणवली. तिला समजल की परत आम्हाला वेगळ केल जात आहे.. ती ने परत संपूर्ण ताकदीनिशी जोर लावला पण तिची क्षमता कमीच पडत होती.. त्या मागे असलेल्या माणसाला पण आणखीच चेव आला. त्याने आता वाऱ्याचा वेग जास्तच वाढवल तसं कावेरीचा मागे तोल गेला ती खाली पडलीच पण तीने तरीही अधिराजला सोडल नाही. ती ने अधिराजचा हात घट्ट पकडून ठेवला. व त्याला हलवत उठवण्याचा प्रयत्न करू लागली. ये अधी उठ ना तो माणूस आपल्याला वेगळ करायला बघत आहे माझी क्षमता पण कमी पडत आले रे उठना तू उठ लवकर..

आता तो माणूस पाण्याच्या प्रवाहाचा प्रयोग करायला बघतो.. कावेरी अधिराजला उठवत असतेच तोवर तिला समोरून पाण्याचा प्रचंड मोठा प्रवाह येत आहे असं जाणवू लागत. अधिराज तर काही केल्या शुद्धीवर येत नव्हता. तितक्यात कावेरी आणि एक वेगळा प्रयत्न करायच ठरवते आणि त्याच्या कानाबशी हळूच तेरी मेरी यारी... असं म्हणते..

ये अधी ये कळकुट्या उठ कि आपल्याला खेळायला जायच आहे ना उठ आता उठ बाकिचे वाट बघालेत... कावेरी असं म्हणत खेळायला जाण्यासाठी अधिराजला उठवत असते.. अधिराजला शुद्ध येते... व समोर कावेरी दिसते...

तो पूर्ण शॉक लागल्यासारखा तिच्याकडे बघत असतो. त्याला असं वाटू लागत कि खूप वर्षानंतर आपल्या एका फ्रेंडला तर भेटू शकलोय.. पण हे कसं शक्य आपल्यासोबत तर कावेरीच रूप घेऊन कोणी दूसरीच व्यक्ती आलेली मग आता आपल्यासमोर असणारी व्यक्ती कावेरी कशी असेल..

ये कळकुट्या अरे कोठे लक्ष आहे तुझ अरे तिकडून पाण्याचा मोठा प्रवाह येत असल्याचा आवाज येत आहे आणि तू असाच बसलायस शॉक लागल्यासारखा अरे चल लवकर आपल्याला जाव लागेल नाहीतर बाकिच्यांनाच  काय स्वतः ला वाचवण पण अवघड होईल.. चल चल... चल ना लवकर...

तु खरच कावेरी आहेस अरे हो रे मी कावेरीच तर आहे. पण असं इतक्या दिवसांनंतर भेटल्यामुळे विसरलास कि काय रे आता खरच तुला अधीच म्हणाव लागेल माझी कळ काढणारा कळकुटा हरवला वाटत..

कळकुट्या आणि अधी म्हणते अरे म्हणजे ही खरच कावेरी आहे. असा तो मनात विचार करत असतोच. कि त्यांच्या अंगावर काही पाण्याचे थेंब जोरात समोरुन येवू लागतात.

त्यांना जाणवत कि मोठा प्रवाह आपल्या अगदी जवळ आलाय.. तसं कावेरी आणि अधी एकमेकांचे हात घट्ट पकडतात व जोरात संपूर्ण वेग लावून धावू लागतात.. त्या माणसाला अधिराजला शुद्धीवर आल्याच बघून प्रचंड राग येतो..

जावा जावा आता तुम्ही एकत्र आलाय पण तुमच्या त्या एका मित्राला बघा कसं करतो तुमच्याजवळ येवूच देणार नाही.. आणि तुम्हाला बदला घेतल्याशिवाय जावूच नाही देणार जरी एकत्र आलात तरी. आणि पुढे त्यांच्यासोबत काय करायच. याची योजना आखू लागतो..

# 18

## साद स्पर्श

अधिराज आणि कावेरीच रूप घेऊन आलेली ती स्त्री पुढे पुढे चालले होते. तिथून पुढे एक नदी दिसत होती. त्या नदिच्या जवळ गेल्यावर अधिराजचे पाय जमिनीपासून आपोआपच वरवर जावू लागले. पण त्या कावेरीच्या रूपात आलेल्या स्त्रीला तिथल्या वातावरणात काहीच त्रास होईना. अधिराजच्या डाव्या बाजूला कावेरीच्या रूपात आलेली स्त्री होती तर त्याच्या उजव्या बाजूला थोड्या दुर अंतरावर अंधूकशा प्रकाशात ओढणीत बांधलेली माती जमिनीवर आपटणारी कावेरी अधिराजला दिसली त्याला खूपच आनंद झाला. पण या स्त्रीपासून तिला लांब ठेवण्यासाठी अधिराजने तसच सावरत सावरत दूसरीकडे जावूया आपण म्हणून त्या कावेरीच्या रूपातल्या स्त्रीला दूर दूर नेवू लागला. ती स्त्री सुद्धा त्यासोबतच चाललीच होती तोपर्यंत अधिराजला झालेल्या पायाच्या जखमेवर त्यातून बाहेर येणाऱ्या रक्तावर तीच लक्ष गेल तशी तिला भूखेची तीव्र जाणीव होवू लागली. तिचे डोळे अचानकच अंगार भरल्यासारखे लाल होवू लागले तीने त्याच आवेगाने अधिराजच्या पायावर झडप घातली. बेसावध असलेल्या अधिराजला काय कराव तेच कळेना त्याने तिला ढकलण्याचा पूर्ण प्रयास केला पण तिच्या सैतानी ताकदीपुढे त्याची ताकद कमी पडत होती. तरीही त्याने आपल्या मित्रांसाठी हार न मानण्याचा निश्चय केला आणि शक्य तेवढ बळ एकवटून निर्धाराने जोरात तिला बाजूला ढकलले आणि तिथून पळत पळत पुढे जावू लागला. पण जखमेवर पुन्हा जखम झाल्याने अधिराजला चक्कर आली तो तिथेच बेशुद्ध पडला इकडे त्या क्रोधाने भडकलेल्या माणसाने त्या स्त्रीला दूर नेल व जाब विचारायला सुरुवात केली...

हा सारांश अधिराजची आणि कावेरीची भेट होण्याआधीचा आहे...

वीर आणि अनूश्री शक्य तितक बळ एकवटून मित्रांना शोधण्याचा प्रयत्न करत होते. पण ते जंगल असं होत कि तिथे कोठून कोठे मार्ग जातो हेच कळत नव्हत तसच अनूश्रीला आधी दिसलेले ते चार मार्ग कोठे लुप्त झाले होते काय माहिती तेही कोठेच दिसत नव्हते.. पण तरीही त्यांनी ठरवलेल कि आपण प्रयत्न सोडायचेच नाहीत..

कावेरीची आणि अधिराजचीही तशीच अवस्था होती त्यांना मार्गच सापडत नव्हते ते मध्ये मध्ये खूप अस्वस्थ होत होते पण शेवटपर्यंत प्रयत्न करत राहायच असं ठरवतच पुढे चाललेले त्यात अधिराजला झालेल्या जखमांतून कळा सुटत होत्या. तरीही काहीही करून आपल्या मित्रांना वाचवायचच या उद्देशाने वेदना तशाच मनातल्या मनात दाबत कावेरीसोबत पुढे चालला होता..

अचानकच मोठे मोठे वृक्ष खाली कोसळू लागले. वीर आणि अनूश्रीला विश्वासच बसेना कि हे असं कसं होत आहे तिथ वार तर नव्हत त्यांचीच काया घामाने डबडबली होती तसेच वादळ पण मोठे आले नव्हते कि त्या वादळाच्या शक्तीने झाड खाली पडतील. अशीच अनुभूती कावेरी आणि अधिराजलाही होत होती. खरतर ती चौघेही एकमेकांच्या खूप जवळ होते पण काय माहिती का एकमेकांना बघूच शकत नव्हते जणू काय त्या माणसाने तेथील जमिनीवर पूर्णपणे स्वतः चा अंमल अशा प्रकारे निर्माण केला होता कि तिथला परिसरही या मुलांशी खेळ खेळत होता..

अचानकच काही हिंसक पक्षी कोणते वेगळ्याच प्रकारचे जे यांनी कधीच पाहिले नव्हते असे टोकदार चोच पण खालच्या बाजूला झुकलेली जस उकरायला खोर वापरतात तशी त्याचे पंख पण विचित्रच होते ते पूर्णपणे काटेरी होते चुकून जरी ते कोणाजवळ आले तर त्या व्यक्तीला चिरत जातील असे त्यांचे डोळे खोल खड्डे पडल्यासारखे जणू वेगळ्याच दुनियेत घेऊन जातील असे ते पक्षी भरधाव वेगाने त्यांच्याकडे येत होते. त्या चौघाना त्यांचा सामना कसा करावा हेच कळेना ते पुरते गोंधळून गेले होते. तो पक्षी अधिराजजवळ येवू लागला. त्याने त्याची टोकदार चोच अधिराजच्या पायात घुसवली व माती उकरावी तसा त्याचा पाय फाडू लागला ते पाहून कावेरीला गहिवरून आले तिने खालील माती उचलून

त्याच्या डोळयात घातली ती त्याच्या डोळयातून आरपार गेली तो अधिराजला तसच सोडून तिच्याकडे धाव घेवू लागला. त्याने त्याच्या चोचीने तिला उचलले आणि तसच पायात पकडून तिला स्वतः च्या डोळयात ढकलले. पण जस त्याने तिला ढकलल तसं त्या पक्ष्याचे पंख जळू लागले तो तडफडत तडफडत तिथच मेला कावेरीच्या लक्षात आले आपल्या हातात ते रामाने वापरलेल्या काठीच अस्त्र अजून तसच होत त्यामुळे असं झालं असेल ती तशीच त्याच्या डोळयांना धरत धरत वर येवू लागली.. ती ने आल्या आल्या अधिराजच्या पायाला ओढणीने पट्टी बांधली व त्याला उठवू लागली...

तेच पक्षी वीर आणि अनुश्रीकडेही वेगाने येत होते. ते ही पुरते गोंधळून गेले पण जसा त्या पक्ष्याचा वीरच्या हातातील पुस्तकाला हात लागला तसं क्षणार्धात ते जळून राख झाले. वीर आणि अनूश्री पुन्हा काही मार्ग मिळतो का ते शोधू लागले.. इतक्यात यांनी ये अनू हे बघ इथे कावेरीच्या ओढणीचा तुकडा पडला आहे नक्कीच ते आपल्या आजूबाजूलाच आहेत चल लवकर आपण शोधू त्यांना. त्या सापडलेल्या गोष्टीने त्यांचे मित्र जवळच आहेत अशी अनुभूती त्यांना झाली.. आणि पुन्हा नवा जोश त्यांच्यात जन्मून आला.

ते आता हाक मारू लागले ये कावू कोठे आहेस तू ये कावू ...

अधिराजच्या कानात तो आवाज येतो तसं तो तसाच उठतो.

ये अधी बस ना काय आहे कि नाही तुला किती लागलय पायाला उठलास तर आणखीच जास्त रक्त येईल. कावेरी म्हणाली...

ये कावू ऐक ना वीरचा आवाज आता मला ऐकू आला तो तुला बोलवत आहे..

कावेरी पण लक्ष देवून ऐकते तीच अधिराजच्या जखमेकडे लक्ष असल्यामुळे त्या आवाजाकडे लक्षच नव्हत.

अरे हो रे हा वीरचाच आवाज आहे नक्कीच वीर असणार आतापर्यंत मला वाचवा असा आपल्याला फसवण्यासाठी आवाज काढला जात होता पण या आवाजात भेटीची तीव्र इच्छा जाणवत आहे नक्कीच ते आपल्या आजूबाजूलाच आहेत...

कावेरी आणि अधिराजही त्यांना शोधू लागले. तोवर जोरदार पाऊस सुरू झाला इतका कि त्यांचा आवाज ऐकू येईनासा झाला.. जणूकाय तितला तो परिसर त्यांना भेटू न देण्यासाठी सज्ज झाला होता... पण तरीही त्यांना ते जवळच आहेत ही एक गोष्ट प्रेरणा देत होती.. ती एकमेकांना शोधू लागली...

कावेरीने तिथल्या मातीवर तेरी मेरी यारी... असा शब्द काठीने कोरला.. व छोट्या खडकाला ओढणीचा एक तुकडा बांधून त्यावर ठेवला.. ये अधी आता आपण थोड पुढे जाऊन बघू व पाच मिनिटात परत येथे येवू व परत येथे येवून परत दुसऱ्या बाजूला बघू. त्यामुळे ते इथपर्यंत आले तर या खूणेमुळे थांबतील व जर आपल्याला वाटेत भेटले तर याची गरज लागणार नाही... कावेरी अधिराजला सांगू लागली...

अग पण असं करण्यापेक्षा तू इथे थांबना मी त्यांना शोधून इथे आणतो.. अधिराज म्हणाला...

नाही अधि आता आपल्याला वेगळ होवून चालणार नाही नाहीतर पुन्हा ते आपल्याला खूपच दूर करतील त्यापेक्षा दोघ एकत्र जावू... कावेरी म्हणाली...

ते दोघही त्यांना शोधण्यासाठी थोड्या अंतरावर गेले...

## 19

# भेट तिघांची

पाऊस चालूच असतो पण त्यासोबत मोठ वादळ येत कावेरीने ठेवलेला दगड एक काळी सावली जमिनीपासून वर स्वतः कडे खेचून घेते त्यासोबत ती ने लिहिलेली अक्षर पुसली जातात..

ते थोड्या अंतरावर जातात आणि वीर व अनूश्रीला आवाज देवू लागतात पण ते आलेले वादळ आणि पावसाचा वाढलेला जोर यातून त्यांचा आवाज कदाचित त्यांच्यापर्यंत पोहोचतच नसतो. ते परत हाक मारून एकदा परत जावून बघाव म्हणून मागे वळतात. आणि मोठ्या काळजीत पडतात कावेरीला अधिराज दिसतच नाही कोठे ती खूपच घाबरते अरे अचानक हा अधी कोठे गेला आताच तर आम्ही बोललो...

अधिराजही जस मागे वळतो तसं त्याला धक्का बसतो त्याला कावेरी दिसतच नाही त्याच्या मनातही पुरता गोंधळ निर्माण होतो अरे काय हे हि कावू कोठे गेली आता आताच तर इथे होती.. तो तिला आवाज देवू लागला.

अनूश्री आणि वीर एकमेकांचा हात पकडत कावेरीला आणि अधिराजला शोधत असतात पण त्यांना सुद्धा ते सापडतच नसतात. तरीही ते तसेच चाललेले असतात.

एका जागी गेल्यावर त्या दोघांचे पाय स्थिरावतात. वीर म्हणतो...

ये अनू बघितलस ...

हो रे नक्कीच ते दोघे काही वेळापूर्वी याच जागेवर होते.. ते पुढे जातच असतात तोवर अनूच्या पाया खालील जमीन दुभंगते व अनू खालच्या खोलीत जाते... हि क्रीया इतकि वेगात घडते कि वीर आणि अनूश्रीला काय करायच तेच कळत नाही कारण त्यांचे

हात एकमेकांच्या हातातून निसटतात. वीर त्या अंधाऱ्या जमिनीखालील खोलीत डोकावून अनूश्रीला आवाज देवू लागतो... ये अनू ये अनू... तो आत डोकावतो पण त्याच्या एक गोष्ट लक्षात येते त्याच्या हातातल पुस्तक पेट घेवू लागलेल असत तो तसाच मागे जातो आणि फुंकर मारणार असतो पण अचानकच पुस्तक परत होत तसं होत. तो ते पुस्तक तसच धरत परत अनूला आवाज द्यायला जातो तसं ते पुस्तक परत पेट घेत... तो परत मागे येतो... आणि स्वतः शीच म्हणतो नक्कीच इथं खूपच मोठ्या प्रमाणात नकारात्मकता आहे पण अनूला असच सोडून कसं जाणार पण हे पुस्तक सुद्धा व्यवस्थित राहिल पाहिजे... काय करायच.. थोड्या वेळात त्याला एक कल्पना सुचते. तो त्या पुस्तकाला वडाच्या झाडाच्या खोडात ठेवतो त्याने असं ऐकलेल कि वडात देवाचा वास असतो आपण अनूला शोधून परत येवू म्हणून तो ते पुस्तक खोडात ठेवतो आणि त्या खड्ड्यात उडी घेतो.

कावेरीला कळतच नाही कि आता काय कराव मनात तर पुन्हा नको ते विचार सुरू होतात पण तिला विश्वास वाटत असतो कि आपल्याला भ्रमित केल जात आहे पण आम्ही लांब नाही आहोत कदाचित आम्ही खूप दूर जाव परत म्हणून हे सगळ ते घडवून आणत आहेत. तिच्या हातात अजूनही ते शस्त्र असत ती तशीच त्या शस्त्राला डोळे मिटून वंदन करते आणि म्हणते हे श्रीराम तुम्हीच आता काही तरी मार्ग दाखवा.. ती मनातच जय राम श्रीराम जय जय राम जप करू लागते...

त्यासोबत तिथली जमीन हादरे देवू लागते.. पण तरीही ती डोळे न उघडता साधना सुरूच ठेवते... अचानकच तीच्या डोळ्यासमोर काही चित्र दिसू लागतात... तीच्या डोळ्यासमोर काही वेळापूर्वीचा प्रसंग उभा राहतो ती आणि अधिराज चाललेला असतो. त्यांच्याच शेजारी थोड्या अंतरावरून वीर आणि अनूश्री चाललेले असतात.. ते चौघही एकमेकांकडे बघत असतात.. आणि कावेरीला आश्चर्यच वाटत अरे ते आमच्याच बाजूला होते असं कसं होईल आम्हाला तर तिथ झाड झुडपच दिसत होती.. ती तसच थांबते पुढच चित्र बघूनही तिला धक्काच बसतो जेव्हा ती आणि अधिराज मागे वळतात तेव्हाही ते एकमेकांच्या सोबतच असतात तिला परत आश्चर्य वाटत हे कसं शक्य आहे अधिराज

आणि मी शेजारीच राहून एकमेकांना हाक मारत होतो तरीही आमचा आवाज एकमेकांना ऐकू जात नव्हता..

ती परत पुढे बघू लागते तिला अनूच आणि वीरच चित्र दिसत वीर आणि अनू चाललेले असतात आणि अचानकच अनूच्या पायाखालची जमीन दुभंगून जाते. अनू त्या खोलीत जाते... नंतर वीरही पुस्तक त्या खोडात ठेवून त्या खड्ड्यात उडी घालतो अरे हा तर तोच खड्डा आहे ज्यात आपण फसलो होतो... पण कसली माया करतात हे लोक इतक्या जवळ असूनही आम्ही एकमेकांना पाहू नाही शकलो... तीच्या समोर आणखी एक चित्र उभं राहत त्यात अधिराज ती ने दगडाने अक्षर कोरलेल्या ठिकाणी जातो.. तर तिथ अक्षरच नसतात  तिला परत आणखी एक चित्र दिसत एक काळी आकृती तो दगड उचलतो त्यासोबत ती अक्षर पुसली जातात... शीट यार त्या आकृतीने आमच्या खूणाही पूसल्या.. ती तशीच बघत राहते.. तोवर तिला आणखी एक चित्र दिसत त्यात अधिराजला मारायला धार केलेला एक सूरा घेऊन तो म्हातारा येत असतो...

कावेरी तशीच उठत देवाच नाव घेत तशीच धावत धावत आधीच्या ठिकाणी जावू लागते यावेळी देवाच नामस्मरण केल्यामुळे तिला कोणतीही माया भूलवत नाही.. कि रस्ता शोधताना अडचण येत नाही ती तशीच धावत पळत त्या ठिकाणी जावू लागते.. तो म्हातारा अधिराजवर सूरा धरतो. अधिराज अनभिज्ञ असतो पण मागे कसलीतरी हालचाल जाणवते म्हणून मागे वळून बघतो तसा हादरूनच जातो. तो माणूस राग राग धरून त्वेषाने सूरा चालवतो पण तो सूरा दुसरीकडेच पडतो कावेरी तिथे पोहोचलेली असते. ती त्याला माणसाला दूर ढकलते. त्या माणसाला जोरात फटका पसतो.. त्याला हाताला आग लागल्यासारखी होते कारण तीच्या हातात ते शस्त्र असत आणि आता आणखी एक गोष्ट पुस्तक जवळ असत... ती येताना त्या वडाच्या खोडातल पुस्तक घेऊन आलेली असते.. तिला चित्रात दिसलेल असत कि ती सगळे मिळून ते झाड पाडणार असतात त्याला जाळणार असतात ते पुस्तक जळाव म्हणून...

खर तर ही पुढची घटना असते पण कदाचित देव त्यांना थोडी मदत करावी म्हणून तीच्या डोळ्यासमोर आणतो.. ती मागे बघते पण तो माणूस गायब झालेला असतो.. पण तिथे त्याचा आवाज घुमतो असच मारणार नाही आता तुम्हाला तुम्ही माझ्या मनातला अग्नि आणखीच भडकवला आहात आता तर याच एकत्र एकत्रच एकमेकांसमोरच सगळ्यांना मारतो मित्रांसाठी रडवत रडवत.. हा.. हा... हा...

पण ते दोघ परत एकत्र आलेले असतात म्हणून त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आधी एकत्र तर येवू नंतर काय होईल ते होईल असं म्हणून पुढे जावू लागतात..

कावेरीला चित्रात दिसलेल असत कि अनू आणि वीर त्या खड्ड्यात गेलेले असतात ती अधिराजसोबत आता जावू लागते..

अनू त्या खड्ड्यात बेशुद्ध पडलेली असते वीर तिला आवाज देत देत पुढे चाललेला असतो.. त्याला तिथे खूपच नकारात्मकता जाणवत होती.. अचानकच एक आवाज त्याच लक्ष वेधून घेतो.. तो राजचा आवाज असतो.. तो त्याला हाक मारत होता...

तो त्या आवाजाच्या दिशेने जावू लागतो. पण त्याला निराशाच येवू लागते. कारण फक्त आवाजच येत असतो तिथल्या कोपऱ्या कोपऱ्यातून पण त्याला कोठेच राज सापडत नाही.. त्याच्या लक्षात येत नक्कीच हा त्या माणसाचाच डाव आहे त्याला मी अनूपर्यंत पोहोचू नये असं वाटत असणार... पण राज पण असू शकतो ना तो ही नाही सापडला अजून पण नाही असं नाही होवू शकत जर राज असता तर त्याच्या आवाजात आपल्याला आर्तता जाणवली असती कारण आम्ही एक दिवसासाठी जरी नाही भेटलो तरी तो किती भावूक होवून आवाज द्यायचा त्यासोबत आधी गळ्यात पडून रडायचा त्याला शांत कराव लागायच नाही हा राज नाही असू शकत. त्याचे डोळे परत भरून येतात.. परत भानावर येवुन तो अनूला शोधू लागतो...

ये कावू कोठे घेऊन आलीस या खड्ड्यात किती जोरात उड्डी मारलीस नंतर मलाही मारायला लावलीस.. काय यार तू असं मी साध्या कट्ट्यांवरून पण कधी उड्डी घेतली नाही..

अरे गप्प ना काय करायला आलोय आपण इथे आणि तु तुझ पुराण सांगतोयस...

काय माझ बोलण पुराण वाटतय तुला...

नाहीतर काय खरच आहे तसं आणि हसू लागते.. त्यालाही हसायला येत...

पण कावेरी खरच इथे सापडेल ना अनू आणि वीर...

हो रे नक्की ते इथेच सापडतील... मला तसच दिसलय...

दिसलय म्हणजे तुला कसं काय दिसल... अधिराज विचारतो..

ते तुला नंतर सांगते आधी त्यांना शोधूया असं म्हणत ती पुढे जाते तसं पायाला काहितरी लागत आणि तीचा तोल जातो... त्यासोबत कावेरीच आणि अधिराजच लक्ष खाली जात. तर खाली अनू बेशुद्ध पडलेली असते...

अशा प्रकारे तिघांची भेट होते...

# 20

# रिंगण

वीर अनूला शोधत असतो पण त्या खड्ड्यातल्या अंधारात सतत धडपडायला होत असतो. तो प्रत्येक कोपरा बॅटरीच्या सहाय्याने न्याहाळत असतो. पण एका गोष्टीचा त्याला खूपच त्रास होत असतो तो म्हणजे तिथे तीव्र प्रमाणात दुर्गंध येत असतो. तो नाक दाबत दाबत नेमक तिथे काय आहे हे बघायला जात असतो. तो जस जस त्या दिशेने जात असतो तसं त्याला ढवळून आल्यासारख होत असत. तरीही तो तसाच पुढे जातो.. पुढे गेल्यानंतर त्याच्या पायाला काहितरी लागत म्हणून तो खाली वाकून बघतो तर तिथे अनूश्रीच प्रेत पडलेल असत. ते पाहून त्याला तर घेरीच येते..

कावेरी आणि अधिराज हालवून हालवून अनूला उठवण्याचा प्रयत्न करत असतात.. थोड्या वेळानंतर तिला शुद्ध येते. तसं त्या दोघांना आनंद होतो.. ती शुद्धीवर येत येत वीरला आवाज देत असते.. तिच लक्ष कावेरी आणि अधिराजकडे जात तसं तिला आनंद होतो. तिच्या डोळ्यांतून आपोआपच अश्रू ओघळतात.. तुम्ही खरच इथे आहात. ये अधी तू तू कसा आहेस रे आणि कोठे गेलेलास. आणि कावू तू तू अधीपाशी कशी पोहोचलीस आणि तुम्ही इथे कसे पोहोचला..

ये गप्प ये काय यार अनू एकतर आता कोठे शुद्धीवर आलेस आणि लगेच काय प्रश्नांची सरबत्ती चालू केलेस. हे देवा अवघडच आहे या बाईच... कावेरी म्हणाली..

ये काय ग कावू मी काय तुला बाई वाटते होय.. मी मैत्रीण आहे नव्ह म्हणजे तू कावू नाहीच आहेस अरे अधी हि कोणीतरी दुसरीच आहे... अनूश्री म्हणाली...

ये काय यार तुम्ही दोघी कोठेही सुरू होता.. आपल्याला बाकिच्यांना पण शोधायच आहे विसरलात काय? अधिराज म्हणाला...

अरे हा हो पण तुम्ही दोघ एकत्र कसे आलात. अनूश्री विचारते..

ये अनू ते नंतर सांगू पण तु सांग तू आणि वीर कसं एकत्र आलात. कावेरी विचारते...

अरे हा वीर वीर कोठे आहे आपल्याला त्याच्यापर्यंत पोहोचल पाहिजे.. तो मला शोधत असेल आम्ही तर असं ठरवलेल कि काहीही झालं तरी आता वेगळ व्हायच नाही आणि बघा तरीही आम्ही वेगळे झालो. आता त्याला कसं शोधायच. हे देवा आपण चौघ भेटलो असतो ना... असं म्हणत अनूश्रीचे डोळे  भरून येवू लागले...

ये सोड यार अनू आपण तिघ तर एकत्र आलो ना तू आता आणि कसली काळजी करते आपण त्या दोघांनाही नक्की शोधू... कावेरी अनूश्रीची समजूत घालत म्हणते...

ये चला आपण आधी इथच शोधू मला वाटत वीरनेही तुझा हात सुटल्यावर या खड्ड्यात उड्डी घातलीच असणार तुला माहित आहे ना अनू गेल्यावेळी असच एकदा आपण साने काकूंचे घर बघायला गेल्यावर तिथे अशी गॅलरी होती ज्याला बाजूने काहीच नव्हत. तिथून राजचा पाय घसरलेला तेव्हा किती शर्थीन वीरने त्याला वाचवलेल.. स्वतः लाही घसरायला होईल या गोष्टीची पर्वा न करता तसं तर त्याला ओढता ओढता तोही खाली घसरतच होता म्हणून आपण सगळ्यांनी मग त्यांना वर घेतल..

हो रे अधी असाच आहे आपला वीर नक्कीच तो मला वाचवायला खरच इथे आला असेल आपल्याला त्याला शोधल पाहिजे... चल आपण शोधू त्याला... अनू म्हणाली...

कावेरी, अनूश्री आणि अधिराज वीरला शोधू लागतात...

वीरच्या जवळ असलेल ते प्रेत त्याला बेशुद्ध पडलेल पाहून उठत आणि जीभ चाटत चाटत त्याच्यासमोर जात व ते रूप बदलून मुळ रूपात येत.. ते वीरच्या भोवती एक रिंगण आखत व समोर शैतानाची मातीने प्रतिमा तयार करू लागत व म्हणत... आपली

वाट बघण कामी आलं आज सैतान आपल्यावर प्रसन्न होणार आणि खूप शक्ती प्रदान करणार आपण शक्तिशाली बनणार हा हा हा...

ते खूपच खूष होत वीर भोवतीच्या रिंगणाजवळून एक प्रदक्षिणा पण घालत खूष होऊन व सैतानाची पूजा करायला सज्ज होत...

कावेरी, अनूश्री आणि अधिराज वीरला आवाज देत देत पुढे चाललेले असतात.. पण त्यांना वीर सापडतच नसतो... ते एक एक कोपरा लक्षपूर्वक तपासत असतात... त्या खड्ड्यात अचानकच प्रचंड आवाज येतो त्या आवाजाने सारेच दचकतात... कोणीतरी नाचत आहे असा आवाज येत असतो त्यासोबतच विचित्र भाषेत कसलेतरी मंत्र म्हटले जात आहेत. सगळेजण त्या आवाजाच्या दिशेने जावू लागतात.

थोडा वेळ ते आवाजाचा वेध घेत घेत चाललेले असतात. पण काही वेळानंतर नेमक कोणत्या दिशेने आवाज येत आहे. हेच समजण अवघड होवून जात त्यांना कारण तिथल्या प्रत्येक कोपऱ्यातून तो आवाज येत आहे असच भासत असत ते तर पुरते गोंधळात पडतात.

त्यांना वीरला शोधायच असत म्हणून प्रत्येक बाजूने तपासायच ठरवतात... त्या आवाजाने त्यांना वीरचा जीव धोक्यात आलाय असच वाटत होत.. ते प्रत्येक दिशेकडे जायच ठरवतात ते एका दिशेला जातात. पण पुन्हा गोंधळात अडकतात त्या मार्गाचा अंतच त्यांना सापडत नाही..

अरे अधी असच चालत राहिलो तर वीरपर्यंत लवकर पोहोचता येणार नाही आपल्याला काहितरी केल पाहिजे... कावेरी म्हणाली...

हो ग कावू पण काय कराव हेच आता सूचेनास झालंय... अधिराज म्हणाला...

ये तुम्ही एक गोष्ट नोटीस केला काय? बाकिच्या ठिकाणाहून आवाज सारखाच येत आहे पण एका ठिकाणाहून कमी जास्त होत आहे... नक्की त्याच ठिकाणी असतील ते... अनूश्री म्हणाली...

हो ग अनू आम्ही ही गोष्ट नोटीसच नाही केली.. कसली भारी आहेस यार तू असाच भारीपणा वापरत जा... म्हणजे सगळ्याच विषयात पास होशील... कावेरी म्हणाली...

ये कावू काय यार तू सारखी खेचतच असतेस थांब इथून बाहेर पडलो ना कि आधी तुलाच अद्दल घडवते... अनूश्री म्हणाली...

देव करो आणि ती वेळ लगेच येवो किती तरसलोय आपण मोकळ्या हवेत एकमेकांसोबत दंगा मस्ती करण्यासाठी एकमेकांना भेटण्यासाठी अशी वेळ याआधी कधीच आली नसेल ना आपल्यावर... कावेरी म्हणाली...

हो ग कावू पण आता बास कर विचार आपल्याला त्या आवाजाच्या ठिकाणी पोहोचल पाहिजे... अनूश्री म्हणाली...

हो चला यार वीर आहे कि आणखी कोण आहे तिथ हे तिथ गेल्याशिवाय कळणार नाही पण तिथे वीरच असेल नाहीतर असं आपल्याला कोणी भुलवल नसत... अधिराज म्हणाला...

तोवर परत तिथून वीरचा आवाज येतो.. तसं सगळे धावत पटकन तिथ जातात...

वीर शुद्धीवर आलेला असतो तो त्या रिंगणातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतो पण त्याच्या आजूबाजूला एकप्रकारच कवचच निर्माण झालेल असत ज्यामुळे त्याला तिथून बाहेर पडता येतच नाही.. तो तिथूनच सगळ्या मित्रांना हाक मारत असतो...

ते सगळेच तिथ पोहोचतात... तो माणूस समोर बसून मंत्र उच्चारतच असतो... ते सगळे वीरच्या दिशेने झेपावतात व आगीचा झटका बसावा तसे बाजूला होतात... फक्त कावेरीला काहीच जाणवत नाही तरीही आत मात्र जाता येत नाही...

आता काय करायच आधी या माणसालाच दूर केल पाहिजे अधिराज असं म्हणतो... त्याबरोबर तो माणूस मागे वळून बघतो तसं सगळे जागीच गारठतात... कावेरी,  अनूश्री, वीर आणि राजच्या मागे लागलेला तो माणूस म्हणजे एक प्रेत असतो तो... त्याला पाहून पुन्हा त्यांना ते दृष्य आठवत...

त्याच्या मंत्राबरोबर वीरच्या अंगावर चट्टे उठत असतात ते पाहून ते सर्वच जण हळहळतात... त्यांना काय कराव हेच कळेना जणू काय मेंदूच बधीर झाला...

पण मित्राला वाचवण्याच्या भावनेने त्यांच मन पुन्हा पेटून उठल... कावेरीला त्या शस्त्राची आठवण झाली... पण ते शस्त्र पाहून ते प्रेत अधिकच भडकल... त्याने तिथल्या धुळीचा गोळा करत कावेरीच्या दिशेने भिरकावला तसं ते शस्त्र तिच्या हातातून दूर गेल... आणि पुस्तकही बाजूला गेल...

ते पाहून त्या प्रेताला प्रचंड आनंद झाला त्याने त्याच्या साथीदारांचे म्हणजेच त्या जागेत अंत झालेल्यांना बोलवल... ते सगळेच त्यांच्या भोवती गर्दी करू लागले... ते पाहून ते सगळेच परत गोंधळून गेले...

# 21

# नायनाट सैतानी शक्तीचा कि अंत मित्रांचा

ती सगळी प्रेत त्या तिघांच्या अवतीभवती गोळा होवू लागतात. तसं त्यांना काय कराव हेच सूचेनास होत. एकतर वीरला पाहून सगळ्यांच हृदयच हळहळत होत. त्यात ते पुस्तक आणि शस्त्र दोन्हीही त्यांच्यापासून दूर झालेल. तरीही ते एकमेकांकडे बघत एकमेकांना धीर देतात. आणि इशारा करत अधिराज अनुश्रीला खुणावतो. अनुश्री लागलेल्या जखमेवरची पट्टी काढते तसं त्यातल्या जखमेवरची खपली दिसते. त्या प्रेतांना ते पाहून भलताच आनंद होतो. तिथे असणारी सगळीच प्रेत अनुश्रीच्या दिशेने येवू लागतात ते पाहून अधिराज कावेरीला खुणावतो ती तशीच त्या पुस्तकाकडे वळते आणि अधिराज त्या शस्त्राकडे जावू लागतो अनुश्री जोरात वेगाने पळत असते. ती पळत पळत तिथून बाहेर पडते. ती प्रेतही तिच्या मागे मागे धावू लागतात. पण अंगातले त्राण तर संपत चाललेले तिच्या तरीही काहीही होवू दे आता आपण आपल्या मित्रांसाठी जिवात जीव असेपर्यंत लढायच असं म्हणत ती जात असते.एके ठिकाणी गेल्यावर तिच्यातल बळ पूर्णच संपत ती तशीच खाली कोसळते.

कावेरी त्या पुस्तकाजवळ पोहोचणारच असते तोपर्यंत तो माणूस तीचा पाय मागे ओढतो व त्यावर स्वतः च्या टोकदार नखांनी ओरबडू लागतो. तिच्या पायातून रक्त ओघळू लागत. तसं तस तिला जोरात वेदना होवू लागतात. पण तरीही ती ने ठरवलेल कि आज काहीही होवू दे भलेही आपले प्राण जावू देत पण इथून आपल्या मित्रांना तरी बाहेर काढूयाच. ती तसच जितक त्राण शिल्लक होते ते सगळे एकवटून त्या माणसाला दूर ढकलते आणि शक्य तितक्या वेगात जावून ते पुस्तक घेणारच असते तितक्यात दोन पावलावरच पुस्तक असत पण तिथे ती स्त्री येते व तिला ओढत ओढत दूर नेवू लागते.

अधिराज त्या शस्त्रापर्यंत जात असतो. त्याच्याकडे कोणाचच लक्ष नसत. अधिराज तसच नजर चूकवत चूकवत त्या शस्त्रापर्यंत चाललेला असतो तोच तिथे त्याच्या आजूबाजूला धूरच धूर पसरतो. त्याला त्या धूराचा त्रास होवू लागतो. तोवर त्याच्यासमोर राज उभा राहतो. तो त्याला म्हणतो अधिराज अरे मी तुला मार्ग दाखवतो. अरे हे जे पाहतोयस ते खर नाही आहे. अरे आपले मित्र त्या खोलीत आहेत त्यांना तिकडे कोंडून ठेवलय. आपल्याला तिथे ताबडतोब पोहोचल पाहिजे. नाहीतर ते सगळे त्यांना मारतील.

अधिराजला काय कराव काय सत्य काय असत्य हेच कळेना. त्याच लक्ष खाली गेल तिथे काही पाण्याचे छोट्स डबक होत त्यात त्याला समोरच्या मुलग्याच वेगळच प्रतिबिंब दिसू लागल. तो समजून गेला कि हा राज नाहीच आहे. पण तरीही त्याने तसं जाणवू दिल नाही. तो म्हणाला हो चल आपण जावूया असं म्हणून त्याला मागे वळवल आणि तसच धावत त्या शस्त्रापर्यंत पोहोचला.

अनूश्री खाली कोसळते तिच्या डोळयात अंधारी येवू लागते. तसं तिला त्या स्त्रीच्या भजनाचे सूर आठवतात ती ने त्या स्त्रीकडून सरबत घेताना ते ऐकलेले. ती तसच मनातल्या मनात ते गुणगुणू लागते. तीच्या त्या सूरांसोबत वातावरणात वेगळाच बदल होवू लागतो. ती प्रेत मातीत मिसळू लागतात तसं तिथ जोराच वादळ येवू लागत अनू पुन्हा उठते आणि आत जावू लागते.

ती स्त्री म्हणजेच त्या माणसाची बायको कावेरीला ओढत ओढत नेत असते. तसं तिच्या शरीराला खालची जमीन खरचटत असते. तिला त्या स्त्रीला कसं बाजूला कराव हेच सूचत नसत. तिला त्या राजाने शिकवलेली भाषा आठवते त्यात त्याने तिला एक मंत्र पण शिकवलेला. ती नकळतच तो मंत्र म्हणते.

रवीमात्मा कृपावंतना आरिष्टास नाशना रवीमात्मा कृपावंतना आरिष्टास नाशना.....

ती हा मंत्र म्हणत असतेच त्याबरोबर त्या स्त्रीला जोरात फटका बसतो जणू काय कोणीतरी तिच्यावर अग्नीचा गोळा फेकला असल्यागत तिचा हात पेट घेतो. ती कावेरीला तशीच सोडते आणि तिथून ओरडत पळत दूर जाते.

कावेरीला खूप खरचटलेल असत ठिकठिकाणी रक्त आलेल असत पण ती तशीच उठते आणि पुन्हा ते पुस्तक मिळवायला जाते. ती पळत पळत जावू लागते तर तिला समोर एका कोपऱ्यात डोळे मिटून बसलेला राज दिसतो. जो पाणी पाणी असच म्हणत असतो. कावेरीला राजची ती अवस्था बघवत नाही ती तशीच आजूबाजूला काही आहे का बघते. तिला तिच्या भिजलेल्या ओढणीची आठवण होते. ती तशीच जाते आणि राजला हाक मारते. तो तर सुरूवातीला तिला पाहून घाबरतोच व कोण कोण तू असच म्हणू लागतो. ये राज मी कावू... नाही तू कावेरीच रूप घेऊन आलेली कोणी दुसरीच मुलगी आहेस ना... नाही तू कावेरी नाहीसच... त्याचा कावेरीवर विश्वासच बसेना.

राज तुला आठवत का आपण दोघांनी सगळ्यांना फसवण्यासाठी एक प्रॅंक केलेला तुझा अपघात झालाय त्यामुळे तुला एका दवाखान्यात नेलय असं घाबरत पळत जावून सगळ्यांना सांगितलेल जेव्हा दोघ काकांची गाडी चोरून घेऊन ग्राउंड वर शिकायला गेलेलो तेव्हा सगळे खरच किती घाबरलेले व सत्य कळाल्यावर आपल्याला सगळ्यांनी किती झापलेल.

हो ग कावू तु तु खरच कावेरी आहेस तेरी मेरी यारी सबसे अलग और न्यारी...

कावेरी राजला ओढणी पिळून त्यातल पाणी प्यायला देते. राज ते ओंजळीत घेऊन पितो. मग...

कावेरी राजला हात देते राज उठतो आणि मग दोघेही बाकिच्यांना वाचवायला जाऊ लागतात...

अधिराजने ते शस्त्र हातात घेतलेल असत तो जातो आणि जोरात वीरच्या भोवताली मारतो तसं वीरच्या भोवतीच आवरण तुटत. अधिराजला वीरला बाहेर खेचून

घेतो ते पाहून तो माणूस म्हणजेच ते प्रेत जास्तच चवताळत हातच सावज जाणार म्हणून जोरात त्यांच्या दिशेने झेपावत तोवर तिथे कावेरी पुस्तक घेऊन येते व त्या पुस्तकाला हात लागताच ते प्रेत त्यातच कैद होत. अधिराज आणि वीर तसच कावेरी आणि राजही ते पाहून आश्चर्यचकित होतात.. तोवर तिथे अनूसुद्धा धावत धावत पोहोचते. अशा प्रकारे ते शेवटी पाचही जण एकत्र येतात. त्यांना एकत्र आलेल पाहून तिथल वातावरण वेगळच बनत.. त्या खड्ड्यातल्या भिंती हालू लागतात ते एकमेकांचा हात पकडत तेथून पळू लागतात.

आता त्यांच्या हातात ते पुस्तक शस्त्र तसच कावेरीला अवगत असलेला मंत्र या सगळयामुळे ती दोघ नवरा बायको भिती दाखवण्याव्यतिरिक्त काहीच करू शकत नव्हती. ती सगळी एक नियोजन आखतात. त्यानूसार कावेरी, राज आणि अनूश्री त्या पंख्याकडे जायच ठरवतात. खरतर राजला तो शब्द समजलेला पण तो कोठे वापरावा लागणार हे कळल नव्हत. पण अनू त्या स्त्रीने सांगितलेला भुतकाळ थोडक्यात सांगते तसं त्याच्या लक्षात येत. तसच कावेरीला त्या पुस्तकातली भाषा अवगत होती. त्यामुळे ते तिथ एकत्र जातात. वीर आणि अधिराज ते शस्त्र घेऊन त्या दोघा नवरा बायकोंना किंवा आणखी कोण आलं तर त्यांच्याशी लढायला सज्ज झालेली असतात..

म्याँव म्याँव करत एक काळ मांजर अधिराज आणि वीरच्या जवळ येत ते मांजरच आहे म्हणून त्याला क्षुक क्षुक करतात पण ते तिथून आत जात.. वीर काळजीत पडतो पण अधिराज समजवतो अरे सोड यार मांजरच तर आहे..

राजला ती अक्षर कळतात उकरकटू चकरकटू असं लिहिलेल असत त्यावर आणि त्याच्या मागे पुढे ए आणि झी हे इंग्रजी शब्द असतात. पण त्यांना नेमक काय कराव लागेल हेच समजेना तोवर अनूश्रीला त्या टिव्हीची आठवण होते. तीने त्या टिव्ही खाली असलेले बट्णस चेक केलेले त्याच्या रिमोटवर अशाच प्रकारची भाषा आणि अक्षर होती. कावेरीला त्या भाषेचा अर्थ कळतो ती म्हणते उकरकटू म्हणजे दोन आणि चकरकटू म्हणजे चार हि भाषा आधी इथे वापरली जायची. मला त्या राजाने शिकवलेली.. अग ते ठिक आहे पण टिव्ही पाशी जाणार कोण आणि इथे थांबणार कोण...

अग मी जाते तिथे... अनूश्री म्हणते पण तु एकटी... कावेरी म्हणते...

हो कावेरी तुला पुस्तकातली भाषा कळते त्यामुळे तुझ इथं थांबण गरजेच आहे. नंतर ते मुक्ती देताना खूप त्रास देतील म्हणून राजही असू दे तुझ्या सोबत मी जाते.. असं म्हणत ती तिघ एकमेकांना मिठी मारतात आणि अनूला सांभाळून जायला सांगतात..

अनू त्यांना जी खोली राहायला दिलेली त्या खोलीत जायला निघते ती त्या भिंतीपाशी येते. त्या खुणशी नजरेने पाहणाऱ्या चित्रापाशी जाते पण यावेळी तिला ते चित्र रिकामच दिसत तो माणूसच दिसत नाही ते पाहून तिला जास्तच भय वाटत पण तसच सावरत ती पुढे जाते. ती आतच जाते व टिव्ही जवळ जावू लागते तोच टिव्ही आपोआप चालू होतो. त्या स्त्रीने सांगितलेला भुतकाळ जसाच्या तसा चित्रपट असल्यासारखा त्यात दिसू लागतो. तिला ते पाहून जास्तच भिती वाटायला लागते. त्या चित्रापाशी येवून ती टिव्ही स्टॉप होते.. तो माणूस आतून हाक मारू लागतो.. आलीस बाळा ये ये आपल्याला लवकर दूर जायच आहे. ते पाहून अनूला चांगलीच धडकी भरते पण आपल्या मित्रांना आठवत. ती त्या स्त्रीच भजन पुन्हा सुरू करते तसं ती टिव्ही पुन्हा बंद पडते ती ते भजन म्हणत म्हणतच टिव्हीखालील ती बटण दाबते.. तीच ते बटण दाबण्याबरोबर वातावरण बदलू लागत.. त्या टिव्हीचा जागच्या जागी स्फोट होतो. अनू तशीच पळत पळत बाहेर येते.. तोवर अनूला येवून काही सापळे गाठतात ते तिच्या भोवती गर्दी करत नाचू लागतात.

इकडे ते काळ मांजर धाडकन आत येत व कावेरीच्या हातातल पुस्तक ओढू लागत. राज त्याला हुसकवायला जातो तोच ती दोघ नवरा बायको तिथ येतात ती जावा इथून नाहीतर मारणार तुम्हाला मारणार तुम्हाला अशी भिती घालू लागतात. व राजवर झडप घालायला जावू लागतात ते त्याच्यावर झडप घालणारच असतात तोच वीर ते शस्त्र त्याच्यावर चालवतो. अधिराज त्या मांजराला कावेरी पासून दूर ढकलतो. खालची माती उकरली गेलेली असते. कावेरी ती दूर करते खाली दोन सापळे असतात ती पटपट ते पुस्तक वाचते..

**अधिकरची सुखरविंदतातीत नाशनायकर आत साचलयकरतत देव देव तांडवासयरशरणत हस्तघतच तवचरणततकरत मुक्त हवेशयासदेत देतदेण्यारस धावरतधावरतं धावरतं...**

ती सापळे पेट घेतात. तसं तो माणूस आणि त्याची बायको पेट घेत घेत किंचाळत धूर होत जातात. त्याबरोबर अनूभोवती गर्दी केलेली सापळेही राख होतात ते मांजरही पूर्ववत होत.. तिथली जमीन हादरू लागते. ते पाहून ते सगळेच जण एकमेकांच्या हातात हात धरत तेथून बाहेर निघतात... व दूर पळत पळत त्या जागेतून शेवटी बाहेर पडतात ते घरही जमीनदोस्त होत. तिथ सूर्याची किरणे पसरतात व ती जागा शुद्ध होते.. अनूला मदत केलेली व बाकिच्यांना मदत केलेली स्त्री त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून खुष होते व किरण बनून सूर्याच्या दिशेने जाते...

**समाप्त**

©®प्राजक्ता कल्पना रघुनाथ पानारी

**बेलेवाडी (हु.), ता: आजरा,**

**जि: कोल्हापूर**

**फोन नंबर : 7719026803**

**ई. मेल : prajaktapanari23@gmail.com**

आपल्या प्रतिक्रिया नक्की कळवा)

